04-09-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SGB/ 10:30

09-04-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A.1

SGB/ MMP/ SBT/ 10:30

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)

पृ.शी.: राज्यातील 8000 मराठी शाळांना अद्याप मान्यता न मिळणे

मु.शी.: राज्यातील 8000 मराठी शाळांना अद्याप मान्यता न मिळणे या विषयावर सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.किरण पावसकर, ॲड.अनिल परब, श्री.परशुराम उपरकर वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....

तालिका सभापती : ही चर्चा सकाळी 11.45 वाजेपर्यंत मंत्रीमहोदयांच्या उत्तरासह संपवावयाची आहे. सन्माननीय सदस्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत एवढीच विनंती आहे.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सन्माननीय सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी मराठी शाळांच्या संदर्भात जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे त्या चर्चेच्या संदर्भात माझे मनोगत, माझे विचार मांडण्यासाठी तसेच याच विषयाशी संबंधित या सभागृहाचे माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांची कालच्या कामकाजपत्रिकेत जी लक्षवेधी सूचना होती त्यातील विषय आणि या चर्चेचा विषय समान असल्यामुळे हे दोन्ही विषय क्लब केले आहेत, एकत्रित केले आहेत. त्या संदर्भात माझे विचार आणि मुद्दे मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. काल मी या चर्चेला सुरुवात केली होती.

सभापती महोदय, जी चर्चा याठिकाणी उपस्थित केली आहे त्या चर्चेच्या अनुषंगाने या राज्यामध्ये नवीन शाळांना मान्यता देण्याच्या संदर्भात जो काही प्रश्न निर्माण झाला आहे तो या चर्चेच्या माध्यमातून या सभागृहासमोर आला आहे. लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून शाळांना मान्यता देण्याच्या संदर्भात त्याचबरोबर कायम विनाअनुदानित शाळांच्या संदर्भात आणि अनुदान देण्याच्या संदर्भातील विषयही लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून याठिकाणी आलेला आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे या राज्यातील अत्यंत संवेदनशील असे शिक्षणमंत्री आम्हाला लाभले आहेत. भले त्यांच्याकडे प्रभारी कार्यभार असेल, परंतु ज्या व्यक्तीला मनापासून काम करण्याची इच्छा आहे, ज्यांचा या क्षेत्रातील अभ्यास आहे आणि खरोखरच या क्षेत्रामध्ये एकंदरीत शासनाची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन काय करता येऊ शकेल या भूमिकेतून आमचे सन्माननीय मंत्रीमहोदय निर्णय घेत आहेत. खरे म्हणजे ताकाला जाऊन भांडे लपविण्यात येत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

09-04-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A.2

SGB/ MMP/ SBT/ 10:30

श्री.रामनाथ मोते.....

आहे असा विषय होता कामा नये. हे खरे आहे की, या राज्याची आर्थिक परिस्थिती विचारात घेतली तरी शासनाला शिक्षण क्षेत्रावरचा खर्च वाढवावयास हवा. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जाणीवपूर्वक उल्लेख केला होता. राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या 3 टक्क्यापेक्षा अधिक रक्कम शिक्षणावर खर्च होत नाही. आपण शिक्षणावरचा खर्च म्हणत असलो तरी खऱ्या अर्थाने शिक्षण क्षेत्रावर होणारा खर्च म्हणजे आपल्या देशाच्या आणि समाजाच्या विकासाच्या संदर्भात केलेली ती गुंतवणूक आहे. काही वर्षानंतर त्याची फळे आपल्याला चाखावयास मिळतील. त्याचा परिणाम पहावयास मिळेल. म्हणून हा खर्च न समजता ही गुंतवणूक वाढविण्याची नितांत आवश्यकता आहे. या संदर्भातील शासनाचे धोरण नक्की काय आहे हे निश्चित होण्याची आवश्यकता आहे. खरे म्हणजे 1988-89 पर्यंत या राज्यामध्ये मराठी माध्यमाच्या, इंग्रजी माध्यमाच्या शाळांना, अन्य भाषेच्या शाळांना मान्यता मिळत होती. इतकेच नव्हे तर अनुदान सुध्दा मिळत होते. 1988-89 पासून शासनाने त्यामध्ये बदल केला आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अनुदान सुत्रातून वगळले. तेव्हापासून खऱ्या अर्थाने कायम विनाअनुदानित शाळा आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढण्यास सुरुवात झाली. या राज्यामध्ये शाळांना मान्यता देण्याचे जे काही धोरण होते त्या संदर्भात नोव्हेंबर, 2001 मध्ये शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला की, यापुढे या राज्यातील सर्व शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात येईल. याचा अर्थ या राज्यातील कोणत्याही शाळांना, मग त्या इंग्रजी माध्यमाच्या असोत, अन्य माध्यमाच्या असोत, अशा कोणत्याही माध्यमाच्या शाळांना शासनाने अनुदान द्यायचे नाही असा धोरणात्मक निर्णय घेतला.

(नंतर बी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

तरी देखील यापूर्वी राज्यात कायम विना अनुदानित शाळा सुरु होत्या. शासनाने अशा शाळांना मान्यता न देण्याबाबतचा निर्णय घेतल्यानंतर देखील ज्या शाळांना कायम विना अनुदानित तत्वावर मान्यता दिली होती ती रद्द करुन त्यांना विना अनुदान तत्वावर मान्यता दिली होती आणि आज त्या शाळा अनुदानावर आल्या आहेत. त्यानंतर विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यासंबंधीचा जो निर्णय शासनाने घेतला होता त्या निर्णयाच्या विरुध्द जाऊन शेकडो शाळांना विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली होती आणि आज त्या सर्व शाळा अनुदानावर आल्या आहेत. आणि कायम विना अनुदान तत्वावरील शाळांना, खऱ्या अर्थाने ज्यांना अनुदान मिळाले पाहिजे त्यांचा "कायम" शब्द शासनाने काढला. केवळ "कायम" हा शब्द काढून हा प्रश्न सुटणार नाही तर शासनाने त्यासंदर्भात असे धोरण घेतले की, राज्याची आर्थिक परिस्थिती विचारात घेता पुढील चार-पाच वर्षात यासंबंधीचा विचार करु. या वर्षी शासनाने ज्या शाळांना मान्यता दिली त्यात फक्त इंग्रजी शाळाच आहेत असे नाही तर मला मिळालेल्या माहितीप्रमाणे शासनाने जवळपास 2000 पेक्षा जास्त इंग्रजी माध्यमाच्या शाळांना कायम विना अनुदानित तत्वावर मान्यता दिली आहे. आता शासनाने "कायम" हा शब्द काढलेला आहे. तरी देखील गुजराथी व हिंदी माध्यमाच्या शाळांना तसेच उर्दु माध्यमाच्या शाळांनाही शासनाने विना अनुदान तत्वावर मान्यता दिली आणि पुढील पाच वर्षात या सर्व शाळांना अनुदान द्यावे लागेल. परंतु ज्या शाळा सन 1990, 1995 आणि 1998 मध्ये कायम विना अनुदानित तत्वावर सुरु झाल्या त्यांच्या बाबतीत "कायम" हा शब्द काढलेला असल्याने त्यांचीही तुलना आता मान्यता दिलेल्या इतर माध्यमातील शाळांबरोबर शासन करणार असेल तर हा एक प्रकारे भेदभाव निर्माण होईल. म्हणून आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत की, ज्या कायम विना अनुदानित तत्वावर शाळा पूर्वी सुरु आहेत, त्यातील कायम शब्द काढलेला असल्याने तसेच त्यांना पाच वर्षे पूर्ण झालेली असल्याने काही ना काही प्रमाणात तरी या शाळांना अनुदान देणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमुळे खरोखरच मराठी शाळांवर परिणाम झाला आहे काय असे म्हटले तर असा परिणाम निश्चितच झालेला आहे. आणि शासनाने कालच लक्षवेधी सूचनेला दिलेल्या उत्तरात हे मान्य सुध्दा केले आहे. शासनाने त्यात असे म्हटले आहे की, मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडल्या नाहीत पण विद्यार्थ्यांची संख्या मात्र कमी झालेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

आहे. विद्यार्थ्यांची संख्या कमी होणे म्हणजे हळूहळू शाळा बंद पडण्याचाच प्रकार आहे, असाच त्याचा अर्थ होतो. मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांची कमी होणारी संख्या विचारात घेऊन शासनाने तुकड्या वाढविण्याचे जे निकष बदललेले आहेत ते माध्यमिक शाळांसबंधीचे आहेत. त्याचबरोबर मी असेही निदर्शनास आणून देणार आहे की, राज्यातील मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळांची सुध्दा हीच अवस्था आहे म्हणून सातत्याने आम्ही विनंती करीत आहोत की, ज्या पध्दतीने आपण शाळा टिकविण्याचा प्रयत्न करतो त्याबरोबर त्यांच्यासंबंधीचे निकष बदलण्याची सुध्दा आवश्यकता आहे. यासाठी राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा प्रश्न येणार नाही. ज्या पध्दतीने माध्यमिक शाळांसंबंधीचा शासन निर्णय निर्गमित केला त्याच पध्दतीने मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळांचे सुध्दा निकष बदलण्याची गरज आहे. जेणेकरुन जून महिन्यापासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून त्याची अंमलबजावणी करता येईल. तसेच ज्या तुकड्यांमधील शिक्षक अतिरिक्त होणार आहे त्यांचाही प्रश्न मिटेल. आज कल्याण महापालिकेमध्ये 16 शिक्षक बसून पगार घेत आहेत. कारणा तुकड्या वाढीसंबंधीचे निकष बदलत नाही तोपर्यंत त्या वाढवून मिळणार नाहीत, म्हणून या निकषांमध्ये बदल होणे आवश्यक आहे व त्यासंबंधीचा निर्णय तातडीने घेणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ् मोते.....

सभापती महोदय, राज्य शासनाने यावर्षामध्ये मराठी माध्यमांच्या शाळांना मान्यता दिलेली नाही. ज्या शाळांना शासनाने मान्यता दिलेली आहे त्यापैकी बहुसंख्य 90 टक्के शाळा हया इंग्रजी माध्यमांच्या आहेत. हे खरे आहे की, इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कोणत्याही प्रकारचे अनुदान द्यावे लागणार नाही, इंग्रजी माध्यमांच्या शाळांना अनुदान देण्याची कोणत्याही प्रकारे तरतूद नाही. त्यामुळेच शासन इंग्रजी माध्यमांच्या शाळांना परवानगी देत आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना मान्यता दिल्यामुळे त्याचा बोजा शासनाच्या तिजोरीवर पडत नाही. अन्य माध्यमांच्या शाळांना परवानगी न देणे हे बरोबर होणार नाही. अन्य भाषिक शाळांना परवानगी देतांना शासनाचा खर्च वाढणार आहे. ज्या ज्या ठिक्राणी मराठी माध्यमांच्या शाळांची आवश्यकता आहे त्या त्या ठिकाणी मराठी माध्यमांच्या शाळांना परवानगी देण्यांची नितांत आवश्यकता आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना आपण परवानगी देत आहात त्याला आमचा आक्षेप नाही. अन्य भाषिक शाळांना आपण ज्या पध्दतीने परवानगी देत आहात, इंग्रजी, ऊर्दू,हिंदी, गुजराथी शाळांना आपण जशी मान्यता देत आहात त्याच पध्दतीने शासनाने मराठी माध्यमांच्या शाळांना सुध्दा परवानगी देण्याची आवश्यकता आहे. प्राथमिक शाळांना परवानगी देण्याचा शासनाचा आदेश निघालेला आहे. कोकणामध्ये अजून इंग्रजी शाळांच्या माध्यमांचे वेड लागलेले नाही. रत्नागिरी येथे केवळ दोन शाळांना परवानगी देण्यात आलेली आहे, सिंधुदुर्ग येथे एका इंग्रजी शाळेला परवानगी दिलेली आहे. चंद्रपूर आणि भंडारा जिल्हयाला एकाही इंग्रजी माध्यमांच्या शाळेला परवानगी मिळालेली नाही. सर्वात जास्त म्हणजे 215 इंग्रजी माध्यमांच्या शाळा औरंगाबादला देण्यात आलेल्या आहेत. ज्या ठिकाणी ख-या अर्थाने इंग्रजी माध्यमांच्या शाळांची आवश्यकता आहे अशाच ठिकाणी इंग्रजी माध्यमांच्या शाळांना परवानगी देण्यास हरकत नाही परंतु ज्या ठिकाणी मराठी माध्यमांच्या शाळांची आवश्यकता आहे त्या ठिकाणी मराठी माध्यमांच्या शाळांना परवानगी देण्याची नितांत गरज आहे त्यामुळे यासंदर्भात शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. केवळ खर्च वाढेल, अनुदान द्यावे लागेल हे जरी खरे असले तरी शासनाला शासनाच्या जबाबदारीतून बाहेर पडता येणार नाही. आज आपण स्पर्धेच्या युगात आहोत. त्यामुळे प्रत्येक माणसाला असे वाटते की, माझ्या मुलाचे भवितव्य चांगल्या प्रकारे घडवायचे असेल तर त्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकविले पाहिजे. हे जरी खरे असले तरी सुध्दा आज लोकांची ही जी मानसिकता तयार झालेली आहे ती मानसिकता बदलण्याची खरी गरज

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ् मोते.....

आहे. त्याचाच विचार करुन शासनाने इंग्रजी माध्यमांच्या शाळांबरोबर मराठी माध्यमांच्या शाळा टिकाव्यात यासाठी सेमी इंग्रजीचा उपक्रम सुरु केलेला आहे. सेमी इंग्रजीचा उपक्रम आपण केवळ खाजगी शाळांसाठी सुरु केलेला आहे. या राज्यातील बहुसंख्य शाळा ग्रामीण तसेच दुर्गम भागातील आहेत. या शाळा जिल्हापरिषदेच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या,नगरपालिकांच्या, महानगरपालिकांच्या शाळा आहेत. केवळ सेमी इंग्रजी सुरु केले म्हणजे आपण विद्यार्थ्यांचे करिअर चांगल्या प्रकारे घडवू शकतो असे काही नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांबरोबर आपण निश्चित प्रकारे स्पर्धा करु शकतो. काल मी भगिनीमंडळ शाळेला फोन केला होता. त्या शाळेचे एकूण 14 वर्ग आहेत. प्रत्येक वर्गामध्ये 70-70 विद्यार्थी आहेत. मी त्यांना म्हटले मराठी माध्यमाची खाजगी शाळा असून तुमच्याकडे एवढे विद्यार्थी कसे काय आहेत, अन्य ठिकाणी तर विद्यार्थी मिळत नाही, तुमच्याकडे विद्यार्थ्यांना जागा नसल्यामुळे तुम्ही ॲडमिशन नाकारीत आहात. तेव्हा त्यांनी सांगितले की, आम्ही सेमी इंग्रजी सुरु केल्यापासून आमच्याकडे विद्यार्थ्यांचा ओघ वाढलेला आहे. म्हणून सेमी इंग्रजीची ही जी संकल्पना आहे ती संपूर्ण राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सुध्दा सुरु करणे आवश्यक आहे. त्यामुळे ख-या अर्थाने ज्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शिकावे असे वाटते त्यांना सेमी इंग्रजी मराठी माध्यमांच्या शाळेमधून इंग्रजीचे चांगल्या प्रकारे शिक्षण मिळू शकेल व हे विद्यार्थी इंग्रजी माध्यमांच्या विद्यार्थ्यांबरोबर स्पर्धा करु शकतील. त्यामुळे या दृष्टीकोनातून विचार होण्याची आवश्यकता आहे.

मी मुद्दाम आपले लक्ष मुंबई उच्च न्यायालयाच्या एका निर्णयाच्या बाबतीत वेधू इच्छितो. याचिका क्रमांक 313/2000 चा निकाल 11.4.2000 रोजी लागलेला आहे. शाळांना अनुदान देण्याच्या संदर्भात, शाळांना परवानगी देण्याच्या संदर्भात जे प्रतिज्ञापत्र शासनाने दाखल केलेले आहे, त्याची अंमलबजावणी बरोबर होते आहे की नाही हा सगळ्यात महत्वाचा प्रश्न आहे. यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "The first and foremost is the need for ensuring the spread of primary and secondary education to all parts of the socio-economic strata and in all Geographical areas of the State."

यानंतर सौ. रणदिवे.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . . .

सभापती महोदय, यामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, एकंदर किती शाळांना मान्यता द्यावयाची आहे याचे सुध्दा शासनाने धोरण ठरवून दिलेले आहे. साधारणत: एका वर्षात तुम्हाला जास्तीतजास्त 100 प्राथमिक शाळा, 300 माध्यमिक शाळा आणि 50 उच्च माध्यमिक शाळांना परवानगी द्यावी असेही न्यायालयाने मान्य केलेले आहे. तसेच शासनाने ही गोष्ट प्रतिज्ञा पत्राच्या माध्यमातून मान्य केलेली आहे की, आम्ही राज्यामध्ये मास्टर प्लॅन तयार करु. हे जरी खरे असेल तरी न्यायालयाच्या या आदेशास सर्वोच्य न्यायालयामध्ये आव्हान द्यावयास पाहिजे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना मास्टर प्लॅन नाही आणि जर केवळ मराठी माध्यमांच्या शाळांना मास्टर प्लॅन असेल तर ही गोष्ट बरोबर नाही. परंतु राज्य शासनाने या गोष्टीचा फायदा घेतला आणि या राज्यात इंग्रजी माध्यमाच्या दोन हजार शाळांना केवळ मास्टर प्लॅन नाही या नावाखाली मान्यता देण्यात आली. खरे म्हणजे ज्या शाळांचा मास्टर प्लॅन तयार करण्याची गरज आहे आणि त्या अनुषंगानेच त्यांना मान्यता देण्याची गरज आहे. न्यायालयाने 2000 मध्ये निकाल दिला असून आता 2010 साल सुरु आहे आणि दहा वर्षानंतर मास्टर प्लॅन बदलावयाचा आहे, परंतु तो मास्टर प्लॅन मात्र गेल्या दहा वर्षामध्ये शासनाने तयारच केलेला नसल्याने, तो बदलण्याचा विषयच येत नाही अशी स्थिती आहे. तशा प्रकारचा मास्टर प्लॅन तयार केला पाहिजे आणि आपण अशा जागा शोधून काढल्या पाहिजेत की, कोणत्या ठिकाणी मान्यता देण्याची गरज आहे, तेथे मान्यता दिली पाहिजे न्यायालयाने स्पष्टपणे म्हटलेले आहे की, आपण जरी या शाळांना मान्यता देत असलो तरी सुध्दा शासनाच्या आर्थिक क्षमतेनुसार त्यांना अनुदान दिले पाहिजे. सुरुवातीला 20 टक्के द्यावे, नंतर 40 टक्के द्यावे , नंतर 60 टक्के द्यावे आणि त्यानंतर 80 टक्के द्यावे अशा प्रकारे टप्याटप्याने या शाळांना अनुदान देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की,अनावश्यक स्पर्धा टाळण्यासाठी देखील शासनाने काळजी घेण्याची आवश्यकता आहे,म्हणजेच एकाच गावामध्ये इंग्रजी माध्यमाची शाळा आणि मराठी माध्यमाची शाळा असली तरी सध्या लोकांची अशी मानसिकता तयार झालेली आहे की,माझा मुलगा इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये गेला तर पुढे तो डॉक्टर किंवा इंजिनिअर किंवा एखादा मोठा अधिकारी होईल.परंतु लोकांची ही मानसिकता बदलण्यासाठी जर तेथे मराठी माध्यमिक शाळा सुरु असेल तर त्याठिकाणी सेमी इंग्रजीमधून गणित, सायन्स वगैरे विषय .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिकविण्याची सोय करावी. जिल्हा परिषदेच्या खाजगी शाळांमध्येही सेमी इंग्रजीतून शिकविण्याची सोय करावी. अशा ठिकाणी इंग्रजी माध्यमाची शाळा देण्याची गरज नाही.

सभापती महोदय, यानंतर मी शेवटचा मुद्दा सांगून मी माझे मनोगत संपवतो. राज्य शासनाने या विषयाच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे एकंदर आठ हजार शाळांचे प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहेत. परंतु प्रत्यक्षात तसे नाही, तर याबाबतीत राज्य शासनाकडे 20 हजार पेक्षा अधिक प्रस्ताव आले होते. त्यापैकी आपण इंग्रजी माध्यमिक शाळांना मान्यता दिली. परंतु आज ना उद्या आपल्या शाळेला परवानगी मिळेल या आशेवर अनेक संस्थांनी शाळा सुरु केलेल्या आहेत, त्यामध्ये इन्व्हेस्टमेंट केलेली आहे आणि त्या शाळांमध्ये मुले शिकत आहेत. परंतु आपण जर ते सगळे प्रस्तावच बाद केले तर ते बरोबर होणार नाही. ज्या शाळा सुरु आहेत, त्यातील मराठी माध्यमांच्या शाळांना मान्यता देण्याच्या संदर्भात शासनाने विचार करावा अशी विनंती करतो. धन्यवाद.

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आपण मला भाषण करण्यासाठी वेळ दिला, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, याठिकाणी अतिशय महत्वाच्या विषयावर सुरु आहे. नेहमी सर्वांचा आग्रह असतो की, आपल्या राज्याची जी मराठी भाषा आहे, ती अधिक सशक्त, समृध्द व्हावयास पाहिजे. त्या भाषेचा वापर अधिक प्रमाणात वाढला पाहिजे किंबहुना जीवनाच्या सर्व व्यवहारात मराठीचाच आग्रहाने वापर केला पाहिजे आणि हा आग्रह अतिशय रास्त असाच आहे. पण अनेक वेळेला त्याच्याबद्दलची नकारात्मक भूमिका वेगळया पध्दतीने मांडली जाते. खरे म्हणजे केंद्र शासनाने घटनेमध्ये बदल करुन शिक्षणाचा मुलभूत हक्क मान्य केला आहे. तसेच सर्वशिक्षा अभियानासारख्या योजना केंद्र आणि राज्य शासनामार्फत राबविल्या जात असताना, खरोखरच आपण आपली मानसिकता बदलणार आहे की नाही, शासनाची मानसिकता बदलणार आहे की नाही हा खरा प्रश्न आहे. मराठीच्या शाळांचा आग्रह धरणे म्हणजे आपण प्रवाहाच्या विरुध्द नाही तर विशेष करुन इंग्रजी भाषेचा जो प्रचंड ओघ येत आहे, तो थांबविण्याचीही यामध्ये कल्पना नाही . पण आपण सशक्त झाल्याशिवाय आणि आपणच याबाबतीत आग्रह धरल्याशिवाय मराठी भाषा अधिक समृध्द होणार नाही. जर मराठी भाषा समृध्द व्हावयाची असेल तर त्याची सुरुवात शिक्षण क्षेत्रामधूनच होते हे त्याचे मुलभूत तत्व आहे. मराठी शाळांना अधिक प्रमाणात मान्यता देणे, त्यांना अनुदानाच्या चौकटीमध्ये बसवून ते उपलब्ध करुन देणे हे सगळे विषय आहेतच. परंतु केवळ शाळांना मान्यता देणे किंवा अनुदान देणे येथपर्यंतच हा विषय नेऊन चालणार नाही. तर मराठी भाषेच्या आणि मराठी शाळांच्या समृध्दीसाठी आवश्यक असणारे अवतीभोवतीचे जे वातावरण आहे किंवा त्यासाठी आवश्यक असणाऱ्या ज्या पूरक गोष्टी आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हेमंत टकले..

यासाठी मराठीतील अतिशय अद्ययावत पाठयपुस्तके, त्यांचे अभ्यासक्रम त्याप्रमाणे सुधारित करणे आवश्यक आहे.

आपण नेहमी असे म्हणतो की, गणित आणि विज्ञान हे विषय मराठीमधून शिकविणे अवघड जाते. मला असे वाटते की, अशा कुठल्याच भाषेत विज्ञान किंवा गणित शिकविणे अवघड जात नसेल. मुळामध्ये आपल्या मनामध्ये बसलेली ही कल्पना आहे तिला कुठे तरी हलविण्याची आवश्यकता आहे. ती मानसिकता जर शासनाने दाखवली आणि त्या प्रमाणेच आम्हाला हे करावयाचे आहे असे नक्की केले तरच ही मानसिकता बदलून त्यामध्ये थोडासा बदल होण्याची शक्यता आहे. या सगळया गोष्टींचा विचार करताना मराठी शाळेच्या बाबतीत थोडीशी अधिक प्रोत्साहनाची भूमिका शासनाने घ्यावयाला पाहिजे. ज्यांना मातृभाषेमध्ये शिक्षण घेण्याची इच्छा आहे त्यांना अधिकचे प्रोत्साहन दिले तर या भाषेच्या प्रश्नाच्या संदर्भात आपल्याला जो एकूणच विकास साधावयाचा आहे त्यासाठी याचा खूप मोठया प्रमाणात उपयोग होईल. पण साधारणपणे सोपा मार्ग असा आहे की, इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा आराखडा लागत नाही किंवा त्यांना अनुदान द्यावे लागत नाही म्हणून मान्यता देणे सोपे असते. सोपा पर्याय निवडणे हे कधीही सोईस्कर असते परंतु जर आपल्याला हे आव्हान म्हणून स्वीकारावयाचे असेल तर आपल्याला निश्चितपणे थोडासा मार्ग कठीण असला, त्यासाठी करावी लागणारी यंत्रणा थोडीशी विचारपूर्वक, जाणीवपूर्वक आणि मराठी भाषेच्या तज्ञांना बरोबर घेऊन, शिक्षण क्षेत्रातील तज्ञांना बरोबर घेऊन जर करायची आवश्यकता असेल तर त्यादृष्टीने प्रयत्न झाला पाहिजे. जेणेकरुन निदान असा संदेश शासनामार्फत गेला पाहिजे. या राज्यातील मातृभाषेला प्रोत्साहन देण्यासाठी मराठी भाषेतून शिकण्यासाठी, मराठी भाषेतून शिकविण्यासाठी आणि मराठी मुले या स्पर्धात्मक युगामध्ये टिकाव धरुन पुढे जाण्यासाठी या गोष्टी करण्याची आवश्यकता आहे त्यामुळे एवढया मर्यादित मान्यतेच्या प्रश्नाच्या पलीकडे शासनाने मानसिकता स्वीकारली, त्याप्रमाणे जर काही नियोजनपूर्वक आखणी केली आणि त्याचा वारंवार आढावा घेतला, दरवर्षी यामध्ये काय बदल होत आहेत, काय करायला पाहिजे यासंदर्भातील मार्गदर्शन केले आणि दुसऱ्या भाषांचा दुस्वास न करता त्यातील चांगले मराठी भाषेमध्ये आणून, चांगले शिक्षणक्रम मराठीभाषेमध्ये आणून मराठीचा आग्रह धरुन मराठीचा व्यापक विस्तार होण्यासाठी शालेय माध्यमाचा अधिकाधिक चांगला वापर करुन या सुवर्णमहोत्सवी

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

वर्षापासून या राज्यात आजमितीला जेवढया मराठी शाळा आहेत त्यात दरवर्षी पुढच्या पाच वर्षात कितीने वाढ होणार आहे आणि मराठी भाषेचा आणि मराठी भाषेतील शिक्षणाचा प्रसार आपण किती करणार आहोत असे एक उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून त्यादृष्टीने मार्गक्रमण केले तर मला वाटते या विषयाला न्याय दिल्यासारखे होईल त्याबाबत शासनाने जरुर विचार करावा, अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) सन्माननीय सदस्यांनी पाच-पाच मिनिटात आपले भाषण पूर्ण करावे कारण उत्तराच्या भाषणासाठी अर्धा-तास वेळ द्यावयाचा आहे.

श्री. राजन तेली (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्मानीय दिवाकर रावते यांनी नियम 97 अन्वये एका चांगल्या विषयाची चर्चा याठिक्राणी घडवून आणलेली आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात नाण्याच्या दोन बाजू आहेत. पंचायत राज समितीच्या माध्यमातून आम्ही महाराष्ट्रातील बऱ्याच जिल्हयांना भेटी दिल्या. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेब होते तसेच सन्माननीय सदस्य श्री. रावतेसाहेबही होते. बऱ्याच जिल्हयांमधील बऱ्याच शाळांमध्ये आम्ही गेलो. त्या शाळांमधील इयत्ता सातवीतील विद्यार्थ्याला मराठीतील जोडाक्षरे देखील लिहिता आली नाहीत ही वस्तुस्थिती आहे. इंग्रजीमध्ये नाव लिहिता तर आलेच नाही. म्हणून ही चर्चा करताना मराठीचा दर्जा कसा सुधारेल या दृष्टिकोनातून आपण प्रयत्न करणार आहोत काय? हा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे. सभापती महोदय, एक गोष्ट नक्की आहे की, आम्ही ज्यावेळी मराठी शाळेमध्ये होतो त्यावेळी आपल्या शिक्षकाबद्दलचा अभिमान सगळया विद्यार्थ्यांना वाटत होता. तो त्या ठिकाणी काम करीत होता. गावातील सगळया गोष्टींमध्ये भाग घेत होता त्यामुळे तो शिक्षक पालकांना आणि मुलांना आपलासा वाटत होता. त्या शिक्षकाची बदली झाल्यानंतर गावतील लोक वेशीपर्यंत त्याला सोडावायला जात होते किंवा त्या शिक्षकाची बदली कशी रद्द होईल यादृष्टिकोनातून प्रयत्न करीत होते. ती परिस्थिती आता आहे काय? हे शिक्षक आता गावामध्ये रहातात काय? आपली मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जावीत, आपली मुले तालुक्याच्या ठिकाणच्या शाळेत जावीत यासाठी हे शिक्षक प्रयत्न करतात. ग्रामीण भागात आमची परिस्थिती अशी आहे की, कुटुंबनियोजनामुळे कोकणातील विधानसभेचा एक मतदारसंघ कमी झाला.

यानंतर श्री.बरवड.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .....

आमचा लोकसभेचा मतदारसंघ चिपळूण पर्यंत गेला. आज त्या ठिकाणी मुले मिळत नाहीत. सर्व शिक्षक तालुक्याच्या ठिकाणी राहतात. ग्रामसेवक तालुक्याच्या ठिकाणी राहतात. तलाठी तालुक्याच्या ठिकाणी राहतात. सर्व सरकारी यंत्रणेच्या लोकांनी ग्रामीण भागात राहावयास पाहिजे पण ते आज शहरात राहतात आणि त्या ठिकाणी त्यांची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये जातात. विस्तार अधिकारी शिक्षणाकडे किती लक्ष देतात ? केंद्र प्रमुख किती प्रमाणात शाळांना भेटी देतात हा संशोधनाचा विषय आहे. शिक्षणाच्या बाबतीत अशी परिस्थिती आहे की, मुलांना मराठी नीट येत नाही तसेच इंग्रजी नीट येत नाही अशी केविलवाणी परिस्थिती ग्रामीण भागामध्ये आहे. आज सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये शाळेत 8 मुले, 15 मुले, 20 मुले असलेल्या 250 व्दिशिक्षकी शाळा आहेत. दोन शिक्षक सातवीपर्यंतच्या मुलांना कसे शिकविणार ? आमच्याकडे अशी अडचण झालेली आहे की, मुले नाहीत म्हणून काही गावातील शाळा बंद झालेल्या आहेत. त्यासंदर्भात यापुढे काय पर्याय उपलब्ध करुन देणार ? ज्या ठिकाणी शाळा मागतात त्या ठिकाणी शाळेची गरज असेल तर जरुर शाळा द्यावी. कोकणात कोणत्याही जिल्ह्यात शिक्षणामध्ये व्यावसायिकता नाही. त्या ठिकाणी पैसे देऊन शिक्षण दिले जात नाही. महाराष्ट्रातील अन्य भाग आणि कोकणामध्ये वेगळी परिस्थिती आहे. कोकणामध्ये कोणत्याही संस्थेची शाळा असो, कॉग्रेस, शिवसेना, बीजेपी कोणाचीही संस्था असली तरी त्या ठिकाणी वेगळी परिस्थिती आहे. या सगळ्या गोष्टींचा शासन विचार करणार की नाही. माझी माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, आपण जे इंग्रजी शिक्षक देतो ते बी.ए., एम.ए. बी.एससी, बी.एड. झालेले असले पाहिजेत. त्यांना इंग्रजीचे चांगले ज्ञान असणे आवश्यक आहे. कोकणामध्ये पर्यटन वाढत आहे. पाश्चिमात्य देशातून त्या ठिकाणी जे लोक येणार आहेत ते मराठी बोलतील काय ? प्रत्येक जिल्ह्यामध्ये आय.टी. पार्क येणार आहेत. आय.टी. पार्क आल्यानंतर त्या ठिकाणी तेथील मुलांना नोकरी मिळणार आहे काय ? त्यासाठी इंग्रजी येणे आवश्यक आहे. मुलांना अत्यंत चांगल्या प्रकारचे शिक्षण देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी दोन मागण्या करणार आहे. आमच्या भागात शिक्षक भरत असताना अनुसूचित जाती, अनुचूचित जमाती अशा सर्व सवंर्गानुसार पदे भरतो. अनुसूचित जमाती

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .....

या संवर्गातील शिक्षक धुळे, नंदूरबाबर जिल्ह्यातून येतात. कोकणातील बोलीभाषा वेगळी आहे आणि या शिक्षकांची मराठी भाषा असते. त्यामुळे ते शिक्षक मुलांना चाचपडत शिकवितात त्यामुळे विद्यार्थी त्यांची टिंगलटवाळी करतात. त्या ठिकाशी तो शिक्षक राहात नाही. त्या ठिकाणी नोकरीला लागल्याच्या दिवसापासून वशिला लावून कधी मी माझ्या भागात जाईन यादृष्टीने तो प्रयत्न करीत असतो. त्या भागातील ओ.बी.सी.असतील, अनुसूचित जातीचे शिक्षक असतील ते त्या ठिकाणी नेमावेत तसेच शिक्षक गावात राहतील अशा प्रकारचा प्रयत्न करावा अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, तालुक्याच्या ठिकाणी काही अतिशय चांगल्या प्रकारच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. आमच्याकडे कणकवली तालुक्यात वरवडे गावात सेंट उर्सुला शाळा आहे. त्या शाळेत 1200 मुले शिक्षण घेत आहेत तसेच गेली पाच वर्षे त्या शाळेचा 100 टक्के निकाल लागतो. त्यामुळे तालुका पातळीवर एका एका शाळेला तरी अनुदान द्यावे. या मोठ्या शाळा आहेत. त्या शाळांना अनुदान द्यावे अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो प्रस्ताव चर्चेला आणलेला आहे तो अतिशय महत्वाचा आणि महाराष्ट्रातील मराठी भाषेचा उत्कर्ष व्हावा यादृष्टीने प्रयत्न करणारा आहे. मी मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. आज महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: ग्रामीण भागामध्ये शिक्षणाची जी आबाळ होते त्यादृष्टीने मी माननीय शिक्षण मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांनी याकडे लक्ष केंद्रित करावे असा आग्रह मी धरणार आहे. कारण ग्रामीण भागात मुलांना जोडशब्द लिहिता येत नाही याबाबत सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी उल्लेख केला. मुलांना जोडशब्द लिहिता येत नाही तसेच बहुतांश शिक्षकांना सुध्दा जोडशब्द लिहिता येत नाहीत. मी एका मुलाला कर्तृत्व तसेच मातृसत्ताक हे शब्द लिहून दाखविण्यास सांगितले असता दोन्ही शब्द त्याला लिहिला आले नाहीत. मी शिक्षकांना विचारले की, ही मुले अशी का आहेत ? मुले जोडशब्द का लिहून दाखवू शकत नाहीत. ते म्हणाले की, मुले शिकतील. बिचारे चांगले आहेत. गरीब घरचे आहेत. हळूहळू त्यांचा उत्कर्ष होत जाईल. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी यादृष्टीने प्रयत्न करावा. ग्रामीण भागामध्ये गुणवत्तेची आगारे उघडी करण्याचे काम करावे. तरच हे सगळे शक्य होऊ शकेल. मराठीचिया नगरी, ब्रम्ह विद्येचा सुकाळ करी. आता ब्रम्हविद्या कशी येणार आहे ? नाही तर एकीकडे ब्रम्ह आणि विद्या दुसरीकडे असेच होण्याची शक्यता आहे.

यानंतर श्री. अजित शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले..

त्या दृष्टीने प्रयत्न करावा अशी आग्रहाची विनंती आहे.

परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांच्या मायमाऊली येतात आणि आपला मुलगा पास व्हावा यासाठी कॉपी त्याच्याजवळ कशी जाईल याची काळजी घेतात. आमच्या बीड जिल्ह्यात असे प्रकार जास्त आहेत. मी त्यांना सांगितले की आपण जे करीत आहात त्यामुळे आपल्या मुलाचे भविष्य धोक्यात येऊ शकते. हा ज्ञानेश्वरांचा मराठवाडा आहे. या ठिकाणी शिक्षणासंबंधीचे कोणतेही गैरकृत्य करु नका. तेव्हा राज्यात कॉपी करण्याचे प्रकार होत आहेत त्यास आळा घालण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत तसेच प्रबोधनही करावे अशी विनंती आहे. आमच्या जिल्ह्यात असे प्रकार सुरुच राहिले तर येथील विद्यार्थी पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबईतील विद्यार्थ्यांच्या स्पर्धेत टिकू शकणार नाहीत. तेव्हा विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि गुणवत्तेची इयत्ता ही सदासर्वकाळ राहिली पाहिजे. गुणवत्तेची इयत्ता पायदळी तुडवली जात असेल तर शासनाने त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

मराठी शब्दकोष हा महाकोष झाला पाहिजे. जगामध्ये येणारे नवनवीन शब्द आणि त्याचा स्वीकार करण्याची वृत्ती अंगी बाळगल्यामुळे इंग्रजी भाषा संपन्न झाली. आता जवळजवळ सर्व जगाने ती भाषा स्वीकारलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राजकोष निर्माण करुन त्यामध्ये फारशी, उर्दू शब्दांचा अंतर्भाव केला. एवढयावरच ते थांबले नाहीत तर त्या शब्दांचा त्यांनी दैनंदिन व्यवहारात वापर केला हे नाकारता येणार नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे धर्मवंत होते. छत्रपती शिवाजी महाराज आणि इतर राजे यांच्यामध्ये फरक होता. नेपोलियन राजा होता, सिकंदर राजा होता. परंतु इतरांची भूमी पादाक्रांत करणाऱ्या गिधाडी वृत्तीचे ते योध्दे होते. राजकोष निर्माण करणारे छत्रपती शिवाजी राजे हे खऱ्या अर्थाने धर्मवंत होते. तेव्हा अशा या धर्मवंत महाराष्ट्रामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावलावर पाऊल टाकले तर आमच्यासारखे सदस्य म्हणतील की, छत्रपती शिवाजी महाराजानंतर महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेवर प्रेम करणारा दुसरा छत्रपती निर्माण झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषा समृध्द होण्यासाठी प्रयत्न केले. शिवाजी महाराजांची अपेक्षा होती की, माझी मराठी भाषा समृध्द झाली पाहिजे. माननीय मंत्रिमहोदयांनी ती आणखी करण्याचा प्रयत्न केला तर महाराजांना सुध्दा आनंद झाल्याशिवाय राहणार नाही. एवढे बोलून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 97 अन्वये मराठी शाळांच्या संदर्भात अल्पकालीन चर्चा घडवून आणली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि त्या चर्चेचे समर्थन करतो.

सभापती महोदय, राज्यात आठ हजार शाळांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत त्यामध्ये माझ्या संस्थेचे सुध्दा दोन प्रस्ताव आहेत. मी शिक्षण संस्थाचालक आहे. माझ्या वडिलांनी 1950 मध्ये या शिक्ष्ण संस्था काढली. माझे वडील दोन्ही सदनाचे सदस्य होते. ते खासदारही होते. त्या काळामध्ये शिक्षणाची गरज ओळखून त्यांनी शाळा काढल्या होत्या. त्यांचे अनुकरण करुन मी या शिक्षण संस्था चालवित आहे. मराठी शाळांचे दु:ख काय आहे माझ्यापेक्षा जास्त कुणाला माहीत नसेल असे मला वाटते. गरीब माणसाला शिक्षण कसे मिळाले पाहिजे याची आम्ही काळजी घेतलेली आहे. आज प्राथमिक शाळा कशा चालविल्या जातात याचा मला अनुभव आहे. मी तीन वर्षे प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून काम केले आहे.

जिल्हापरिषदेच्या शाळांच्या इमारतीसाठी कधीही निधी देण्यात येत नाही. नवीन शाळा बांधण्यासाठी निधी मिळतो, परंतु दुरुस्तीसाठी निधी मिळत नाही. त्यामुळे काही शाळांच्या इमारतींची अतिशय वाईट अवस्था झालेली आहे. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी जागा नसते. शिक्षकांची अवस्था तर अतिशय कठीण आहे. एकेकाळी बियरबारच्या दुकानात ठेकेदार दिसायचे. परंतु पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगामुळे शिक्षकांच्या मोटारसायकली बियरबारच्या दुकानाबाहेर दिसतात. मराठीच्या शिक्षकाने मराठी भाषेचा सन्मान केला पाहिजे अशातऱ्हेची आचारसंहिता असली पाहिजे. तत्कालीन शिक्षणमंत्र्यांनी त्यास मान्यता सुध्दा दिली होती. परंतु मंत्रालयातील शिक्षण विभागातील हेकेखोर कक्ष अधिकाऱ्यामुळे त्यास मान्यता मिळाली नाही. आमच्या येथे कलपात्री प्रकल्प झाला. चोपा विद्यालयापासून दीड कि.मी.अंतरावर रवींद्र विद्यालय आहे. या शाळांचे विभाजन करण्याची मी परवानगी मागितली. मी त्यांना सांगितले की त्यासाठी वेगळ्या शिक्षकाची आवश्यकता नाही, मुख्याध्यापकांची आवश्यकता नाही फक्त शाळांचे विभाजन करण्याची परवानगी मागितली. परंतु शासनाने तशी परवागनी दिली नाही. त्याठिकाणी कलपात्री प्रकल्प झाल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय झाली.

यानंतर श्री.खंदारे..

अशुद्धलिखित प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

परंतु या शासनाने त्याला मान्यता दिली नाही. तेथील एक संस्था बंद झाल्यावर भंडारा जिल्हयातील एका संस्थेला लक्ष्मी दर्शनाच्या माध्यमातून परवानगी दिली. त्यामुळे मी उच्च न्यायालयामध्ये गेलो होतो. उच्च न्यायालयामध्ये मला न्याय मिळाला. परंतु आता सरकार काय करणार आहे ते पहावयाचे आहे. या सरकारने शिक्षण क्षेत्राचे वाटोळे केलेले आहे, शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात भ्रष्टाचार वाढला आहे. तो कधीही न संपणारा आहे. त्यामुळे शिक्षणासाठी आचारसंहिता असावयास पाहिजे. मी उच्च न्यायालयात यासाठी गेलो होतो की, जुनी संस्था बंद होण्याच्या स्थितीत होती. परंतु मी शासनाचे अभिनंदन करतो. शासनाने तुकडयांची क्षमता 25 आणि डोंगराळ भागामध्ये 15 केली आहे. शिक्षणासारख्या विषयावर कमी खर्च केला आहे ते लक्षात येते. याला सरकारचे धोरण कारणीभूत आहे. मराठीच्या तुकडया कमी होत होत्या म्हणून शिक्षकांना जीवंत ठेवण्यासाठी हा निर्णय शासनाला घ्यावा लागला. त्यासाठी काही निकष नाही. बृहत आराखडयानुसार 5 कि.मी.अंतरावर शाळा असण्याची अट आहे, परंतु ही अट पाळली जात नाही. 1.5 कि.मी.अंतरावर शाळेला परवानगी दिली जाते ही शोकांतिका आहे. जवळच्या भागात शाळा देणे योग्य नसले तरी विशेष बाब म्हणून काही ठिकाणी निर्णय घेण्याची आवश्यकता त्याप्रमाणे या कलपात्रीच्या प्रकल्पामध्ये रविंद्र विद्यालयाचे विभाजन करुन विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याची गरज होती. आम्ही काहीही मागितले नव्हते, शिक्षक मागितले नव्हते. परंतु सरकारने आम्हाला न्याय दिला नाही. हे मला खेदाने बोलावे लागते.

सभापती महोदय, शिक्षकांसाठी आचारसंहिता असावयास पाहिजे, त्यांनी त्याचे पालन केले पाहिजे. मराठी शिक्षण शिकविणारा शिक्षक प्रामाणिक असावयास पाहिजे. त्यांनी नियमितपणे शाळेत गेले पाहिजे. परंतु असे कधीही घडत नाही, अशी स्थिती आहे. याठिकाणी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा उल्लेख करण्यात आला आहे. मी इंग्रजीच्या विरोधात नाही. माझ्या शिक्षण संस्थेमध्ये के.जी. ते पी.जी.पर्यंतचे शिक्षण दिले जाते. परंतु मी के.जी.ला शिकवित असताना मी मराठीचा एक विषय शिकवितो. माझ्या विद्यार्थ्यांना मी मराठी शिकवितो. ज्यांचा दुय्यम विषय हिंदी असेल तर त्यांना मी हिंदी हा विषय शिकवितो. माझ्या संस्थेमधील के.जी.च्या विद्यार्थ्यांकडून 60

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

रुपये फी घेतली जाते. मोठया शहरामध्ये 25-30 हजार रुपये डोनेशन द्यावी लागते. माझ्या नातवाला पुणे येथे प्रवेश घेत असताना त्या संस्थेला किती डोनेशन द्यावे लागले होते हे माझे मलाच माहीत आहे. तेथील स्थानिक आमदारांची मला मदत घ्यावी लागली होती अशी अवस्था आहे.

मला असे म्हणावयाचे आहे की, इंग्रजी विषयासंबंधी निश्चित धोरण असले पाहिजे. बीएड, डीएड, तंत्रशिक्षण मध्ये शिक्षण घेण्यासाठी फी निर्धारण समिती नेमलेली आहे. त्याप्रमाणे इंग्रजी माध्यमातील सर्व संस्थांच्या संदर्भात फी निर्धारण समिती नेमली पाहिजे. त्यांनी कोणत्याही समाजाकडून डोनेशन घेऊ नये. हा भ्रष्टाचार थांबविला पाहिजे. शिक्षणाला मदत करण्यासाठी राज्यपालांच्या अभिभाषणात व बजेटमध्ये जुन्या शिक्षण संस्थांना मदत करण्यासाठी तरतूद केली आहे. तत्कालीन आदरणीय मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी भवभूती शिक्षण संस्थेचे आदर्श विद्यालय, आमगांव या शाळेच्या रजत जयंतीच्या निमित्ताने 25 हजार रुपयांचे अनुदान दिले होते. त्या संस्थेचा सचिव म्हणून मी माननीय श्री.शरद पवार यांचे अभिनंदन करतो. परंतु माझी एक मागणी आहे की, स्वातंत्र्योत्तर काळात मराठी शाळा उघडल्या त्यांना आता 60-70 वर्षे झाली आहेत. ज्या शाळांना 50 वर्षापेक्षा जास्त काळ झालेला आहे त्या सर्व संस्थांना जशी बाकीच्या संस्थांना मदत केली आहे तशी या संस्थांना आर्थिक मदत शासन करणार काय ? माध्यमाच्या मुलांना शिष्यवृत्ती दिली जाते. शिक्षकांना पाचवा व सहावा वेतन आयोग लागू केला जातो. परंतु खाजगी शाळेतील वेतनेतर अनुदान मागील 4 वर्षांपासून मिळालेले नाही. मागील 4 अधिवेशनाच्या काळापासून मी वाट पहात आहे. मागील 7 वर्षांपासून शासनाकडून कोणतीही मदत मिळालेली नाही ही निषेधार्ह गोष्ट आहे. हे वेतनेतर अनुदान शासन जाहीर करणार होते. या अधिवेशनाच्या शेवटच्या आठवडयात त्याबाबतचा प्रस्ताव शासनाने जाहीर करावा अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

यानंतर श्री.शिगम.....

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मराठी शाळांना मान्यता न देण्याच्या सरकारच्या धोरणाच्या संबंधात नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या शिक्षणासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत कोटयवधी रुपये खर्च केले जातात. या अभियानांतर्गत शिक्षणाचा दर्जा सुधारावा यासाठी शिक्षकांसाठी विविध उपक्रम राबविले जातात, प्रशिक्षण कार्यक्रम असतात. इतके असूनही शाळांचा दर्जा हा खालावलेलाच असतो. परिस्थिती अशी आहे की, जिल्हा परिषदेच्या शाळातील बहुतांशी सर्वच शिक्षक आपल्या मुलांना खाजगी शाळांमध्ये शिकण्यासाठी पाठवितात. याचाच अर्थ असा होतो की, जिल्हा परिषदेच्या शाळांमधून चांगल्या प्रकारचे शिक्षण दिले जात नाही. म्हणून माझी शासनाला अशी विनंती आहे की, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिकविणा-या शिक्षकांची मुले जिल्हा परिषदेच्याच शाळांमध्ये शिकतील अशी अट घालण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आजकाल इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे सर्व ठिकाणी पेव फुटलेले आहे. या इंग्रजी शाळांमधून धर्म, परंपरा, संस्कृती यावर गदा आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील रोझरी इंग्लिश स्कूलमध्ये आणि इतरही अनेक इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मुलींना हातात बांगडया घालणे, टिकली लावणे, मेहंदी लावणे इत्यादी गोष्टींसाठी मज्जाव केलेला आहे. पालकांनी आपल्या मुलींना हातात बांगडया भरुन शाळेत पाठविले तर तेथील शिपाई अथवा बाई त्यांच्या हातातील बांगडया काढून घेतात. अशा प्रकारच्या तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत. अशा प्रकारे इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून दुस-या धर्माचा अनादर करणे आणि आपल्या धर्माचा प्रसार करणे योग्य नाही. या इंग्रजी शाळांमध्ये कोणत्याही राष्ट्रपुरुषांचे फोटो लावले जात नाही की शिवाजी महाराजासारख्या थोर पुरुषांची थोरवी सांगितली जात नाही. आम्हाला लहानपणापासून शाळेतून सरस्वती पूजन शिकविले गेले. ते संस्कार आमच्यावर झालेले आहेत. आज या शाळांतून अशा प्रकारचे मुलांवर चांगले संस्कार करणारे शिक्षण दिले जात नाही. आपला मुलगा मोठा व्हावा, त्याला चांगले मिळावे यासाठी अशिक्षित पालकसुध्दा आपल्या मुलांना अशा शाळेत घालतात. परंतु शाळांतील या प्रकाराबद्दल या पालकांनी तक्रार केली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. परशुराम उपरकर...

तर त्या पालकांशी इग्रंजीमध्येच बोलून पालक शाळेत आल्याबद्दल मुलांची कानउघडणी केली जाते. माझ्याकडे याबाबतीत तक्रारी आल्यानंतर मी यासंदर्भात विचारणा केल्यानंतर पुण्याच्या मिशनकडून मुलींनी शाळेत बांगडया घालून येऊ नयेत, टिकली लावून येऊ नये अशा प्रकारच्या सूचना असल्याचे सांगण्यात आले. तेव्हा अशा प्रकारे धार्मिक आणि सांस्कृतिक प्रथा परंपरावर गदा येणार असेल तर ते कुठे तरी थांबविण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आता सर्वच ठिकाणी जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असते. विद्यार्थी 10वीची परीक्षा पास वैद्यता प्रमाणपत्र मिळविण्याच्या मागे लागतो. परंतु ते त्याला वेळेत मिळत नाही परिणामी त्याला आरक्षणाचा लाभ मिळत नाही आणि त्याचे नुकसान होते. म्हणून माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, ज्या ज्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना पुढे जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असते अशा विद्यार्थ्यांना 5 वी पासून जात वैधता प्रमाणपत्रे मिळण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागाने प्रयत्न करावेत, जेणे करुन त्या विद्यार्थ्याला पुढे 11वी मध्ये किंवा पुढच्या शिक्षणासाठी प्रवेश मिळण्यासाठी अडचण येणार नाही. आता परिस्थिती अशी आहे की, विद्यार्थी 10 वी पास झाल्यानंतर त्याला 11वीमध्ये प्रवेश घेताना जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी खूप नाचानाच करावी लागते तरी देखील जात वैधता प्रमाणपत्र त्याला वेळेवर मिळत नाही. म्हणून विद्यार्थी 5वी किंवा 7वी मध्येच शिकत असताना त्याला जात वैधता प्रमाणपत्र कसे मिळेल यादृष्टीने शिक्षण विभागाने गांभीर्याने विचार करुन त्यासंदर्भात कोणती कार्यवाही शासन करणार याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणामध्ये करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये मराठी शाळांच्या संदर्भात जी चर्चा या ठिकाणी सुरु आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय सभागृहासमोर आलेला आहे. खरे म्हणजे महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेकरिता आणि मराठी शाळांकरिता सभागृहामध्ये अशा प्रकारची चर्चा उपस्थित करावी लागणे हे एक दुर्दैव आहे. हे महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. यावर्षामध्ये शासनाने मराठी भाषेला आणि मराठी शाळेला प्रोत्साहन द्यायला पाहिजे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

खरे म्हणजे मराठी भाषा संतांनी एवढी समृध्द करुन ठेवली की, संतांनी मराठी भाषेच्या माध्यमातून जनतेवर संस्कार केले. या भाषेमध्ये गोडवा आहे. पूर्वी मराठी भाषेतून लोक शिकत होते. आज या बाबतीत शासनाचे जे धोरण आहे ते ना धड मराठी, ना धड इंग्रजी असे आहे. नक्की काय करायचे हे धोरण, ही मानसिकता स्पष्ट झाली पाहिजे. मराठी शाळांना प्रोत्साहन द्यायचे आहे की नाही हे पहिल्यांदा शासनाने निश्चित केले पाहिजे. आज अनेक ठिकाणी मराठी शाळा बंद होताना दिसतात. मराठीमध्ये योग्य शिक्षण मिळत नाही म्हणून इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेतला जातो. इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश केल्यानंतर तेथे प्रचंड फी द्यावी लागते, डोनेशन द्यावे लागते. माझ या मुलाला तुमच्या शाळेत प्रवेश मिळावा यासाठी आजच्या पालकांना बालक जन्माला येण्यापूर्वीच प्रवेशासाठी बुकिंग करावे लागते. या परिस्थितीला शासनच कारणीभूत आहे. शासनाने नक्की धोरण ठरविले पाहिजे. मराठी शाळांना ताकद द्यायची की नाही? मराठी माध्यमांच्या शाळांना सर्व प्रकारची मदत द्यायची की नाही? आज कोकणातील दुर्गम भागामध्ये त्या त्यावेळच्या समाज धुरिणांनी शाळा सुरु केल्या, स्वत:चे सोने गहाण ठेवून शाळा उभ्या केल्या. आपल्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी निष्ठेने प्रयत्न केले. आज वेतनेतर अनुदान नाही, अनुदान नाही असे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर उभे ठाकले आहेत. जणूकाही मराठी शाळा बंद करण्याचा डाव टाकला जात आहे की काय? असे वाटू लागले आहे. इंग्रजी शाळा आहेत तेथे प्रचंड प्रमाणात शोषण चालले आहे. त्यांना कल्पना आहे की, विद्यार्थी कुठे जाणार आहेत? फी मध्ये वाढ करणे, दबाव आणणे, शिक्षकांना वेगळ्या चलनावर सही घेऊन वेगळे वेतन दिले जाणे अशा प्रकारे शोषण केले जात आहे. या संदर्भात अनेक विषय निर्माण झाले आहेत. जिल्हा परिषदा, महापालिका आणि नगरपालिकांच्या ज्या शाळा आहेत त्यांना बळकटी देता येऊ शकते. सर्व संबंधित लोकांना सोबत घेऊन या शाळांमधील मुलांना चांगले शिक्षण कसे देता येईल, कशा पध्दतीने मराठी शाळांमध्ये प्रवेशाचा ओढा निर्माण होईल यादृष्टीने शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी देखील प्रयत्न केले पाहिजेत. शाळांच्या मुल्यांकनाची जबाबदारी शासनाने स्वीकारली पाहिजे. शासन ही जबाबदारी घेणार आहे का याची स्पष्टता झाली पाहिजे. मराठी माध्यमाच्या शाळांची अवस्था काय आहे? त्या शाळांमधील इन्फ्रास्ट्रक्चर महत्वाचे आहे. त्याबाबत शासन काय करणार आहे? 6 ते 14 वयोगटासाठी मुलभूत शिक्षण देणारे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

विधेयक आणले आहे. परंतु 3 ते 6 या वयात म्हणजे जन्माला आल्यानंतर अडीच वर्षानंतर छोटा शिशू, मोठा शिशू म्हणतो त्या पूर्वप्राथमिक शिक्षणाची सोय या राज्यामध्ये केली जाणार आहे का? बालकांचा पाया तेथून सुरु होतो. त्यानंतर मग ही मुले पुढच्या शिक्षणाकडे वळतात. 6 ते 14 वयोगटाच्या मुलांना मुलभूत शिक्षण देण्यासाठी जे विधेयक आले आहे, त्या अलिकडे म्हणजे पूर्वप्राथमिक शिक्षणाची सोय होणार आहे का? हा प्रश्न निर्माण झाला आहे. मराठी माध्यमाच्या शाळांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, त्यापैकी आता ज्या शाळा सुरु आहेत त्यांना मान्यता दिली पाहिजे. त्या संदर्भात काही धोरण निश्चित केले पाहिजे. अन्यथा इंग्रजी शाळांचे पेव फुटेल आणि ना धड इंग्रजी, ना धड मराठी अशी स्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे या विषयाबाबत शासनाने ठोस भूमिका घेतली तर निश्चितपणे खात्री आहे, ज्याप्रमाणे पूर्वी मराठी शाळा वाढत

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

होत्या, मराठी शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढत होती ती स्थिती पुन्हा निर्माण होऊ शकेल. मराठी शाळांमध्ये शिकलेली मुले निरनिराळया क्षेत्रात चमकत होती, आजही ती चमकत आहेत. परंतु त्यांना ताकद दिली पाहिजे. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने शासनाने शैक्षणिक धोरण आखावे अशा प्रकारची मागणी करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलताना महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे स्मरण करुन माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे. शिक्षणाचे जे खाजगीकरण झाले, मुक्त अर्थव्यवस्थेचा दुष्परिणाम शिक्षणावर झाला त्याचे खरे परिणाम आपण भोगत आहोत. म्हणून पहिल्यांदा शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे, सार्वत्रिकीकरण झाले पाहिजे. सर्वांसाठी खुले केले पाहिजे. 6 ते 14 वयोगटातील मुलांसाठी मुलभूत अधिकार म्हणून शिक्षण देण्याचा निर्णय घेतला.

नंतर के.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

महाराष्ट्र शासनाने शिफारस करुन 6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत शिक्षण देण्यासंबंधीचा जो निर्णय केंद्रशासनाने घेतला आहे त्याऐवजी 0 ते 14 वयोगटातील मुलांना शिक्षण दिले पाहिजे अशी मागणी करावी. एकीकडे आपण आंतरराष्ट्रीय पातळीवरुन शिक्षणाची दारे खुली करतो आणि बाहेरील देशाच्या विद्यापीठांना आपल्या देण्यात येण्याची सवलत देतो आणि दुसरीकडे मात्र मराठीच्या शाळांना अनुदान देत नाही असा विरोधाभास आहे. म्हणून महाराष्ट्र शासनाने यासंबंधी घेतलेली भूमिका ही शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांशी सहमत असणारी नाही. या निमित्ताने मी अशी विनंती करणार आहे की, शासनाने मराठी शाळांना मान्यता न देण्याबाबतचा जो निर्णय घेतलेला आहे त्याचा फेरविचार केला पाहिजे. कुठलेही शिक्षण हे मानवी मूल्य जपणारे आहे की नाही, व्यक्तिमत्व विकास करणारे आहे की नाही तसेच त्यातून राजकीय, सामाजिक, नैतिक आणि आर्थिक मूल्ये किती निर्माण होतात या गोष्टीचे शेवटी परिणाम बघणे आवश्यक आहे. तसेच अशा प्रकारचे शिक्षण देणाऱ्यांमध्ये सध्याची शिक्षण पध्दती ही परीक्षेचे गूण तपासणारी पध्दती आहे, सामाजिक मानव, परिपूर्ण माणूस कसा निर्माण होईल अशा प्रकारची निर्मिती करणारी शिक्षण पध्दती नाही. तेव्हा महाराष्ट्र शासनाने एक पूरोगामी धोरण घ्यावे आणि सध्याची प्रचलित शिक्षण पध्दती पूर्णपणे बदलावी. त्यातूनच खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्व विकास, सामाजिक मूल्ये जपली जातील आणि त्यातून तयार होणारा माणूस देशाच्या विकासाला निश्चितपणे हातभार लावेल अशी शिक्षण पध्दती तयार करणे गरजेचे आहे.

महोदय, महाराष्ट्र शासनाने मराठीच्या शाळांना मान्यता नाकारली त्यामुळे सर्वात जास्त नुकसान वाड्या-तांड्यांमध्ये तसेच ग्रामीण भागात राहणाऱ्या मुलींचे झालेले आहे. कारण कुठल्याही परिस्थितीत ग्रामीण भागातील किंवा वाड्या-तांड्यांमध्ये राहणाऱ्या मुलींना बाहेर शिक्षणासाठी हे लोक ठेवण्यास तयार होत नाहीत म्हणून त्यांच्या शिक्षणावर जास्त दूरगामी परिणाम झालेला आहे. त्यादृष्टीने शिक्षणाच्या क्षेत्रात मराठीचा सहभाग, महिलांचे सक्षमीकरण, सावित्रीचे स्वप्न पूर्ण करावयाचे असेल तर पुन्हा या मराठी शाळांबाबतचा निर्णय शासनाला घ्यावा लागेल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

महोदय, या अनुषंगाने अजूनही किती तरी प्रश्न निर्माण होतात. त्यात प्रामुख्याने ग्रामीण भागातील संगणकाचे अज्ञान. कारण कंप्युटर एज्युकेशन हे मोठ्या नगरांमध्ये, शहरांमध्येच दिले जाते त्यामुळे शिक्षणाची ही दरी निर्माण झाली आहे. पण नेतृत्व विकास करण्यासाठी ग्रामीण भागातील मुले पुढे येऊ शकणार नाही. संपूर्ण शहरी पगडा त्याच्यावर बसला आहे. अशा परिसिथतीत नेतृत्व करणारे प्रशासन, न्याय व्यवस्थेतील तसेच त्यांचे नेतृत्व करण्यासाठी ग्रामीण भागातील नेतृत्व उदयास आले नाही तर ग्रामीण भागातील प्रश्न सोडविणार ? असा प्रश्न निर्माण होतो. म्हणून शिक्षणामध्ये क्रयशक्ती हा फार महत्वाचा फॅक्टर आता पुढे येत आहे. कारण शिक्षण विकत घेण्याची कॅपेसिटी आहे तोच शिक्षण घेऊ शकतो अशी परिस्थिती आहे. आपण इंग्रजी शाळांना मान्यता दिली पाहिजे पण त्या शाळांना अनुदानित तत्वावर मान्यता दिली पाहिजे आणि अशा शाळांमधून शिक्षण मोफत दिले पाहिजे. कारण विना अनुदानित तत्वावर अशा इंग्रजी शाळांना मान्यता दिली तर मोलमजुरी करणारे, करवंद विकणारी, खुरपायला जाणारी महिला तसेच शेतमजुरी करणारी, मोळी विकून पोट भरणारी माणसे यांचे एक्स्प्लॉयटेशन होणार. ते आपल्या मुलांना इंग्रजी शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी पाठवू शकत नाही. कारण त्यांची क्रयशक्ती नसते. अशा पध्दतीने शिक्षणाचा बाजार मांडणे हे अत्यंत चुकीचे आहे. ज्या ज्ञानेश्वरांनी भगवत गीता प्राकृतमध्ये लिहिली व सामान्यांपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला नेमके त्याच्या उलट आपण हे करीत आहोत. त्यामुळे पुन्हा आपण मनुवादाकडे चाललो की काय अशी शंका येते. म्हणून मुठभरांची जी मक्तेदारी या शिक्षण पध्दतीत आहे ती प्रथा कुठल्याही परिस्थितीत मोडून काढली पाहिजे. कारण सध्याच्या परिस्थितीत आपण फक्त कारकून निर्माण करतो, गुलाम निर्माण करतो, मानसिक गुलाम निर्माण करतो आणि स्वत:ची बुध्दी विकून पोटाची खळगी भरणारी माणसे निर्माण करतो. पण देशाच्या विकासामध्ये सामाजिक दृष्ट्या सहभागी होणारी माणसे निर्माण करावयाची असतील तर शिक्षणाचे राष्ट्रीयकरण करुन शिक्षणावर 6 टक्के खर्च केला पाहिजे आणि मराठी शाळा पुन्हा निर्माण करण्यासंबंधीचा निर्णय घेतला पाहिजे अशी प्रतिक्रिया देऊन माझे भाषण पूर्ण करते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांना मी मनापासून धन्यवाद देतो. कारण आजच्या चर्चेचा संपूर्ण सार त्यांनी अत्यंत सुंदर प्रकारे विशद केला, अप्रतिम पध्दतीने त्यांनी सांगितले आहे. माझे फक्त दोनच मुद्दे आहेत. ते म्हणजे माझे भाषण संपल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितले होते की, इंग्रजी ही जगाची भाषा आहे आणि त्याचा परिणाम अनेक भाषांवर दुर्दैवाने झाला आहे. या अनुषंगाने मी एवढे निदर्शनास आणणार आहे की, एकूण जगाची लोकसंख्या 650 कोटी असून त्यात इंग्रजी भाषा मातृभाषा असणारे फक्त 4 कोटी लोक आहेत आणि इंग्रजी भाषा मोडकी-तोडकी तर काही प्रमाणात चांगली बोलणारे 52 कोटी लोक आहेत. जगातील एकूण 143 देशात एकही इंग्रजी शाळा नाही तसेच इंग्रजी शिकविले जात नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

इंग्रजी भाषा शिकविण्याचे कंपल्शन भारता व्यतीरिक्त कोठेही नाही. भारतसोडून दुसऱ्या देशात इंग्रजी भाषा ही कामापुरती वापरली जाते. जगात सर्वात जास्त चीनची मन्डारिन भाषा वापरली जाते. कोरिया,तैवान, मंगोलिया, चीन आणि रशियाच्या काही भागातील लोक असे एकूण 225 कोटी लोक मन्डारिन भाषा वापरतात. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेर मराठी भाषा समजणारे, बोलणारे एकूण 25 कोटी मराठी भाषिक आहेत, हे मी मुद्दाम नमूद करतो. त्याच वेळेला इंग्रजी भाषेच्या संदर्भात या ठिकाणी जे भाष्य झाले त्यासंदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, पुण्यामध्ये सर्वात जास्त इंग्रजी माध्यमांच्या शाळा आहेत व सर्वात जास्त दारुची दुकाने लातुरमध्ये आहेत. जास्त काय आहे तर त्याची तुलना अशी आहे की, पुण्यामध्ये सर्वात जास्त इंग्रजी माध्यमांच्या शाळा असल्याचा परिणाम असा झाला की, पुण्याचे विद्यार्थी 80 वर्षे सतत महाराष्ट्रात परीक्षेमध्ये प्रथम येत होते परंतु आता पुण्याचा एकही विद्यार्थी महाराष्ट्रातून परीक्षेमध्ये प्रथम येत नाही. 1980 पर्यंत 100 च्या गुणवत्ता यादीत 90 ते 95 टक्के विद्यार्थी हे पुण्याचे असायचे आणि 5 टक्के विद्यार्थी हे इतर महाराष्ट्रातील असायचे. सर्वात जास्त इंग्रजी शाळा असलेल्या पुण्याच्या नंतर शैक्षणिक अधोगती झालेली आहे, हे मी मुद्दाम नमूद करतो.

सभापती महोदय, जगामध्ये दुस-या क्रमांकाची भाषा ही स्पॅनिश असून जगातील 85 कोटी लोक स्पॅनिश भाषा वापरतात. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी या विषयाच्या संदर्भात काल जे विचार मांडले आहेत, त्यामुळेच मी या ठिकाणी माझ्याकडे असलेला संदर्भ नमूद केलेला आहे. मला आपण पुन्हा बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मला आनंद आहे. सदनात आपण जे काही वक्तव्य करतो त्याचे परिणाम बाहेर उमटत असतात. माननीय उध्दवजी ठाकरे यांनी मला सकाळी फोन करुन सांगितले की, विधान परिषदेत शिक्षणावर सुंदर चर्चा सुरु आहे. यासंदर्भात मला जे पत्र फॅक्स करुन माननीय उध्दवजी ठाकरे यांनी पाठविले आहे, ते पत्र मी आपल्याकडे पाठवितो तसेच जो फॅक्स आलेला आहे तो मी या ठिकाणी वाचून दाखवितो. सकाळी या ठिकाणी आल्याबरोबर माझ्याकडे या कार्यालयाचे एक परिपत्रक आलेले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम 11 एप्रिल रोजी सकाळी 10.00 वाजता ठेवलेला आहे. माझ्या हातात माननीय उध्दवजी ठाकरे यांचे पत्र आहे ते वाचून दाखविल्यानंतर आपल्याला महात्मा फुले यांना पुष्पचक्र अर्पण करण्याचा अधिकार

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आहे की नाही याचा विचार करुन त्यांना पुष्पचक्र अर्पण करावे, अशी माझी आपल्याला विनंती करावयाची आहे. माननीय उध्दवजी ठाकरे यांनी शिक्षणाच्या विषयाच्या संदर्भात जे पत्र मला पाठविलेले आहे ते मी आपल्याला वाचून दाखवितो.

"मराठी शाळांचे अस्तित्व टिकविण्याबाबत या विषयाला अनुसरुन कळवितो की खाजगी अनुदानित, विना अनुदानित प्राथमिक शाळांना समाज कल्याण विभागाकडून येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी गेल्या दोन वर्षापासून न मिळाल्याने शाळा आर्थिक अडचणीत आल्या आहेत. दि. 20.1.2010 परिपत्रक क्र. सकअ/मुं/आस्था 2009-10/प/195 नुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी मासिक रु. दोन, अडीच, तीन, साडेतीन अशीच देण्यात येईल. त्या फीमध्ये शिक्षकांचे वेतन, शालेय इतर खर्च परिपूर्ण होणार नाही, विद्यार्थ्यांकडून फी मागितली तर मराठी शाळा बंद होतील. वयाच्या 14 वर्षापर्यंत विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणे हे सरकारचे धोरण असताना प्राथमिक शिक्षण ही मुंबई महानगर पालिकेची जबाबदारी आहे. मराठी शाळा जर बंद झाल्या तर मराठी शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्याची नोकरी गमवावी लागेल. तरी आपण समाज कल्याण अधिकारी व लोकप्रतिनिधी यांना आदेश देवून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फी चा प्रश्न लवकरात लवकर सोडवावा व मुंबईमधील बंद होणाऱ्या मराठी शाळा वाचवाव्यात, ही नम्र विनती ".

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी गेल्या 4-5 वर्षापासून दिलेली नाही. त्यामुळे आम्ही महात्मा ज्योतिबा फुले यांना कशासाठी पुष्पचक्र अर्पण करावयाचे ?

सभापती महोदय, मला या ठिकाणी माननीय उध्दवजी ठाकरे यांनी हा विषय मांडण्यास सांगितले होते. हा विषय मांडण्याची आपण संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

.....

यानंतर श्रीमती रणदिवे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री.बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते आणि सन्माननीय सदस्य श्री.भगवानरावजी साळुंखे यांच्या माध्यमातून मराठी भाषा, मराठी शाळांची परिस्थिती यावर एकत्रित पध्दतीने चांगल्या प्रकारची चर्चा घडवून आणली आणि या चर्चेमध्ये विविध सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते आणि सन्माननीय सदस्य श्री.भगवानरावजी साळुंखे यांचे आभार मानतो की, त्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेच्या माध्यमातून चांगल्या प्रकारची चर्चा झालेली आहे.

सभापती महोदय, याठिकाणी या विषयावर सन्माननीय सदस्यांनी चर्चा करत असताना आपापली अनेक मते मांडली आहेत. त्यामधून आतापर्यंत राज्याचे असलेले शैक्षणिक धोरण आणि पुढे कशा पध्दतीने वाटचाल करावी यापध्दतीचे एक सूत्र सापडत आहे असे मला वाटते. खरे म्हणजे महाराष्ट्राची संपूर्ण भौगोलिक परिस्थिती पाहिली तर कोकणापासून ते भंडाऱ्यापर्यंत, मुंबई असेल, पुणे असेल किंवा नागपूर इ.महानगरे आणि अशा प्रकारे एकत्रितपणे महाराष्ट्र पाहिला तर येथील विविधतेमध्ये सुध्दा काही गोष्टी दडलेल्या आहेत हे आपल्याला नाकारता येणार नाही. परंतु महाराष्ट्राच्या दृष्टीने मराठी भाषा ही अत्यंत महत्वाची आहे. भाषिक राज्याची पुनर्रचना होत असताना महाराष्ट्र हे मराठी भाषिक राज्य निर्माण करण्यात आले आणि मराठी भाषेच्या बाबतीत महत्वाची गोष्ट म्हणजे या भाषेला मोठी थोर परंपरा आहे. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहीली, संस्कृत भाषेतील गीतेचे प्राकृत भाषेमध्ये रुपांतर केले आणि त्यातून मराठी भाषेचे अनेक दरवाजे उघडल्याचे आपल्याला दिसून येते. परंतु आपण संत ज्ञानेश्वरीतील मराठी भाषा पाहिली, जरी एक पसायदान वाचले तरी आपल्या लक्षात येते की, संत ज्ञानेश्वरांच्या कालखंडामध्ये मराठी भाषेला आज हे स्वरुप प्राप्त होण्यामध्ये शंभर वर्षाची परंपरा सुध्दा कारणीभूत आहे आणि त्यातूनच ती भाषा समृध्द होत गेली आहे आणि ज्ञानेश्वरीमध्ये ही भाषा एवढी समृध्द आहे की, आज आपण पसायदानामध्ये कोणतीही चूक काढू शकत नाही, एका शब्दाचीही चूक काढू शकत नाही एवढी ताकद त्यामध्ये निर्माण झाल्याचे आपल्याला सर्वांना दिसते. आपण त्यानंतरच्या सर्व पंरपंरा पाहिल्या तर सर्व संतांनी ही परंपरा आणखी पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसते. एवढेच नाही तर मराठी भाषेमध्ये अनेक लेखक, कवी झाले आहेत. त्यामध्ये कुसुमाग्रज यांची कविता असेल किंवा ना.धों.महानोर यांची कविता असेल किंवा छोट्या-मोठ्या कवींची कविता असेल, त्यामधून आपल्या भावना व्यक्त करण्याची जी ताकद मराठी भाषेमध्ये आलेली आहे, ती नाकारता

. . . .एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येत नाही. मराठी भाषेची दखल घेत असताना सांगावेसे वाटते की, जेव्हा अनेक कवितांचे रुपांतर इतर भाषांमध्ये होते, त्यावेळेस मराठी भाषेची ताकद किती मोठी आहे हे लक्षात येते आणि मराठी भाषेने ती ताकद मिळविलेली आहे असे अनेक साहित्यिक आहेत.खरे म्हणजे जेवढी नावे घ्यावीत तेवढी कमीच आहेत, एवढे मोठे साहित्यिक या भाषेने दिलेले आहेत, विविध ग्रंथ दिले आहेत आणि त्या माध्यमातून जागतिक पातळीवरील साहित्याचे एक समृध्द दालन निर्माण करण्याचे काम मराठी भाषेने केले हे नाकारता येणार नाही. अशा वेळी मला हे देखील सांगितले पाहिजे की, भाषा समृध्द होत होती, त्याबरोबरच शैक्षणिक प्रचार आणि प्रसार मोठया प्रमाणात होणे आवश्यक होते. त्याबाबतीत जर संपूर्ण देशामध्ये कोणी पुढाकार घेतला असेल तर तो महाराष्ट्राने घेतल्याचे दिसून येईल. याठिकाणी याविषयावर खूप चांगल्या पध्दतीने चर्चा झाली. त्यावेळी सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी सांगितले की, स्वत: शिवाजी महाराजांना सुध्दा भाषेच्या बाबतीत एवढी रुची होती की, इतर भाषेतील काही चार चांगल्या गोष्टी स्विकाराव्यात आणि त्या माध्यमातून मराठी भाषा समृध्द बनवावी असा विचार त्यावेळेस त्यांनी मांडला होता. त्याचबरोबर महात्मा फुले असतील किंवा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले असतील, महर्षी धोंडो केशव कर्वे असतील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री.भाऊराव पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख या सगळया मंडळींनी ज्या काळामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला नव्हता, त्यावेळेस तो प्रसार समाजातील शेवटच्या माणसापर्यंत केला आणि मुलींना शिक्षण देण्याच्या बाबतीत दिशा देण्याचे काम केले आहे. गाडगे महाराज असतील किंवा तुकडोजी महाराज असतील यांनी आपल्या किर्तनातून असा प्रचार केला की, तुम्ही शिका. यावरुन आपल्याला हे स्पष्ट दिसते की, महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा जो प्रचार झालेला आहे, त्यामधून अनेक चांगली कामे झालेली आहेत हे नाकारता येणार नाही. यामध्ये या राज्यातील जे सर्व माननीय मुख्यमंत्री असतील किंवा जे सत्ताधारी होते, त्या सर्वांनी प्रयत्न केलेला आहे. याठिकाणी माननीय शिक्षण मंत्री महोदयांची देखील नावे घेता येतील, त्यामध्ये माननीय श्री.मधुकरराव चौधरी यांच्यासारखी अनेक नावे आहेत की ज्यांनी याबाबतीत जीव ओतून चांगल्या पध्दतीने काम केल्याचे दिसून येते. त्यातून महाराष्ट्रामध्ये एक वेगळया पध्दतीचे वातावरण निर्माण झाले हेही नाकारता येणार नाही.

सभापती महोदय, ज्यावेळेस शिक्षणाच्या हक्का संबंधात किंवा राईट ऑफ एज्युकेशनचा जो

. . . .एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कायदा आला, त्याबाबतीत आपण 2002 मध्येच घटनेमध्ये बदल केला आणि त्याला मूलभूत तत्वामधून हक्कामध्ये समाविष्ट केले. परंतु आपल्या सगळयांना एक अभिमान वाटतो की, आपण शिक्षणाच्या हक्कासंबंधात कायद्यामध्ये रुपांतर केले आणि ही संकल्पना 1 एप्रिल पासून लागू केली. परंतु ही संकल्पना प्रथम महाराष्ट्रामध्ये मांडली गेली, ज्याचा उल्लेख स्वत: माननीय पंतप्रधान यांनी आपल्या भाषणातील पहिल्या वाक्यामध्ये केला. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रामध्ये ही संकल्पना प्रथम मांडण्यात आली. मग ही संकल्पना धोंडो केशव कर्वे यांनी मांडली असेल, गोपाळ कृष्ण गोखले यांनी मांडली असेल किंवा ज्योतिबा फुले यांनी मांडली असेल. त्यावेळेस या सगळयांनी म्हटले पाहिजे की, सर्वांना शिक्षणाचा हक्क असला पाहिजे, अधिकार असला पाहिजे आणि मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे आणि आज देशाने ते स्विकारलेले आहे. कदाचित याचा स्विकार करण्यामध्ये उशीर झालेला आहे असे कोणी म्हणू शकते.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात....

परंतु उशीर म्हणण्यापेक्षा आज तो संपूर्ण देशाकरिता लागू होणे ही सुध्दा आपल्याला अभिमान वाटणारी गोष्ट आहे. राईट ऑफ एज्युकेशनचा मसुदा वाचतो, त्यावेळेस एक गोष्ट लक्षात येते की, राईट ऑफ एज्युकेशनमध्ये जे सांगितलेले आहे त्यातील अनेक गोष्टीच्या बाबतीत महाराष्ट्राने यापूर्वीच आपली पाऊले उचललेली आहेत असे लक्षात येईल्. राईट ऑफ एज्युयकेशनमध्ये असे म्हटले आहे की, तीन कि.मी.मध्ये शिक्षणाची व्यवस्था असली पाहिजे.सभापती महोदय, महाराष्ट्र असे राज्य आहे की, त्यांनी 100 लोकसंख्येच्या ठिक्राणी सुध्दा शाळा उघडण्याचा निर्णय घेतला आणि मुलांना एक कि.मी.पक्षा जास्त लांब जावे लागणार नाही याची काळजी घेऊन वेळप्रसंगी वस्तीशाळा काढून का होईन या मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याचे काम महाराष्ट्र शासनाने केले ते कोणी करु शकणार नाही, ही आपल्याला अभिमान वाटणारी गोष्ट आहे.

सभापती महोदय, वस्तीशाळांमध्ये कधी पाच तर कधी दहा मुले येतात, या वस्तीशाळेचे रुपांतर आपण एक शिक्षकी शाळेमध्ये केले. मुले कदाचित कमी असतील पण एक शिक्षकी शाळा असणे बरोबर नाही म्हणून एक शिक्षकी शाळेचे दोन शिक्षकी शाळेमध्ये रुपांतर केले. हे निर्णय आपल्या राज्याचे निर्णय आहेत अणि राईट ऑफ एज्युकेशनच्या अगोदर घेतलेले हे निर्णय आहेत, हे मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे. आज प्राथमिक शाळेची एकंदर संख्या विविध भाषांच्या शाळांची मिळून 75466 इतकी आहे. 44 हजार खेडेगाव आहेत. प्राथमिक शाळा 75 हजाराच्या वर आहेत. हे या शासनाचे काम वैशिष्टपूर्ण आहे, असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, माध्यमिक शाळांच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला. तीन कि.मी.पर्यंत आणि पाच हजार लोकसंख्येसाठी एक माध्यमिक शाळा देण्याचा निर्णय घेतला. 19767 माध्यमिक शाळा आहेत त्यापैकी मराठी माध्यमाच्या 15466 माध्यमिक शाळा आहेत. या कमी नाहीत. 11 कि.मी. पर्यंत ज्युनिअर कॉलेजचा निर्णय घेतलेला आहे. या सगळयाचा परिणाम असा दिसतो की, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करु शकलेलो आहोत. महाराष्ट्रातील शिक्षणबाहय मुलांचा आकडा 1,35,000 इतका आलेला आहे. हा आकडा पाहिल्यानंतर कदाचित सर्वेक्षणातून बरीच मुले राहून गेली असतील असे मला सुध्दा शिक्षण मंत्री म्हणून वाटून गेले. कदाचित वाडी, पाडयावरची आणि आणखी कुठे तरी मजुरांची मुले चुकून राहिली असतील. देशामध्ये शाळाबाहय मुलांच्या बाबतीत

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

आणि गळतीच्या प्रमाणामध्ये केरळ नंतर महाराष्ट्राचा नंबर लागतो ही गोष्ट सुध्दा मला याठिक्राणी निदर्शनास आणून द्यावयाची आहे. खरे म्हणजे शाळा उघडण्याचे धोरण नंतरच्या कालखंडात बदलत गेले. खाजगी संस्थांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे खूप मोठया संख्येने माध्यमिक शाळा उघडल्या जात होत्या. इग्रजी शाळांचे 1973 साली अनुदान बंद करण्याचा निर्णय घेतला त्याच्या अगोदरच्या काही इंग्रजी शाळां अनुदानीत आहेत बाकीच्या इंग्रजी शाळांना अनुदान देण्यात येत नाही. शासनाने साधारणत:1988-89 ला निर्णय घेतला की, विनाअनुदानित शाळा द्यायच्या आणि त्या शाळांना काही वर्षानंतर अनूदान चालू करायचे. विनाअनुदानित शाळा अनेक संस्थांनी चालू केल्या. अनेक शिक्षकांनी वर्षानुवर्षे या विनाअनुदानित शाळांमध्ये काम करुन आपले योगदान दिलेले आहे. तरी एकंदर वाढता भार पहाता शासनाने पुन्हा कायम स्वरुपी विनाअनुदानित शाळांना मान्यता देण्याचा निर्णय घेतला. सन 2000 साला पासून मोठया संख्येंने कायम स्वरुपी विनाअनुदानित शाळा देण्याचे काम करण्यात आले. महाराष्ट्रातील शाळांचा जो आकडा मी सांगितला त्या शाळांच्या बाबतीत एक मास्टरप्लॅन केला आणि तीन कि.मी.च्या बाहेर आणखी किती शाळा काढावयाच्या राहिल्या आहेत याबाबतचा संख्या आणि यंत्रांच्या सहाय्याने आढावा घेण्यात आला त्यावेळी असे स्पष्ट झाले की, ग्रामीण भागात आता फक्त 56 माध्यमिक विद्यालये आपण काढू शकतो. तीन कि.मी. चा नॉर्म लावलेला आहे त्यामध्ये फक्त 56 माध्यमिक विद्यालये काढू शकतो आणि शहरी भागामध्ये 1080 माध्यमिक विद्यालये काढण्यास वाव आहे. त्यापेक्षा जास्त वाव राहिला नाही इतके मोठे काम यामध्ये झालेले आहे.

सभापती महोदय, याठिकाणी मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांची चर्चा झाली. कायम स्वरुपी विनाअनुदानित शाळा अनुदानितवर आणण्याच्या संदर्भात काही निर्णय मंत्रिमंडळाने घेतले आणि हे निर्णय घेत असताना पूर्वीचे सर्व प्रस्ताव रद्द केले. यासंदर्भात असा निर्णय घेतला की, आता पुन्हा एकदा मास्टर प्लॅन करावा आणि त्या पध्दतीने शाळा काढण्यात याव्यात.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखी नोंद

श्री. बाळासाहेब थोरात ....

एकंदर सगळी परिस्थिती पाहता शाळेच्या एकूण प्रमाणामध्ये इंग्रजी शाळा किती आहेत ? इंग्रजी शाळांचे प्रमाण 5 टक्के आहे. एकूण 19 हजार माध्यमिक विद्यालयापैकी या पाच टक्के शाळांमध्ये सुध्दा मुंबई, ठाणे, रायगड, पनवेल, पुणे, नागपूर या ठिकाणी मिळून 75 टक्के शाळा आहेत आणि उरलेल्या 25 टक्के शाळा सगळ्या महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात इंग्रजी शाळा आहेत असे मानण्याचे कारण नाही. आज ज्या मुलांना शिकावेसे वाटते त्यांना एक किलोमीटरपर्यंत, तीन किलोमीटरपर्यंत शिक्षणाची सोय करुन देणारे आपले राज्य आहे. त्याचबरोबर आपण पुन्हा एकदा मास्टर प्लॅन तयार करण्याचा निर्णय घेतला. ज्याची इच्छा इंग्रजी माध्यमामध्ये शिकण्याची असेल आणि इंग्रजी शिकविण्याकरिता कोणाला शाळा काढावयाची असेल आणि ज्यांची ऐपत असेल, तयारी असेल त्यांनी शाळा काढावी अशी परिस्थिती होती. त्यासंदर्भात आपण एक धोरण घेतले. मी यासंदर्भात काही वेळा जे बोललो त्या माझ्या बोलण्याचा विपर्यास झालेला दिसतो. मी मराठीला कधीही कमी लेखले नाही. या ठिकाणी मराठीला प्रोत्साहन दिले गेले. या ठिकाणी आपण मराठी शाळा काढतो आणि त्यांना अनुदान देऊन ताकद देतो हे नाकारता येणार नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी मराठी आणि इंग्रजी या विषयावर खूप चांगल्या प्रकारची चर्चा झाली. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी आणखी एक गोष्ट या ठिकाणी सांगितली. जगामध्ये इंग्रजीचे काय स्वरुप आहे ? आपण हे जरी करीत असलो तरी मराठी आपली भाषा आहे. आपण ताकदवान असलो पाहिजे, समृध्द असलो पाहिजे. प्रत्येकाला ही भाषा चांगल्या पध्दतीने आली पाहिजे हे आपल्याला नाकारता येणार नाही तसेच आपल्याला इंग्रजी सुध्दा आली पाहिजे आणि चांगल्या पध्दतीने आली पाहिजे. मी या निमित्ताने सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत तसेच सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचे अभिनंदन करतो. हे सगळे करीत असताना इंग्रजी सुध्दा चांगल्या पध्दतीने आली पाहिजे असे सगळ्यांनी सांगितले. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत याचे भाषण ज्या पध्दतीने झाले त्यामध्ये एक सूत्र सापडले. त्यांनी एक खूप चांगला मुद्दा मांडला. त्या पिढीचा प्रतिनिधी म्हणून त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. 1950 साली त्या वेळचे मुख्यमंत्री, ज्यांच्याबद्दल सगळ्यांना आदर आहे ते श्री. बाळासाहेब खेर यांनी मराठी भाषेमध्ये पूर्णपणे शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी इयत्ता सातवी, आठवीनंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

श्री. बाळासाहेब थोरात ....

इंग्रजीची ए, बी, सी, डी, सुरु व्हावयाची. तो निर्णय आपल्या दृष्टीने फार ठीक झाला असे माझे मत नाही. त्यांच्याबद्दल पूर्ण आदर राखून मी बोलतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच आपण बरेच सन्माननीय सदस्य इयत्ता सातवीपर्यंत मराठी माध्यमातून शिकलो. आज आपण एका गोष्टीचा विचार केला पाहिजे की, आपण त्यावेळी शिकत असताना आपल्या वर्गात जे विद्यार्थी शिकत होते ते आज नेमके कोठे आहेत ? त्यांना दारे उघडी झाली काय ? आपण नशीबवान आहोत. आपल्याला संधी मिळाली म्हणून आपण या ठिकाणी आलो. मला कोणाचा तरी वरदहस्त मिळाला, संधी मिळाली म्हणून मी या ठिकाणी आलो. आपल्याला सुध्दा कोणाचे तरी आशीर्वाद मिळाले, संधी मिळाली. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत असतील किंवा आपणा सगळ्यांची तीच परिस्थिती आहे. पण आपल्या वर्गातील त्यावेळचे विद्यार्थी ज्यांना संधी मिळाली नाही किंवा ज्यांची सोय झाली नाही ते आज नेमके कोठे आहेत ? आपल्याला संधी मिळाली, कोणाचे तरी आशीर्वाद मिळाले म्हणून आपण या ठिकाणी आलो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय इंग्रजी शिकलो तर आमदार होतो असा चुकीचा संदेश देत आहेत. आपल्याला जी संधी मिळाली ती शैक्षणिक लायकीमुळे नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे चुकीच्या पध्दतीने समजून घेतले. मी असे म्हणालो की, आपल्याला कोणाचे तरी आशीर्वाद मिळाले, आपण संधीचा फायदा घेतला म्हणून या ठिकाणी आहोत. परंतु आपल्या वर्गातील त्या वेळची मुले, जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणारी त्या वेळची मुले आता कोठे आहेत याचा शोध घ्यावा. आम्ही जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेमध्ये शिकलो. आम्हाला ज्या शिक्षकांनी शिकविले त्यांच्याबद्दल आदर आहे. 50 वर्षापूर्वीची जी पिढी आहे मग आपले वडील किंवा आजोबा असतील त्यांची मराठी चांगली होती तसेच इंग्रजीही चांगली होती हे महत्वाचे आहे. पुढच्या कालखंडामध्ये आपल्याला सूत्र स्वीकारत असताना कोणते सूत्र घ्यावे लागेल याचा विचार ज्यावेळी करतो त्यावेळी मराठी आपली भाषा म्हणून महत्वाची आहे.

यानंतर श्री. अजित शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सभागृहाची वेळ सकाळी 11.45 पर्यंत होती ती पाच मिनिटांकरिता वाढविण्यात येत आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी मराठी भाषेचे महत्व कमी लेखत नाही परंतु इंग्रजी भाषेचे महत्व देखील मोठे आहे. इयत्ता पहिलीपासून इंग्रजी शिकविण्यात यावे असा निर्णय तत्कालीन शिक्षणमंत्री प्रा.रामकृष्ण मोरे यांनी घेतला होता. या निर्णयाला खूप विरोध झाला होता. त्यावर खूप चर्चा झाली होती. परंतु तो निर्णय महत्वाचा होता. जिल्हापरिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत इंग्रजी विषय कसा चांगल्या पध्दतीने शिकविला जाईल आणि विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेत कशाप्रकारे प्रभुत्व मिळवता येईल याचा विचार झाला पाहिजे हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये देखील तितक्याच ताकदीने मराठी भाषा शिकविली पाहिजे अशाप्रकारचे सूत्र यापुढील कालखंडात आपणास घ्यावे लागेल. एका बाजूला मराठी भाषा चांगली आली पाहिजे तर दुसऱ्या बाजूला जगाची भाषा इंग्रजी ही देखील चांगल्याप्रकारे आली पाहिजे याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

आज सर्वत्र असे वातावरण आहे की, आपल्या मुलास इंग्रजी भाषा आली पाहिजे, त्या भाषेत त्याने प्राविण्य मिळविले पाहिजे. आपण लोकांचा विचार तात्पुरता बाजूला ठेवू या. याठिकाणी उपस्थित असलेल्या सन्माननीय सदस्यांची मुले कोणत्या माध्यमात शिक्षण घेत आहेत याचा विचार केला पाहिजे. आज आपण पाहतो की, जेट एअरवेज, किंगफिशर किंवा मोबाईल क्षेत्रात किंवा अन्य सेवा क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर इंग्रजी भाषेचा वापर करण्यात येतो. त्याठिकाणी शहरी भागातील तरुण-तरुणी काम करताना दिसतात. परंतु ग्रामीण भागातील मुलांचे इंग्रजी माध्यमातून शिक्षण झाले नसल्यामुळे अशा क्षेत्रांमध्ये ती मागे आहेत. ग्रामीण भागातील मुले हुशार नाहीत असे नाही ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. तेव्हा आपल्याला आता मानसिकता बदलली पाहिजे. आपणास मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांवर प्रभुत्व मिळवावयाचे असेल तर त्यासाठी जनतेमध्ये भाषण करण्याऐवजी त्यांचे मत परिवर्तन करण्याऐवजी आपल्या कुटुंबापासून सुरुवात केली पाहिजे. आपल्या मुलांपासून सुरुवात केली पाहिजे. कारण आपला नेता कसे आचरण करतो त्यानुसार जनताही आचरण करते. मराठी भाषा समृध्द झाली पाहिजे. मराठी भाषा ताकदवान असली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात..

मराठी भाषेत साहित्याची भर पडत गेली पाहिजे, मराठी भाषा समृध्द आहे ती आणखी समृध्द झाली पाहिजे. परंतु आपल्याला इंग्रजी भाषा सुध्दा चांगल्याप्रकारे आली पाहिजे हेही आपण विसरता कामा नये कारण आता जगाची भाषा इंग्रजी झालेली आहे. ज्याठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत त्याठिकाणी मराठी भाषा सुध्दा ताकदवान बनविली पाहिजे अशाप्रकारचे सूत्र घेऊन आपणास पुढील वाटचाल करावयाची आहे. याठिकाणी एक चांगली संधी मिळाली आहे. शासन शिक्षणासंबंधी चांगले धोरण घेत आहे त्यासाठी आपल्या सर्वांची साथ मिळाली पाहिजे. याठिकाणी शाळेच्या संदर्भातील प्रश्न मांडण्यात आले त्यावर आपणाला वेगळ्या आयुधांच्या मार्फत प्रश्न उपस्थित करता येतील म्हणून त्या संदर्भात मी काही बोलत नाही. शासनाचे शिक्षणाबाबत चांगले धोरण आहे एवढेच सांगतो आणि माझे उत्तराचे भाषण पूर्ण करतो.

उपसभापती : अल्पकालीन चर्चा संपली आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता नियमित भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.48 वाजता दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने त्यांच्या प्रलंबित मागण्या व समस्या निवारणार्थ केलेली धरणे व आंदोलने

(१) * २७७८ श्री.व्ही.यु. डायगव्हाणे, श्री.कपिल पाटील, श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १४०४ ला दिनांक २१ डिसेंबर, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित अपंग शाळा/कर्मशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी शासन निर्णय दिनांक ४ डिसेंबर, २००९ अन्वये लागू करण्यात आली असून, शासन निर्णयाप्रमाणे कर्मचाऱ्यांना नवीन सुधारित वेतन अदा झाले आहे काय,

(२) तसेच कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी व परतावा रक्कम मंजूर करण्याचे अधिकार सद्य:स्थितीत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांना असून सदर अधिकार जिल्हा स्तरावर लागू करण्याच्या प्रस्तावावरील कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : (१) सुधारीत वेतन श्रेणीनुसार वेतन अदा करण्यासाठी पुरवणी मागणीद्वारे निधी उपलब्ध झाला असून सुधारीत वेतन अदा करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.

(२) व (३) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा हा प्रश्न आहे. राज्यातील अपंग विद्यार्थ्यांची शाळा व कर्मशाळेतील शिक्षकांचा हा प्रश्न आहे. या शाळांमध्ये 25 ते 30 हजार कर्मचारी काम करीत आहेत. या शाळेतील शिक्षकांना 2-2, 3-3 महिने वेतन मिळत नाही. महत्वाची बाब अशी की, राज्यातील सर्व कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू झाला, परंतु त्यांना अजून वितरित झाला नाही. फेब्रुवारीचे वेतन अजून मिळालेले नाही. शासनाने महाराष्ट्रातील सर्व कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते काढलेले आहे. परंतु या कर्मचा-यांचे दुर्दैव असे की, त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या चिठ्ठया कित्येक वर्षापासून दिलेल्या नाहीत, ही योजना लागू झाल्यापासून दिलेल्या नाहीत. त्यातील काही कर्मचारी निवृत्त झाले आहेत, त्यांना निवृत्तीनंतर 3-3 वर्षे निवृत्तीवेतन मिळत नाही. त्याचप्रमाणे या कर्मचा-यांना जी.पी.एफ.मधून रिफंडेबल व नॉन-रिफंडेबल लोन घ्यावे लागते. ते लोन मंजूर करण्याचे अधिकार पुणे येथील आयुक्त स्तरावरील कार्यालयाला आहेत. हे अधिकार समाजकल्याण अधिकारी व उपसंचालक स्तरावर असावेत अशी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांची मागणी आहे ती मागणी मंजूर करावी. त्या शिक्षकांचे वेतन वेळेवर व्हावे आणि पी.एफ.लोन मंजूर करण्याचे अधिकार उपसंचालक वा समाजकल्याण अधिका-यांना अधिकार द्यावेत तसेच त्यांच्या पी.एफ.चिठ्ठया एक महिन्यात वा दोन महिन्यात दिल्या जातील काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या शाळांच्या कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू होण्यास उशीर झाला आहे. परंतु पुरवणी मागण्यांमध्ये 57 कोटी रुपये मंजूर झाले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेमार्फत या शाळांना वितरित होणार आहे. पी.एफ.चे लोन मंजूर करण्याचे अधिकार आयुक्त स्तराऐवजी समाजकल्याण अधिकारी वा उपसंचालक स्तरावर असावेत अशी मागणी आहे. त्याबाबत वित्त विभागाने त्रुटी काढली होती त्याची पूर्तता केली असून याबाबतची कार्यवाही 3 महिन्यात पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, राज्यातील अशा शाळेतील विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती मिळते व परीक्षा फी दिली जाते. या दोन्ही गोष्टी त्यांना मिळालेल्या नाहीत. अशा अनेक मतीमंद मुलांच्या विशेष शाळा आहेत. त्यांना हे अनुदान मिळालेले नाही. गरीब वर्गातील पालक खाजगी शाळेमध्ये आपल्या पाल्याला पाठवू शकत नाही. त्यांना हे अनुदान देण्यासंबंधी शासन निर्णय घेईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सध्या विशेष शाळा व कर्मशाळा यांची संख्या 627 आहेत. त्यापैकी 372 शाळांना अनुदान दिले जात नाही. त्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. त्यांना अनुदान देण्याबाबत मेरिटवर विचार करण्यात येईल.

डॉ.सुधीर तांबे : अशाप्रकारच्या शाळेतील शिक्षकांचे वेतन नियमितपणे होत नाही. त्यामुळे या संस्थेच्या शाळांसाठी स्वतंत्र पे युनिट करण्याची गरज आहे, तसे ते केले जाईल काय ?

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : या अपंग शाळा व कर्मशाळा आहेत. सर्व शिक्षकांना सहाय्यक निवृत्ती वेतन योजना लागू आहे. परंतु या शाळेतील कर्मचा-यांना ही पेन्शन योजना लागू केलेली नाही. हा त्यांच्यावर अन्याय आहे. ही योजना त्यांना लागू करणार काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सहावा वेतन आयोग या शिक्षकांना लागू केला आहे. परंतु निवृत्तीवेतन योजनेबाबत तांत्रिक त्रुटी आहेत ती दूर करुन ती योजना लागू करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : अपंग शाळांतील शिक्षकेतर कर्मचा-यांचा हा प्रश्न आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या कर्मशाळेतील कर्मचा-यांना पेन्शन योजना लागू केलेली आहे काय ? या अपंग शाळांना विशिष्ट मर्यादेपर्यन्त विद्यार्थ्यी घेण्यास परवानगी दिलेली आहे. अनेक ठिकाणी अपंग विद्यार्थी प्रवेशासाठी येतात परंतु पदांना मंजुरी नसल्यामुळे इन्टेक कॅपॅसिटी नसल्यामुळे ते विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ शकत नाहीत आणि ती दिली तरी त्याबाबतची जबाबदारी ही संस्थेची असते. तेव्हा खास बाब म्हणून या अपंग शाळांतून विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यासाठी अपंग शाळांची प्रवेश क्षमता वाढविण्याची परवानगी त्या शाळांनी मागितली तर त्यांना अनुदान तत्वावर तशी परवानगी देण्यात येणार आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : कर्मशाळेतील कर्मचा-यांना पेन्शन दिले जात नाही. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला त्याचे उत्तर सजेशन फार ॲक्शन हे आहे.

श्री. वसंतराव खोटरे : खाजगी माध्यमिक शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना रजा प्रवास सवलत मिळते. खाजगी शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-याना कालबध्द पदोन्नती मिळते. परंतु समाज कल्याण विभागाच्या शाळेतील कर्मचा-यांना या सवलती मिळत नाहीत. या सवलती त्यांना केव्हा पासून सुरु करण्यात येणार आहेत ?

श्री. शिवाजीराव मोघे : याबाबतीत अभ्यास करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : 372 शाळांना अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला नाही. अजूनही पुण्याच्या काही अपंगांच्या शाळा रजिस्टर होऊ शकलेल्या नाहीत. तेव्हा 372 शाळा आणि रजिस्टर न झालेल्या शाळा या सर्व शाळांना शंभर टक्के अनुदान देण्यात येणार आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : 272 शाळांचा विषय विचाराधीन आहे. फंड उपलब्ध होईल त्यानुसार मेरिटवर विचार होईल.

श्री. भाई जगताप : या कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीची योजना लागू झाल्यापासून आजपर्यन्त त्यांना त्याचे हिशेब देण्यात आलेले नाहीत. या समाजाच्या घटकाला आपण सर्वतोपरी मदत करण्याचा प्रयत्न करीत आहोत. या कर्मचा-यांना आतापर्यन्त भविष्यनिर्वाह निधीचे हिशेब का दिले नाहीत ? त्याचे हिशेब केव्हा पर्यन्त अपडेट होतील ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 2778...

श्री. शिवाजीराव मोघे : पेन्शन जिल्हास्तरावरुन देण्यासंबंधीचा हा विषय आहे. ते मान्य केले आहे. त्यांचे हिशेब दिले नाहीत, ते देण्यात येतील.

ता.प्र.क्र. 3820

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

-

ता.प्र.क्र. 3020 व ता.प्र.क्र. 2994 एकत्र घेण्याबाबत

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या यादीतील क्रमांक 3 वरील ता.प्र.क्र.3020 आणि क्रमांक 9वरील ता.प्र.क्र.2994 यांचे विषय एकच असल्यामुळे ते एकत्र घेण्यात यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : ठीक आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगडमधील खाडया गाळाने भरलेल्या असल्याने मच्छिमार व्यवसायांवर होत असलेला परिणाम

(३) * ३०२० श्री.परशुराम उपरकर, श्री.रामदास कदम, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल परब : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगडमधील खाडया गाळाने भरलेल्या असून मच्छिमारांच्या दृष्टीने डोकेदुखी ठरत असून मच्छिमारी व्यवसायावरही मोठा परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने गाळ काढण्यासाठी लाखो रुपये खर्च करुनही, गाळाची समस्या मच्छिमारांना कायमची भेडसावत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गाळ साचत असल्याने समुद्रातील पाणी लोकवस्तीच्या दिशेने येत असून तेथील नारळ बागायतींनाही धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनस्तरावरुन कोणती उपाययोजना होणार आहे ?

श्री. गुलाबराव देवकर, डॉ. नितीन राऊत यांच्याकरिता : (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) गाळ काढण्यासंबंधीचे कामे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत करण्यात येणार आहेत.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील ४८ बंदरातील गाळ काढण्याची आवश्यकता

(९) * २९९४ श्री.किरण पावसकर, श्री.परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत, श्री.अनिल परब : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील जवळजवळ ४८ बंदरे गाळात रुतलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे मच्छिमारी व्यवसाय मोठया संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गाळ काढण्यासाठी किमान १५० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू गाळ काढण्याबाबत निधीची तरतूद करण्याबाबत, शासनाकडून विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर, डॉ.नितिन राऊत यांच्याकरिता : (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) नाही.

१२ मत्स्यबंदरे / खाडी ठिकाणीची अंदाजपत्रके महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचेकडून तयार करण्यात येत आहेत.

(४) अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्ध करण्याबाबतची कार्यवाही करणे शक्य होईल.

श्री. परशुराम उपरकर : कोकणातील सर्व बंदरामध्ये गाळ साचलेला असून त्याबाबत सातत्याने या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. मागील वेळी शासनाने असे सांगितले की कोकण पॅकेज अंतर्गत गाळ काढण्यासाठी 60 कोटी रु.ची तरतूद केलेली आहे,

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

60 कोटी रु.चे ड्रेझर घेण्यात येणार आहेत. हा गाळा काढण्याचा कालबद्ध कार्यक्रम शासन आखणार आहे काय ? तीन ड्रेझर खरेदी करण्यात येणार होते. गेल्या आर्थिक वर्षामध्ये आणि या आर्थिक वर्षामध्ये किती ड्रेझर खरेदी केलेले आहेत ? गाळ काढण्याचे काम केव्हा सुरु करण्यात येणार आहे ?

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, 25 बंदरांचा सर्वे करण्यासाठी मेरिटाईम बोर्डाकडे शासनाने काम दिले होते. मेरिटाईम बोर्डाने 25 बंदरांचा सर्वे केला असून चार ठिकाणच्या कामाचे एस्टीमेट पूर्ण केले आहेत. येत्या पावसाळ्यापर्यंत उर्वरित ठिकाणचा सर्वे आणि एस्टीमेट तयार करण्याचे काम पूर्ण करणार आहे. पावसाळ्यानंतर साधारणपणे 4 ते 6 महिन्यात टेंडर काढण्याचे काम करुन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येईल. ड्रेझर खरेदी करण्याचा विषय आहे. मेरिटाईम बोर्डाला त्या संदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. टेंडर कॉल करुन लवकर खरेदी करण्याची कार्यवाही त्यांच्यामार्फत होत आहे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, मी शासनाला धन्यवाद देतो. कोकण पॅकेजमधून पहिल्यांदा या संदर्भातील कोकणाला न्याय दिला गेला. प्रश्न असा आहे की, ड्रेझर घ्यायचे शासनाने कबूल केले, त्याची सद्यस्थिती काय आहे? उत्तरात म्हटले आहे की, गाळ काढण्यासंबंधीचे काम महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डामार्फत करण्यात येणार आहे. या कामाची कालमर्यादा काय आहे? यासंबंधी नियोजन केले आहे काय? फक्त खाडीचा प्रश्न नसून कोकणातील नद्यांचा देखील प्रश्न आहे. नद्यांना पूर आल्यामुळे गावे विस्थापित करण्याची परिस्थिती निर्माण होते. म्हणून कोकणातील गाळाने भरलेल्या नद्या व खाड्यांतील गाळ काढण्याचा कालबध्द कार्यक्रम तयार केला आहे का?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, 60 कोटी रुपयांची तरतूद ड्रेझर खरेदीसाठी करण्यात आली आहे. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड ही खरेदी करणार आहे. त्या संदर्भातील सूचना शासनाने त्यांना दिलेल्या आहेत. हा कार्यक्रम केव्हा पूर्ण होईल असा प्रश्न आहे. पावसाळ्यानंतर हे काम ताबडतोबीने सुरु करण्यासाठी शासनाने सूचना दिलेल्या आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी मागील पावसाळी अधिवेशनात सभागृहात आश्वासन दिले होते की, शासनाच्या वतीने ड्रेझर खरेदी करुन गाळ काढण्यात येईल. आतापर्यंत किती ड्रेझर खरेदी केले? मंत्रीमहोदय म्हणाले की, आम्ही ड्रेझर खरेदी करणार आहोत, त्यासाठी टेंडर काढणार आहोत. शासन जर ड्रेझर खरेदी करणार असेल तर टेंडर काढण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. जो गाळ काढला जाणार आहे तो किती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

नॉटिकल मैल समुद्रात नेणार याचा सर्वे केला आहे का? सर्वेमध्ये किती नॉटिकल मैलची नोंद केलेली आहे?

श्री.नारायण राणे : सन्माननीय सभापती महोदय, या प्रश्नाशी मी संबंधित असल्यामुळे आणि सन्माननीय सदस्यांनी माझे नाव घेतले असल्यामुळे मी उत्तर देण्यासाठी उभा आहे. कोकणातील चारही जिल्हयांमध्ये जी बंदरे आहेत ती गाळाने भरलेली आहेत, त्या बंदरातील गाळ काढून मासेमारी आणि प्रवासी वाहतुकीला या बंदरांचा उपयोग व्हावा यादृष्टीने आतापर्यंत शासन लिलाव करीत होते, ठेका घेत होते. यावर्षी कोकणामध्ये कॅबिनेटची बैठक झाली त्यावेळी स्वत: राज्य शासनाचे ड्रेझर असावेत या उद्देशाने 4 ड्रेझर घेण्यासाठी 60 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. लवकरात लवकर चारही ड्रेझर घेतले जातील आणि येत्या पावसाळ्यानंतर 720 कि.मी. लांबीच्या किनारपट्टीत जी बंदरे आहेत त्यातील गाळ काढण्याचे काम युध्द पातळीवर सुरु होईल. ड्रेझर खरेदी करण्याचे काम लवकरात लवकर केले जाईल. या वर्षीच्या तरतुदीतून 60 कोटी रुपये देण्यात येतील. यापूर्वी मेरिटाईम बोर्डाने आपले ड्रेझर घेण्यापूर्वी गाळ काढण्यासाठी काही भाग नोटिफाय केला होता, त्यासाठी टेंडर काढण्याची प्रक्रिया सुरु होती. त्यासाठी या वर्षीच्या तरतुदीमधून गाळ काढण्याचे काम ड्रेझर विकत घेण्यापूर्वी दिले जाईल आणि तेथील गाळ काढला जाईल.

नंतर टी.1....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

सोलापूर जिल्ह्यातील समाजकल्याण विभागाकडे
कोट्यावधी रूपयांचा शिल्लक असलेला निधी

(4) * 5351 श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री.संजय दत्त, प्रा.सुरेश नवले : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रुक्मिणी शिक्षणशास्त्र महाविद्यालय व बळीराम बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) या दोन महाविद्यालयांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना, जिल्हा समाजकल्याण विभागाकडे 15 कोटी रूपयांचा निधी असूनही सन 2009-2010 या शैक्षणिक वर्षाला शिष्यवृत्ती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उपरोक्त दोन महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना तातडीने शिष्यवृत्तीची रक्कम देऊन यास विलंब लावणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सचिन अहिर, श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकरिता : (1), (2) व (3) शासनाच्या सामाईक प्रवेश प्रक्रियेद्वारे (CET) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शासकीय दराने शिक्षण शुल्क अनुज्ञेय आहे. तथापि सदर प्रश्नातील दोन महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रवेश शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (CET) झालेले नसून, ते संस्थेच्या व्यवस्थापन कोट्यातून ऑक्टोबर-2009 मध्ये झालेले आहेत. व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचे शासनाचे धोरण नाही. त्यामुळे शासनाच्या उक्त धोरणास अनुसरुन काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

महोदय, मी आपल्या अनुमतीने प्रश्न क्र. 1, 2 व 3 च्या उत्तरात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो :--

"उत्तरातील ओळ क्र. 4 मध्ये "व्यवस्थापन कोट्यातून ऐवजी "प्रवेश प्रक्रियेद्वारा (ASSOCIATED CET)" असे वाचावे. बाकी छापल्याप्रमाणे.

श्री. संजय दत्त : महोदय, सोलापूर जिल्हा समाजकल्याण विभागाकडे रु. 15 कोटीचा निधी सन 2009-10 साठी शिल्लक आहे काय ? असल्यास या निधीचा विनियोग कशासाठी करण्यात आला ? आणि त्यातून किती रक्कम खर्च करण्यात आली आहे ?

श्री. सचिन अहिर : महोदय, 15 कोटी रुपयाची तरतूद ही वार्षिक असून जिल्ह्यात 300 हून अधिक संस्था आहेत त्यांना शिष्यवृत्ती देण्याचे काम आपण करतो. त्यातून 60 टक्के निधी देण्याचे काम केले असून उर्वरित 40 अक्के निधी जसजशी संस्थांची मागणी येईल त्यानुसार दिला जाईल. त्यासंबंधीची आकडेवारी पटलावर ठेवण्यात येईल.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 5351.....

श्री. भाई जगताप : महोदय, मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्तीचा हा प्रश्न आहे तसेच त्यामध्ये विलंब झाला हे देखील मंत्री महोदय मान्य करीत आहेत. याची तांत्रिक कारणे काही असू शकतील पण गरीब मुलांना शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून ही रक्कम किती कालावधीत देण्यात येईल ? शासनाकडे यासाठीचा निधी आहे पण तांत्रिक अडचणीमुळे तो राहिलेला आहे म्हणून हा निधी त्वरित देण्याबाबत कालबध्द कार्यक्रम शासन घेणार काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, मुळात दोन संस्थांपुरता हा प्रश्न मर्यादित असून यामध्ये एक बळीराम बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय नावाची पंढरपूर येथील संस्था असून त्या संस्थेला शासनाने मान्यता दिलेली आहे. दुसरे म्हणजे रुक्मिणी शिक्षणशास्त्र महाविद्यालय संस्थेला अजून शासनाची मान्यता मिळाली नाही. यासंबंधीचा निर्णय घेऊन 15 दिवसात ही रक्कम दिली जाईल.

श्री. सुभाष चव्हाण : समाजकल्याण विभागाकडे कोट्यवधी रुपयाचा निधी शिल्लक आहे. या ठिकाणी माननीय समाजकल्याण मंत्री देखील हजर आहेत. प्रश्न थोडा वेगळा आहे परंतु माझी विनंती आहे की, सन 2009-10 मध्ये समाजकल्याण विभागाचा किती कोटीचा निधी लॅप्स झाला ? तसेच त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सचिन अहिर : महोदय, हा प्रश्न वेगळा आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी शिक्षण संस्थांना शिष्यवृत्ती देण्याबाबत सांगितले. खेड्यातील मागासवर्गीयांना ही शिष्यवृत्ती दिली गेली पाहिजे यासंबंधीचे धोरण शासन घेणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, सध्या तरी संस्थेला आपण ही शिष्यवृत्तीची रक्कम देतो. कारण संस्थांकडून अनेक वेळा तक्रारी आल्या की, आमच्याकडे शासनाचा निधी आला नाही. तसेच सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे यासंबंधी धोरणात्मक निर्णय घेऊन पुढील काळात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत तरतूद करण्याचा शासनाचा मानस आहे.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विदर्भातील शेतकऱ्यांचा सिंचन अनुशेष दरवर्षी अद्यावत करण्याची मागणी

(5) * **2593 प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक 333 ला दिनांक 10 डिसेंबर, 2009 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागे सिंचनसुविधांचा अभाव हे प्रमुख कारण असल्याचे आढळून आल्याने जलसिंचनाचा प्रादेशिक अनुशेष भरून काढण्यासाठी दरवर्षी भौतिक अनुशेष अद्यावत करण्याचा प्रस्ताव तयार करून तो मा.राज्यपालांना सादर करण्यात आला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने पाठविलेल्या प्रस्तावाचे प्रत्यक्ष स्वरूप काय आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (1) नाही. तथापि, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम 2005 मधील कलम 20 (1) (ख) अन्वये दरवर्षा पर्यंत निर्माण झालेली अद्ययावत सिंचन क्षमता विचारात घेवून अनुशेषाची परिगणना करुन ती महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या वार्षिक अहवालात समाविष्ट करण्याची तरतूद आहे.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांचा हा प्रश्न नाही तर विदर्भ, मराठवाडा, कोकण या सर्व विभागातील अनुशेष दूर करण्याच्या पध्दतीत सुधारणा करण्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. माननीय महसूल मंत्र्यांनी अनुकूल प्रयत्न करण्याविषयी मागील अधिवेशनात सांगितले हाते. मुळात हा प्रश्न पाटबंधारे विभागाचा असून माननीय मंत्री महोदय सुध्दा सभागृहात उपस्थित आहेत. अद्ययावत अनुशेष काढण्यासाठी शासनाने यंत्रणा स्थापन केली आहे हे सांगितले ही वस्तुस्थिती आहे. तसेच जून 2008 चा वॉटर रेग्युलेटरी ऑथॉरिटीचा जो रिपोर्ट आहे त्यांची अद्ययावत आकडेवारी आहे. पण केवळ आकडेवारी काढून काय उपयोग आहे ? कारण त्याबाबतीत माननीय राज्यपालांनाही कळविले पाहिजे आणि त्यांना तशी विनंती केली पाहिजे. काही जातींना वर्षानुवर्षे मागे ठेवणे हे जितके हानीकारक असते तितकेच काही प्रदेशांना वर्षानुवर्षे डांबून ठेवणेही चुकीचे आहे. यामध्ये प्रामुख्याने दोन चुका झालेल्या आहेत. त्यात एक म्हणजे एक रुपयात किमत मोजली .....

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

50 हजार रुपये हेक्टर 1994 मध्ये किंमत धरली आणि गेल्यावर्षी जोरजो-याने बिगुल वाजविण्यात आला की, आर्थिक अनुशेष आता दूर झालेला आहे. महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्हयाचा अनुशेष दूर झाला आहे, असे आपण म्हणालात परंतु यावर्षी माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशात असे आले की,"अमरावती जिल्हयात फिजिकल महत्तम अनुशेष आहे." त्यामुळे पैशामध्ये अनुशेष काऊंट करणे बंद केले पाहिजे कारण ती किंमत काल्पनिक असते. दुसरी गोष्ट अशी की, भौतिक दृष्टया राज्याच्या सरासरीमध्ये जाण्यासाठी जे हेक्टरेज पाहिजे ते, तेवढे दूर करणे हे परिमाण ठेवले पाहिजे तसेच हे परिमाण दर वर्षी अद्ययावत ठेवले पाहिजे. 1984 मध्ये दांडेकरांनी अनुशेष काढला होता तो आम्ही धरुन ठेवला आणि तो दूर करत करत गेल्यानंतर 2001 मध्ये असे लक्षात आले की, हा अनुशेष दुप्पट झाला. कारण आम्ही 1984 चे कौतुक करीत होतो. बॅकलॉग आणि इंडीकेटर कमिटीने 2000 मध्ये रिपोर्ट जाहीर केला आणि लक्षात असे आले की, 1994 चा अनुशेष कमी न होता तो वाढला. आता 1994 चे कौतुक सुरु आहे. सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्वाचा असल्यामुळे जरा विस्तृतपणे मांडण्यासाठी मला वेळ द्यावा. विदर्भ, मराठवाडयाचा विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल की, विदर्भाचा अनुशेष हा 2008 मध्ये 527 हजार हेक्टरचा होता आज या रिपोर्टमेध्ये 1076 हजार हेक्टरचा दाखविण्यात आलेला आहे. मराठवाडयाचा 260 हेक्टरचा अनुशेष होता तो आज 500 हजार हेक्टरचा झालेला आहे. कोकणचा अनुशेष 100 हजार हेक्टरच्या वर होता तो आजही 100 हजार हेक्टरच्या वर आहे. ठाणे जिल्हा सोडला तर महाराष्ट्रातील सारेच्या सारे जिल्हे बॅकलॉगमध्ये आहेत. विदर्भातील गोंदिया आणि भंडारा जिल्हा सोडला तर सारेच्या सारे जिल्हे बॅकलॉगमध्ये आहेत. गोंदिया आणि भंडारा जिल्हयातील मालगुजारी तलावांचा बॅकलॉग इंडीकेटर समितीने काढून दिलेला आहे. माझा पॉईंटेड प्रश्न असा आहे की, इतिहासाची फार परीक्षा आपण पाहू नका. यवतमाळ जिल्हा हा अनुशेषामध्ये नाही, असे माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशात आलेले आहे. 178 हेक्टरचा अनुशेष यवतमाळ जिल्हयाचा दाखविण्यात आलेला आहे. तेव्हा माझे पॉईंटेड म्हणणे असे आहे की, आपण रुपयातून अनुशेष मोजण्याची पध्दत बंद करा कारण ती काल्पनिक किमंत आहे. खरे म्हणजे फिजिकल बॅकलॉग मोजला पाहिजे, हे आपण माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

राज्यपाल महोदयांना कळवा. तसेच 1984 ते 2000 पर्यंत आणि 1994 ते 2010 पर्यंत दुरुस्त करीत बसणे हे अत्यंत चुकीचे आहे. खरे म्हणजे दरवर्षी त्याचे अपडेटींग झाले पाहिजे. फिजिकल बॅकलॉग दरवर्षी अपडेट करुन माननीय राज्यपाल महोदयांना त्यानुसार अनुशेष दूर करण्याविषयीची शिफारस आपण करणार आहात काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख साहेबांनी भौतिक अनुशेषाच्या संदर्भात मागणी केलेली आहे. त्यांनी दुसरा प्रश्न असाही विचारला की, 1994 चा भौतिक अनुशेषाच्या संदर्भात 2008 मध्ये जो रिपोर्ट आलेला आहे त्यामध्ये अनुशेष वाढलेला आहे ही वस्तुस्थिती आहे. कारण 1994 मध्ये 7,84,000 हेक्टर एवढा भौतिक अनुशेष होता परंतु नंतर तो 10,76,000 वर गेलेला आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावेळेस राज्याची सरासरी 35 टक्के होती नंतर मात्र ती 54 टक्के झाली ही वस्तुस्थिती आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, विदर्भाच्या अनुशेषाच्या संदर्भातील महत्वाचा विषय या ठिकाणी आहे

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख साहेब प्रथम मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्या. मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर आपल्याला पुन्हा विचार मांडण्याची संधी दिली जाईल. मी आपल्याला जास्तीत जास्त संधी देण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे आता मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्या.

प्रा. बी.टी.देशमुख : मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, राज्याची सरासरी 54 टक्के झालेली आहे. विदर्भाचा अनुशेष सुध्दा दुपटीच्या वर गेलेला आहे.आपण माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर ऐका.

सभापती : मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर आपल्याला संधी देण्यात येईल. मी कायम ऐकणा-यांपेकी आहे. 1984 मध्ये जेव्हा कै.वसंतदादा मुख्यमंत्री होते तेव्हा दांडेकर समिती निर्माण झाली होती त्यावेळेपासून ते आजपर्यंत ज्या काही चर्चा झालेल्या आहे त्या मी ऐकतच आलेलो आहे. आपल्या ज्या भावना आहेत त्या सुध्दा मला माहिती आहेत.

यानंतर श्रीमती रणदिवे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2593 . . . .

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, भौतिक अनुशेषाच्या संदर्भात आपण महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या अहवालामध्ये याची नोंद घेतो. माननीय राज्यपालांनी यासाठी 650 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद यावर्षीच्या बजेटमध्ये भौतिक अनुशेष काही प्रमाणात दूर करण्यासाठी ठेवलेली आहे. याठिकाणी माननीय राज्यपालांनी भौतिक अनुशेष दूर करण्याच्या बाबतीत असेही म्हटलेले आहे की, सन 1994 अखेरचा वार्षिक अनुशेष हा 2010 अखेर म्हणजेच सुमारे 16 वर्षांनी दूर होत आहे. हा विचार करता 1994 च्या अनुशेष निर्मूलना साठी विशिष्ट कालमर्यादा घालणे संयुक्तिक वाटत नाही. वाढती किंमत व वाढता पूर्णत्वाचा कालावधी यामुळे ही प्रक्रिया अधिकच गुंतागुंतीची होत आहे. त्यामुळे राज्याच्या आर्थिक नियोजनावर ताण येत आहे. कदाचित असे असताना सामाजिक विकासाच्या क्षेत्रावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. यामध्ये असेही म्हटलेले आहे की, या पार्श्वभूमीवर माननीय राज्यपालांच्या मते अनुशेष आणि विकास निधीचा समतोल वितरण याचा पुन्हा अभ्यास करणे आवश्यक झाले आहे. माननीय राज्यपालांनी यासाठी तज्ज्ञांची नवीन समिती नियुक्त करण्याचा मनोदय व्यक्त केलेला आहे. आम्ही सन्माननीय राज्यपालांच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतर, त्यावेळेस एक तज्ज्ञ समिती नेमण्याचे मत किंवा मनोदय त्यांनी व्यक्त केलेला आहे. . . ..

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, कायदा असल्यावर समिती नेमण्याची गरज काय आहे ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. मला माझे म्हणणे पूर्णपणे मांडू द्यावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे दिलेले आहे की, अद्ययावत अनुशेष देण्याच्या बाबतीतील यंत्रणा कायद्याने बांधलेली आहे. आता मग समितीची मरायला काय गरज आहे ? तुम्ही याच्या अगोदर सात-सात वर्षे कमिट्यामध्ये अडकवून ठेवलेले आहे. तुम्ही अनुशेष आणि निर्देशांक समितीमध्ये सात वर्षे अडकवून ठेवले. सभापती महोदय, आपण माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकले तर लक्षात येईल की, प्रश्नाचे उत्तर सोडून माननीय मंत्री महोदय बाकी सर्वकाही बोलत आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य

. . . .व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2593 . . . .

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . ..

प्रा.बी.टी.देशमुखसाहेब यांचे म्हणणे आहे की, हा जो इंडीकेटर समितीचा अहवाल आहे, तो बासनात बांधून ठेवला आहे. पण मी त्यांना सांगू इच्छितो की, 1999 मध्ये हे सरकार सत्तेमध्ये आल्यानंतर पहिल्या प्रथम या इंडीकेटर समितीचा अहवाल आला आणि त्या अनुषंगाने त्या-त्या भागामध्ये सिंचनाच्या अनुशेषानुसार निधीचे वाटप होत आहे हे मी याठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी त्याबद्दल सभागृहामध्ये शासनाचे आभार मानलेले आहेत. 1994 चा रिपोर्ट होता आणि आम्ही सदनामध्ये भांडत होतो. सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत त्याबद्दल शासनाचे आभार मानलेले आहेत आणि जी गोष्ट योग्य आहे, ती योग्यच म्हणावी लागेल. म्हणून माझे म्हणणे आहे की, शासनाने कमिट्यांच्या भानगडीमध्ये पडू नये.

सभापती : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी प्रश्न विचारावा.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी पॉईंटेड प्रश्न विचारतो. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, राज्याची सरासरी 54 झाली. हे खरे आहे की, ॲनेक्शर-5 (1) हा आपल्याला या अधिवेशनामध्ये दिलेला रिपोर्ट आहे. अनुशेषाची सरासरी 22 होती, ती आता 54 झाली म्हणजे ती दुप्पटीच्या वर गेली आहे. तसेच विदर्भ आणि मराठवाड्याचा अनुशेष सुध्दा दुप्पटीच्या वर गेला आहे. तसेच कोकणातील अनुशेषही 1 हेक्टरने कमी झाला नाही ही गोष्ट राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये योग्य नाही.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझा पॉईंटेड प्रश्न आहे की, दरवर्षी फिजीकल बॅकलॉग हा अपडेट केला जाईल आणि त्या आधारावर निधीचे वाटप केले जाईल अशी शिफारस आपण माननीय राज्यपालांना करणार आहात काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांचा जो प्रश्न आहे, तो धोरणात्मक आहे. त्यांनी सांगितले की, जो भौतिक अनुशेष आहे, तो दरवर्षी अप ग्रेड करावयाचा आणि बॅकलॉगची रक्कम त्याप्रमाणे वाटप करण्यात यावी अशी शिफारस माननीय राज्यपालांना करावयाची.याठिकाणी सन्माननीय सदस्यांचा एक मुद्दा मान्य केला जाईल की,जो भौतिक बॅकलॉग

.. . .व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे, तो अपग्रेड करुन आम्ही माननीय राज्यपालांकडे पाठवू. परंतु माननीय राज्यपालांचे जे अधिकार आहेत, अशा वेळी आम्ही त्यांना शिफारस करणे योग्य होणार नाही. माननीय राज्यपालांना जसे वाटेल, मग ते तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतील, शासनालाही विचारतील तेव्हा शासन सांगेल की,आम्हाला असे-असे वाटते आणि याप्रमाणे बॅकलॉगच्या रकमेचे वाटप करावे. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही दरवर्षी भौतिक अनुशेष अपग्रेड करुन तो माननीय राज्यपालांकडे पाठविण्यात येईल आणि माननीय राज्यपालांना 371 (1) प्रमाणे जो अधिकार दिलेला आहे, त्याप्रमाणे ते त्याचे डिस्ट्रीब्युशन करतील

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, दरवर्षी भौतिक अनुशेष अपग्रेड करुन तो माननीय राज्यपालांकडे पाठविण्यात येईल. त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्य, शेतकरी आत्महत्येत अग्रेसर असल्याप्रकरणी करावयाची उपाययोजना

(6) * 5156 श्री.रामदास कदम, डॉ.दीपक सावंत, श्री.किरण पावसकर, श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) "डीएनए" या टाईम्स ऑफ इंडिया समुहातील मुंबई वृत्तात महाराष्ट्र अहेड, वन्स अगेन इन फार्मर आत्महत्याबाबतच्या दिनांक 11 फेब्रुवारी, 2010 रोजी प्रसिध्द झालेल्या वृताची राज्य शासनाने छाननी केली आहे काय,

(2) असल्यास आत्महत्याबाबतची गंभीर समस्या यशस्वीरित्या हाताळण्याबाबत राज्य शासनाने खास उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे काय,

(3) नसल्यास, याप्रकरणी होत असलेल्या विलंबाची काय कारणे आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके, श्री.नारायण राणे यांच्याकरिता: (1) व (2) वृत्तपत्रातील बातमी नुसार सन 2008 मध्ये संपूर्ण राज्यात 3802 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दर्शविण्यात आले आहे तथापि प्रत्यक्षात सन 2008 या वर्षात राज्यात एकूण 1906 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी 627 प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरली आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांकरिता कृषी कर्ज माफी व कर्ज परतफेड सवलत योजना 2009 जाहीर केली आहे त्याअंतर्गत राज्यात एकूण 31.19 लाख लाभधारक शेतकऱ्यांना रु. 3686 कोटींच्या कर्ज माफी/कर्ज सवलतींचा लाभ मिळाला आहे. तसेच राज्य शासनाने विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी डिसेंबर 2005 मध्ये रु. 1075 कोटीचे विशेष पॅकेज जाहीर केले. त्यानंतर मा.पंतप्रधान यांनी माहे जुलै, 2006 मध्ये रु. 3750 कोटीचे विशेष पॅकेज जाहीर केले आहे. त्याची अनुक्रमे 124 व 114 टक्के अंमलबजावणी करण्यात आली आहे. विदर्भातील आत्महत्याग्रस्त 6 जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी रु. 7262.64 कोटी रुपयांचे नवीन पॅकेज तयार करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, विदर्भात्ील शेतकऱ्यांच्या आत्महत्याबाबतचा हा प्रश्न आहे. उत्तरामध्ये यासंदर्भात कोणकोणते पॅकेज दिलेले आहेत हे दिलेले आहे.एवढे पॅकेज देऊन देखील विदर्भात आज सुध्दा आत्महत्या चालू आहेत हे शासनाला आणि विरोधी पक्षाला देखील भूषणावह नाही. उत्तरामध्ये शेवटी असे लिहिलेले आहे की, "6 जिल्हयात शेतकऱ्यांसाठी रु.7262,64 कोटी चे नवीन पॅकेज तयार करण्याबाबत केंद्र शासनाला प्रस्ताव पाठविण्यात आला आहे."सभापती महोदय, हा जो प्रस्ताव पाठविण्यात आला आहे त्याचे नेमके स्वरुप काय आहे? नेमके कशासाठी हे पैसे मागितलेले आहेत? दुसरा मुद्दा असा की, या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबविण्यासाठी शासनाने अनेक समित्या नेमल्या. त्या समित्यांचे अहवाल आले. त्या अहवालांची अंमलबजावणी काही ठिकाणी केली. विशेषत: नरेंद्र जाधव समितीचा अहवाल आम्ही 100 टक्के स्वीकारला. आम्ही तातडीने त्याची 100 टक्के अंमलबजावणी करणार असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये दोन वेळा सांगितले होते. सभापती महोदय, मी याठिकाणी दाव्याने सांगेन की, या नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाची शासनाने 100 टक्के अंमलबजावणी केली असती तर कदाचित आज आत्महत्या झाल्या देखील नसत्या असे माझे ठाम मत आहे.

सभापती महोदय, मी नरेंद्र जाधव समितीचा अहवाल वाचलेला आहे त्यातील फक्त एक मुद्दा या ठिकाणी वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटले आहे की," 4,34,291 कुटुंबावर विशेष लक्ष केंद्रीत करुन त्यांच्यासाठी सामाजिक सुरक्षेचे उपाय करावेत" ही एक सूचना आहे. अशा एकूण 13 विविध सूचना दिलेल्या आहेत. या सगळया सूचना माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केल्या होत्या. या सूचनेमध्ये मुला-मुलींच्या लग्नासाठी दहा हजार रुपये देण्यात यावेत, शिक्षणाचा खर्च करावा, असेही म्हटले आहे. तसेच खते कुपनवर द्यावेत. पैसे देऊ नका पण कुपन दिल्यानंतर तो शेतकरी कुपण घेऊन गेल्यानंतर त्याला मोफत खते मिळतील अशा तऱ्हेची उपाययोजना सांगितलेली आहे. कापसाच्या बाबतीत असे म्हटल्े आहे की, "राष्ट्रीय पातळीवर टेक्नॉलॉजी मिशन ऑफ कॉटन फेब्रुवारी,2000 मध्ये जाहीर केलेली आहे त्याअंतर्गत कापूस संशोधन व प्रद्योगिकीकरण बाजार पेठ विकास व जिनिंग प्रेसिंग गिरण्यांचे आधुनिकीकरण असे चार वेवगेवळे मिशन ठेवले आहेत. त्याच्यासाठी वेगवेगळया नोडल एजन्सी ठेवलेल्या आहेत. याच राष्ट्रीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

मिशनच्या धर्तीवर विदर्भासाठी खास मिशन जाहीर करावे" अशी शिफारस देखील करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, ज्या शिफारसी नरेद्र जाधव समितीने केल्या आहेत त्या शिफारशींची अंमलबजावणी 100 टक्के करण्याचे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले होते, त्याप्रमाणे अंमलबजावणी झाली काय?नसल्यास शासन त्याप्रमाणे तातडीने अंमलबजावणी करणार काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, डीएनए या टाईम्स ऑफ इंडिया समुहातील वर्तमानपत्रात जे वृत्त आलेले आहे त्यासंदर्भात राज्यातील आत्महत्येच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याअनुषंगाने मी सांगू इच्छितो की, .7262.64 कोटी रुपयाचे पॅकेज तयार करण्याबाबत केंद्र शासनाला विनंती केलेली आहे. त्याबाबतीत पाटबंधारे विभाग,सहकार विभाग अशा निरनिराळया विभागाच्या अंतर्गत चर्चा होऊन या सहा जिल्हयातील शेतकऱ्यांना कशा पध्दतीने लाभ देता येईल यादृष्टिकोनातून हे पॅकेज तयार करुन केंद्र शासनाला विनंती केलेली आहे. दुसरा प्रश्न नरेंद्र जाधव समितीच्या बाबतीत विचारण्यात आलेला आहे. नरेंद्र जाधव समितीने जो अहवाल शासनाला सादर केलेला आहे तो शासनाने स्वीकारलेला आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे काम चालू आहे. अहवालात जे म्हटलेले आहे ते एखाद्या वर्षात पूर्ण करता येईल असे नाही. निश्चितपणाने त्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यादृष्टिकोनातून या अहवालाची अंमलबजावणी करण्याचे काम शासनाच्या माध्यमातून चालू आहे.

यानंतर श्री.बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता. प्र. क्र. 5156 .....

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोंदयांनी जे सांगितले ते बरोबर आहे की, डीएनए या वृत्तपत्राच्या बातमीमुळे झालेला जो गोंधळ आहे त्याचा आशय आत्महत्या हा नक्कीच आहे. एखादी बातमी देऊन सनसनाटी निर्माण करावयाची अशी ही बाब आहे. या वर्तमानपत्राने आत्महत्येचा आकडा 3802 दाखविलेला आहे आणि शासनाने 1906 आत्महत्या झाल्याचे सांगितले आहे. म्हणजे आत्महत्यांचा आकडा दुप्पटीने प्रदर्शित करुन अशा प्रकारचे वातावरण निर्माण केले. शासनाने या आत्महत्यांची गंभीर दखल घेऊन अनेक योजना आखल्या आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा तयार केलेली आहे. त्यामुळे अशा वृत्तपत्रावर शासन काही कारवाई करणार की नाही ? अशा प्रकारच्या बातम्या पसरवावयाच्या, असे वातावरण तयार करावयाचे आणि चुकीचा संदेश द्यावयाचा हे बरोबर नाही. महाराष्ट्र देशामध्ये कसे मागे आहे हे सांगण्याचा तसेच महाराष्ट्राची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न काही वृत्तपत्रे करीत आहेत. त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय किंवा त्यांना नोटीस देणार काय ?

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, हा शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न आहे आणि सन्माननीय सदस्य वृत्तपत्रावर कारवाई करावी असे कसे सांगत आहेत ?

श्री. भाई जगताप : अशा प्रकारची बातमी देणे बरोबर नाही...

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, दोन्ही सन्माननीय सदस्यांनी आपसात वाद घालण्याचे कारण नाही. मुळात वर्तमानपत्राच्या कात्रणाच्या आधारे प्रश्नच विचारता येत नाही. त्यामुळे कारवाईचा प्रश्न नाही. तरीही शिवसेनेच्या जेष्ठ सन्माननीय सदस्यांनी इंग्रजी वृत्तपत्राचा आधार घेतला म्हणून हे उत्तर दिलेले आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, ज्यावेळी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत वर्तमानपत्रांमध्ये बातम्या येतात त्यावेळी वृत्तपत्रे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे आणि त्यामुळे अशा पध्दतीने वृत्तपत्राची टिंगल आपल्याला या सभागृहामध्ये करता येणार नाही. जेष्ठ सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत जबाबदारीने बोलले पाहिजे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबतचा आकडा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने सुध्दा दिलेला आहे. ही नवीन बातमी नाही. ही बाब शासनाला शोभादायक नाही. याबाबतीत सबंध देशामध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. संपूर्ण देशामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत महाराष्ट्र क्रमांक 1 वर आहे ही गोष्ट खरी आहे काय ? नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाची अंमलबजावणी सहा महिन्यांमध्ये करणार असे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिले होते. या गोष्टीला एक वर्ष होऊन गेले. त्याची अंमलबजावणी किती दिवसामध्ये करणार ? विशेषत: जी 4 लाख गरीब कुटुंबे आहेत, ज्यांचा सर्व्हे केला आहे त्या प्रत्येक कुटुंबाला सहा महिनेपर्यंत 25 किलो धान्य शासनाने मोफत द्यावे अशी शिफारस आहे. त्यांना 25 किलो धान्य मोफत दिले असते तर काही आत्महत्या झाल्या नसत्या. नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाची अंमलबजावणी सहा महिन्यामध्ये करण्याचे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्या अहवालाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाला आणखी किती कालावधी लागणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, महाराष्ट्र आत्महत्यांच्या बाबतीत देशामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे काय असा पहिला प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. यासंदर्भामध्ये वृत्तपत्रातून जी आकडेवारी प्रसिध्द झालेली आहे आणि आपल्या यंत्रणेच्या माध्यमातून गोळा केलेली जी आकडेवारी आपल्याकडे उपलब्ध आहे ती जुळत नाही. त्यामध्ये दुप्पटीचा फरक आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी हा जो प्रश्न विचारलेला आहे तो तपासून त्याची माहिती सादर केली जाईल. महाराष्ट्र नंबर एकवर आहे की नंबर दोनवर आहे ही बाब तपासावी लागेल. आता त्याचे उत्तर सांगता येणार नाही. ही बाब तपासून ती माहिती पटलावर ठेवली जाईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न अहवालाच्या अंमलबजावणीच्या संदर्भात विचारलेला आहे. नरेंद्र जाधव समितीने सुचविलेल्या उपाययोजना किती कालावधीत अंमलात आणता येतील ही धोरणात्मक बाब आहे. त्याची अंमलबजावणी किती दिवसात होईल ते आजच्या स्थितीत सांगणे शक्य नाही.

यानंतर श्री. अजित शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5156....

प्रा.सुरेश नवले :सभापती महोदय, केंद्र शासनाकडे 7261.64 कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. हा प्रस्ताव केव्हा पाठविण्यात आला आणि त्यास केव्हा मान्यता मिळेल ?

श्री.प्रकाश सोळंके :सभापती महोदय, केंद्र सरकारकडे केव्हा प्रस्ताव पाठविण्यात आला याबद्दलची तारीख आता माझ्याजवळ उपलब्ध नाही ती पटलावर ठेवण्यात येईल. आपणास लवकरात लवकर पॅकेज मिळावे यासाठी केंद्र सरकारकडे आपला पाठपुरावा सुरु आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, केंद्र शासनाकडे केव्हा प्रस्ताव पाठविण्यात आला असाच माझा प्रश्न होता. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, केंद्र शासनाकडून पॅकेज मिळाल्यानंतर राज्य शासन स्वत:चे अंशदान किती देणार आहे जेणेकरुन 7262 कोटी रुपयांचे केंद्र शासनाने अनुदान आणि त्यामध्ये राज्य शासनाचे अनुदान असे करुन एकूण 10-11 हजार कोटी रुपयांचे पॅकेज करुन शेतकऱ्यांच्या आत्महत्याची संख्या कमी होईल या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, केंद्र सरकारकडे पॅकेज मिळण्यासाठी पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने किती रक्कम प्राप्त होईल हे येत्या तीन महिन्यात समजेल. त्यानंतर राज्य शासनाचा हिस्सा देऊन आपण सांगितल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, उत्तरात नमूद केलेले आहे की, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी डिसेंबर, 2005 मध्ये 1075 कोटी रुपयांचे आणि जुलै 2006 मध्ये 3750 कोटी रुपयांचे विशेष पॅकेज जाहीर करण्यात आले. या पॅकेजेसची अंमलबजावणी अनुक्रमे 124 आणि 114 टक्के करण्यात आली. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, हे पॅकेज खर्च केल्यानंतर त्याचा इफेक्ट झाला काय याचा थर्ड पार्टी ऑडीट करण्यात येईल काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, केंद्र शासन आणि राज्य शासनाने दिलेल्या पॅकेजची चांगल्याप्रकारे अंमलबजावणी झाली किंवा कसे, त्यामध्ये काही त्रुटी आढळल्या, याशिवाय या पॅकेजची चांगल्याप्रकारे कशी अंमलबजावणी करण्यात येईल यासाठी डॉ.नरेंद्र जाधव यांची समिती नेमण्यात आली होती. त्या समितीचा अहवाल शासनाने स्वीकृत केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/

12:40

ता.प्र.क्र. 5156....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राणा जगजितसिंह पाटील यांनी प्रश्न विचारला की, 2005 मध्ये 1075 कोटी रुपये आणि जुलै 2006 मध्ये 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले. त्याची अनुक्रमे 124 टक्के आणि 114 टक्के अंमलबजावणी झालेली आहे. माझा प्रश्न आहे की, विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यात पॅकेजची 124 आणि 114 टक्के अंमलबजावणी झाल्यानंतर त्या भागात किती शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या ?

श्री.प्रकाश साळुंके : सभापती महोदय, सन 2006 मध्ये एकूण 2336 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या, त्यापैकी 1028 आत्महत्या मदतपात्र होत्या तर 1307 आत्महत्या मदतीस अपात्र होत्या, सन 2007 मध्ये 1985 आत्महत्या झाल्या, त्यापैकी मदतपात्र 590 आणि मदतीस अपत्रा 1095 होत्या. सन 2008 मध्ये 1906 आत्महत्या झाल्या त्यापैकी 627 मदतीस पात्र तर 1279 मदतीस अपात्र हेत्या, सन 2009 मध्ये 1560 आत्महत्या झाल्या त्यापैकी 446 पात्र तर 874 अपात्र होत्या.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये मराठी माणसे इंग्रजी पेपर वाचतात हे जाहीर केल्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. वर्तमानपत्रावर विश्वास ठेवू नये असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. परंतु मंत्रिमहोदयांनी दिलेली माहिती जशीच्या तशी वर्तमानपत्रात छापून आलेली आहे आणि ते वर्तमानपत्र विश्वासपात्र आहे असे माझे म्हणणे आहे. याठिकाणी जी माहिती देण्यात आली त्यानुसार एक-तृतीयांश आत्महत्या पात्र ठरल्या तर दोन-तृतीयांश आत्महत्या अपात्र ठरल्या. शेतकऱ्यांच्या अपात्र आत्महत्या कोणत्या कारणामुळे ठरविण्यात आल्या ? दारु पिऊन झालेल्या आत्महत्या स्वीकाराई असू शकत नाहीत असे आजही माननीय महसूल मंत्र्यांचे मत आहे का ?

यानंतर श्री.,खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5156.....

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आत्महत्येची कारणे पाहिली तर त्यामध्ये नापिकी, कर्जबाजारीपणा, मुलीचे लग्न, आर्थिक विवंचना, आजारीपण, व्यसनाधीनता, बेरोजगारी, घरगुती भांडण, कर्ज नाही, अपघात व इतर अशी त्याची विगतवारी केलेली आहे. नापिकी, कर्जबाजारीपणा आणि सातत्याने वसुलीचा तगादा या कारणामुळे आत्महत्या होत आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खाजगी सावकारी हा विषय यात घेतला नाही.

श्री.प्रकाश सोळंके : कर्जदारांचा सातत्याने होणारा तगादा हा विषय त्यात घेतलेला आहे. कर्जबाजारीपणामध्ये सर्वच बाबींचा समावेश आहे. त्यामध्ये बँका व सावकारी यांचा समावेश केलेला आहे. त्यात सहकारी बँका, राष्ट्रीय बँका आल्या, खाजगी सावकारी आली व त्यांचा तगादा याचा समावेश केलेला आहे. या तिन्ही निकषावर त्या केसेस पात्र केल्या आहेत.

श्री.दिवाकर रावते : बँकांच्या व्यतिरिक्त कोणतेही कारण स्वीकारले जात नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, लेखी उत्तरात असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, "माननीय पंतप्रधान यांनी माहे जुलै, 2006 मध्ये रु.3750 कोटीचे विशेष पॅकेज जाहीर केले आहे. ही गोष्ट खरी आहे. आत्महत्यांसाठी अनेक कारणे आहेत, परंतु त्याचे मुख्य कारण माननीय पंतप्रधानाच्या निवेदनामध्ये स्पष्ट वाक्य आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, "Reasons are many but the prime reason is non-facility of irrigation." म्हणून एकेका प्रकल्पाला निधी दिला. अप्पर वर्धा 450 कोटींचा प्रकल्प आहे. या पॅकेजची अंमलबावणी झालेली आहे. हा निधी सिंचनाच्या कामासाठी वापरला जाईल असे प्रमाणपत्र दिले आहे. अप्पर वर्धा प्रकल्पाच्या बाबतीत मागील 2 वर्षांपासून असे प्रमाणपत्र दिले आहे. दुर्दैवाने सिंचनापेक्षा वेगळया कारणासाठी हे पाणी विकून टाकलेले आहे, त्याबाबतचे ॲग्रीमेंट झालेले नाही, परंतु तसे पत्र दिलेले आहे. त्याची चौकशी केली जाईल काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, होय.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, डॉ.नरेंद्र जाधव समितीचा अहवाल अंमलात का आणला नाही त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

ता.प्र.क्र.5156....

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, मी सर्व प्रश्नांना उत्तरे दिली आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांना पाहिजे तसे उत्तर मिळणार नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी आत्महत्यांची आकडेवारी दिलेली आहे. त्यानुसार असे दिसते की, सन 2005 पासून झालेल्या आत्महत्यांपैकी एकतृतीयांश आत्महत्या पात्र ठरविल्या आहेत. आत्महत्या पात्र ठरविण्याचे तहसीलदारांनी निकष कोणते लावले आहेत ? मंत्री महोदय सांगत आहेत ते निकष लावले गेले नाही. मी जबाबदारीने सांगतो. तहसीलदारांनी जिल्हाधिका-यांकडे अहवाल दिलेला आहे त्यानुसार पात्र व अपात्र आत्महत्या ठरविल्या आहेत. अपात्र ठरविलेल्या आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबांना मदतीपासून वंचित केले आहे. म्हणून अपात्र ठरविलेल्या आत्महत्यांची फेरचौकशी करुन ज्यांच्यावर अन्याय झाला आहे तो दूर करणार आहे काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री महोदयांना मी धन्यवाद देतो. ते यवतमाळ जिल्हयातील वटफळ या गावी गेले होते. तेथे ग्रामसभा भरली असताना लोकांनी असे सांगितले होते की, आत्महत्या कशा होत आहेत, नापिकी होत आहे. आपण स्वत: सर्वांसमोर विभागीय आयुक्तांना खडसावताना असे म्हटले होते की, ही सत्य कारणे महसूल विभागासमोर का आणत नाही ? एवढे आखो देखा हाल आपण बघून आलेला आहात. म्हणून सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या आत्महत्यांची फेर तपासणीची मागणी केली त्याप्रमाणे ती करणार आहे काय ? मंत्री महोदय स्वत: अनुभव घेऊन आलेले आहेत.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे असे म्हणणे आहे की, एकूण आत्महत्यांपैकी ज्या आत्महत्या अपात्र ठरविल्या त्यांच्या कुटुंबियांवर अन्याय झाला आहे. या आत्महत्यांची फेरतपासणी केल्यास त्यातील काही आत्महत्या पात्र होऊ शकतात.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

कोणत्या वर्षातील प्रकरणांची फेरतपासणी करायची हे सन्माननीय सदस्यांनी सांगितले तर बरे होईल. मागील 5-6 वर्षाची फेरतपासणी करण्यापेक्षा 2009 आणि 2010 या वर्षात जेवढी आत्महत्येची प्रकरणे अपात्र ठरली असतील त्या सर्व प्रकरणांची चौकशी करु.

श्री. पांडुरंग फुंडकर : जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये प्रकरणे तयार आहेत. आत्महत्त्या केलेल्यांच्या कुटुंबाला मदत देण्याच्या संदर्भात जी कमिटी नेमली होती त्या कमिटीच्या बैठका सहा-सहा महिने होत नाहीत. थातूरमातूर बैठक घेतली जाते. जिल्हाधिकारी रिपोर्टवर प्रकरणे अपात्र ठरविली जातात. माझी अशी विनंती आहे की, पॅकेजचे वाटप पूर्ण झाल्यानंतर किती अपात्र ठरले, किती पात्र ठरले हे तपासून पहावे. पॅकेजचे वाटप झाल्यानंतर ज्या आत्महत्या घडलेल्या आहेत त्या प्रकरणांची फेरतपासणी करावी.

श्री. नारायण राणे :पॅकेज 2006 पासून होते. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्या प्रमाणे सन 2008, 2009 आणि 2019 या तीन वर्षातील प्रकरणांची तपासणी केली जाईल असे मी आश्वासन देतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात जमिनीची गुंठेवारी नियमित करण्याचा शासन निर्णय

(७) * २९०६ श्री.संजय दत्त, श्री.सय्यद ज़मा, श्री.राजन तेली, श्रीमती अलका देसाई, प्रा.सुरेश नवले : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुंठेवारी नियमित करण्याचा कायदा झाला मात्र वर्ग-२ इनाम जमिनीचा दंड रद्द झाला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्ग-२ व महार वतन या शेत जमिनीत नागरिक वसाहती झाल्या मात्र गुंठेवारी नियमित होत नसल्याने गुंठेवारी रहिवासींना त्रास होत आहे याबाबत शासनाकडे रि ग्रॅड दंडाची माफी मिळण्याबाबत माजी वि.स.स. यांनी २ वर्षापूर्वी शासनाकडे निवेदन दिले असूनही अजून पर्यंत याबाबत शासनाने निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्ग-२ व महार वतन शेत जमिनीत नागरिक वसाहती झाल्या मात्र गुंठेवारी नियमित होत नसल्याने गुंठेवारी रहिवासींना त्रास होत आहे याबाबत शासनाकडे रि ग्रॅड दंडाची माफी न मिळण्यामागील कारणे काय आहेत,

(४) तसेच उक्त प्रश्नाबाबत तातडीने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके, श्री.नारायण राणे यांच्याकरिता: (१), (२), (३), (४) व (५)

ज्या वतन इनाम जमिनीवरील बांधकामे गुंठेवारी कायद्याखाली नियमित झाली त्या जमिनीचा नजराणा कसा निश्चित करावा, ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री संजय दत्त : या प्रश्नाचे महत्व आणि गांभीर्य लक्षात घेता या जमिनीचा नजराणा निश्चित करण्यास शासनास अजून किती कालावधी लागणार आहे ? यासाठी काही कालमर्यादा ठरविलेली आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : दिनांक १७.३.२०१०च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा निर्णय झालेला आहे. दोन ते तीन आठवड्यात याबाबतीत जी.आर. निर्गमित करण्यात येईल.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील सर्व भटक्या विमुक्त जातींचा अनुसूचित जाती जमातीमध्ये समावेश करण्याबाबतचा निर्णय

(८) * ६५१५ श्री.प्रितमकुमार शेगांवकर : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व भटक्या विमुक्त जातींचा अनुसूचित जाती जमातीमध्ये समावेश करण्याबाबत भटक्या विमुक्त समाजाचे नेते यांनी आपल्या कार्यकर्त्यासह संबंधिताकडे वारंवार मागणी केलेली असून दिनांक १४ एप्रिल, २०१० पर्यंत मागणी मान्य न झाल्यास त्यांनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भटक्या विमुक्त जातींचा अनुसूचित जाती जमातीमध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे व त्यामध्ये कोणकोणत्या जातींचा समावेश आहे,

(३) अद्याप, कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सचिन अहिर, श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकरिता : (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे. (२) व (३) एखाद्या जातीचा अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यामध्ये समावेश करण्याची बाब ही भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१, ३४२ नुसार केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते. राज्यातील मुळ १४ विमुक्त जाती व मुळ २८ भटक्या जमाती यांचा समावेश अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती मध्ये समावेश करण्या करीता केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात यावी किंवा कसे याबाबतचा सर्वकष अभ्यास करुन अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमुर्ती यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे.

आयोगाचा अहवाल अद्याप शासनास अप्राप्त आहे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, हे राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे.

श्री. दिवाकर रावते : माझा हरकतीचा मुद्दा आहे. प्रश्न विचारणारे सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये हजर नसतील तर पुढचा प्रश्न पुकारण्यात येतो. सन्माननीय सदस्य श्री. किसनचंद तनवाणी हे सभागृहामध्ये अनुपस्थित असल्यामुळे त्यांच्या नावे असलेला ता.प्र.क्र.3820 चर्चेला घेण्यात आला नाही.

उपसभापती : सन्माननीय सदस्य ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर हे अनुपस्थित असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी ता.प्र.क्र. 6515 उपस्थित करण्याची लेखी परवानगी माझ्याकडे मागितलेली असून ती परवानगी मी त्यांना दिलेली आहे.

श्री. रमेश शेंडगे : आपण हे महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. या महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त हालअपेष्टांना सामोरा जाणारा वर्ग कोणता असेल तर तो भटक्या

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विमुक्त जातीचा आहे. आपण बजेटमध्ये राज्यातील सर्व समाज घटकांसाठी भरीव तरतूद करता. भटक्या विमुक्त जातीचा अनुसूचित जाती जमातीमध्ये समावेश न केल्यामुळे त्या लोकांना अनुसूचित जाती जमातीचे फायदे मिळत नाहीत. तेव्हा अनुसूचित जाती जमातीला ज्या सवलती मिळतात त्या सवलती भटक्या विमुक्त जातींना देण्यात येतील काय ? भटक्या विमुक्त जातीमध्ये प्रामुख्याने धनगर हा समाज 15 टक्क्यापेक्षा जास्त आहे. या समाजाच्या बाबतीत घटनेच्या शेडयूल 2 मधील बिब्लोग्राफीमध्ये अनुक्रमांक 36वर धनगड या जमातीचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये केलेला आहे.

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु धनगर आणि धनगड असा शब्दाचा अपभ्रंश करुन सवलती नाकारल्या आहेत. मुरली देवरांना मुरली देवडा आणि बलराम जाखर यांना बलराम जाखड म्हटले जाते. अशाच प्रकारे धनगर शब्दाचे धनगड झाले. केवळ शब्दाचा अपभ्रंश झाला म्हणून सवलती नाकारल्या. त्या स्पेलिंगमध्ये सुधारणा करुन धनगर आणि धनगड एकच शब्द आहे असे समजून अनुसूचित जमातीच्या सवलती देणार आहात का? 2007 साली महाराष्ट्र शासनाच्या मुद्रांक शुल्काबाबतच्या जी.आर.मध्ये अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये 'धनगर' असा उल्लेख आहे. हे ग्राह्य मानून भटक्या जमातीच्या लोकांना अनुसूचित जमातीच्या सवलती देणार आहात का? धनगर समाजाला सवलती देणार का?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, राज्य घटनेनुसार या सर्व जातींना कोणकोणते आरक्षण द्यायला पाहिजे ही तरतूद कलम 341 आणि 342 मध्ये आहे. त्या तरतुदीचा आधार घेऊन केंद्र शासनाला राज्य शासन शिफारस करु शकते. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब खरी आहे. अनेकवळेला आपण त्यांना एका प्रवर्गामध्ये आणल्यानंतर धनगर जातीला एनटी-क मध्ये आणण्याचे काम केले. अशा अनेक जाती आहेत त्यांना एनटी-ब, एनटी-क व एनटी-ड मध्ये आणण्याचे काम केले. त्यांना केंद्र शासनाच्या सवलती मिळत नाहीत. शासनाने निवृत्त न्यायाधीश श्री.अशोक अगरवाल यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नियुक्ती केली आहे. या समितीकडून अहवाल प्राप्त करुन घेण्याचे काम शासन करणार आहे. तो अहवाल आल्यानंतर सर्व जातींना न्याय देण्याची शासनाची भूमिका राहील.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये भटक्या जाती आहेत त्या कोणकोणत्या आहेत? महाराष्ट्रात त्यांची लोकसंख्या किती आहे? भटक्या जातींपैकी अनेक जातीतील लोक मुंबई शहरात आणि हिंदुस्थानातील मोठया शहरांमध्ये भीक मागताना दिसून येतात. त्यांचा अनुसूचित जमातीमध्ये समावेशन न केल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती दयनीय झालेली आहे. ते चोऱ्या करतात किंवा भीक मागतात. शासन किती कालमर्यादेत याबाबत निश्चित धोरण स्वीकारुन त्यांचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करणार आहे?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6515.....

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे एकूण वेगवेगळया 37 जातींना भटक्या जमाती म्हणून एनटी-ब, एनटी-क व एनटी-ड नुसार आरक्षण देण्याचे काम केले आहे. त्यांची निश्चित लोकसंख्येची आकडेवारी आता उपलब्ध नाही, ती पटलावर ठेवू शकतो.

2सी.1...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :6515.....

श्री. सचिन अहिर...

सन्माननीय सदस्यांच्या तिस-या व चौथ्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, याबाबत राज्यशासन उदासीन नाही. यासंदर्भातील जाणीव झाल्यानंतर सन 2004 साली यासंदर्भातील समिती स्थापन झालेली आहे. ब्रिफिंग घेतांना माझ्या लक्षात आले की, या समितीची मुदत वाढविण्याचे काम आपण 4-5 वेळेस केलेले आहे परंतु या समितीचा अहवाल लवकरात लवकर प्राप्त होणे हे देखील तेवढेच गरजेचे आहे. संबंधित कमिटीने चांगल्या प्रकारचे काम केलेले असून त्यांनी वेगवेगळया समाजाच्या प्रमुखांच्या भेटी घेतल्या असून काही वाडयांमध्ये जाऊन त्यांनी भेटी सुध्दा घेतलेल्या आहेत. हा अहवाल आल्यानंतर सर्व समाजाच्या घटकाला न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र शासनाला शिफारस केली जाईल.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, आपण केंद्र सरकारला किती दिवसात शिफारस करणार आहात?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, आयोग आपले काम व्यवस्थित करीत आहे हे मी अगोदर सुध्दा सांगितलेले आहे. या समितीचा अहवाल किती दिवसात मिळावा यासाठी या समितीला मुदत ठरवून देण्यात आलेली आहे. या समितीला 2011 पर्यंतची कालमर्यादा ठरवून दिलेली आहे. आयोगाने राजपूत भामटा, गौड, टकारी, पामारे, गारुडी या समाजाच्या प्रमुखांशी तसेच त्या लोकांच्या भेटी घेतलेल्या असून यामध्ये आपला का समावेश करावा लागेल यासंदर्भात मुलाखती घेतलेल्या आहेत. या समाजाला यामध्ये का घ्यावयाचे यासाठी आपल्याला निकष ठरवावे लागणार आहेत. 2011 च्या या समितीचा रिपोर्ट शासनाकडे मागवून त्यासंदर्भात केंद्रशासनाला शिफारस केली जाईल.

उपसभापती :प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सुक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परिषद नियम, 2007 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एसएसआय.2006/प्र.क्र.963/उद्योग-7 दिनांकित 7 जानेवारी2008 व या अधिसूचनेस काढलेले शुध्दिपत्र क्रमांक एसएसआय 2009/(173) उद्योग-7, दिनांकित 25 जानेवारी,2010 सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती :अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आलेली आहे.

श्री. गुलाबराव देवकर (पशुसंवर्धन राज्यमंत्री) :सभापती महोदय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2005-2006 चा सत्ताविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाला आपण गेल्या दहा वर्षापासून एक पैसा देखील दिलेला नाही. या ठिकाणी आपण केवळ अहवालच सभागृहासमोर ठेवणार आहात काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, यासंदर्भात योग्य तो विचार केला जाईल.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सुभाष झनक (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा सन 2003-2004,2004-2005, 2005-2006 व 2006-2007 चा अनुक्रमे अकरावा, बारावा, तेरावा व चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

उपसभापती :सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

यानंतर सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड.उषा दराडे : सभापती महोद, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळ व इतर वैधानिक विकास मंडळाची मुदत दि. 30.4.2010 रोजी संपत आहे. आमच्या मते या मंडळांना पुढील 10 वर्षाची मुदत मिळणे आवश्यक आहे. या संदर्भात मराठवाडयातून मागणी होणे, अजूनही मराठवाडयातील अनुशेष दूर झालेला नाही. सन 2008 साली अनुशेषाचा मोठा निर्माण झाला आहे. केंद्रीय नियोजन मंडळाने तिन्ही वैधानिक विकास मंडळाच्या कार्याचे मुल्यमापन केले असून मंडळाच्या कार्याविषयी समाधान व्यक्त केले आहे व त्याची कार्यकक्षा वाढवावी अशी शिफारस केली आहे. या पार्श्वभूमीवर वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे अगत्याचे आहे. याबाबत मराठवाडयात निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण व त्यावर शासनाने करावयाची उपाययोजना.

सभापती महोदय, माझा अजून एक औचित्याचा मुद्दा आहें तो मांडण्याची आपण परवानगी द्यावी.

उपसभापती : या ठिकाणी जेवढे औचित्याचे मुद्दे आलेले आहेत तेवढे झाल्यानंतर आपल्याला औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिली जाईल.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती . . . .

सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.अकोला जिल्ह्यामध्ये श्री.पी.पी.लांडगे नावाच्या एका तलाठ्याच्या वडिलांना कॅन्सरसारखा आजार झाल्यामुळे त्यांनी नागपूर डिव्हीजनल कमिशनर आणि वर्धा येथील जिल्हाधिकारी यांच्याकडे सातत्याने विनंती केली की, त्यांच्या वडिलांना कॅन्सरचा आजार झाल्यामुळे माझी बदली अमरावती विभागामध्ये कुठेही करण्यात यावी अशा प्रकारचे निवेदन सातत्याने सहा महिने करण्यात आले होते. त्याबाबत संबंधित तलाठ्याने दोन-चार आमदारांकडे पत्र दिले की, आम्हाला शिफारस पत्र द्यावे. त्याप्रमाणे संबंधित तलाठ्याला आमदारांनी शिफारस पत्र दिले की, जर याची बदली करणे शक्य असेल तर त्यांना न्याय द्यावा. अशा परिस्थितीत जिल्हाधिकारी, वर्धा यांनी असे पत्र दिले की, "यावरुन उक्त तलाठी श्री.पी.पी.लांडगे यांनी बदलीबाबत राजकीय व्यक्तीकडून पत्र आणून अशोभनीय कृत्य करुन शिस्तभंग केल्याचे दिसून येत आहे. सभापती महोदय, संबधित यांनी त्या तलाठ्याने सन्माननीय सदस्यांकडून आणलेली पत्रे त्यांच्या कार्यालयामध्ये फेकून दिली आणि त्यांना सांगितले की, अशा प्रकारे आमदारांची पत्रे कधीही आणावयाची नाहीत आणि अशा प्रकारचे अशोभनीय कृत्य करावयाचे नाही असे लेखी जवाब देण्यात आला. याबद्दल मी चिंता व्यक्त करीत आहे की, यापुढे आमदारांनी कोणाला शिफारस पत्रे द्यावयाची की नाहीत ? याकडे शासनाने विशेष लक्ष द्यावे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँक ही राज्यातील अग्रक्रम बँक म्हणून प्रसिध्द असणे,जिल्हा बँक म्हणून सर्व सरकारी व्यवहार, शेती, कर्जे, सबसिडी, व्यावसायिक कर्जे यांचे सर्व व्यवहार बँकेमार्फत होणे,कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वच क्षेत्रामध्ये आर्थिक कणा म्हणून बँकेची ओळख असणे,पण गेल्या 2003 पासून संचालक मंडळांनी बँकेमध्ये नियमबाह्य विनातारण, विनाशिफारस व नाबार्डचे नियमांचे उल्लंघन करुन कर्जवाटप केल्यामुळे तब्ब्ल 117 कोटी 68 ....

. . . .2 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लाख 25 हजार 450 रुपये तोटा सहन करावा लागला. सदरच्या झालेलया तोट्याला जबाबदार म्हणून जिल्हा बँकेच्या आजी-माजी संचालक, वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांच्यावर जिल्हा बँकेचे प्रशासक डोईफोडे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियमाच्या नियम 72 (3) अन्वये आरोपपत्र दाखल करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. सन 2002-2003 ते 2006-2007 सालादरम्यान बँक तोट्यामध्ये असून सुध्दा बँकेने 4 कोटी 1 लाख 80 हजार नफा-तोटा न काढता व एनपीएची पुरेशी तरतूद न करता आणि सहकार आयुक्त व निबंधक यांनी दिलेल्या परिपत्रकाचे उल्लंघन करुन हा लाभांश वाटण्यात आला आहे. त्यामुळे बँकेच्या आर्थिक नुकसानीत भर पडल्याचा आक्षेप घेऊन संबंधित संचालक व बँक अधिकारी यांच्यावर 72(2) अन्वये नोटीस देण्यात आली आहे. जिल्ह्यातील 33 संस्थांना विनातारण व नियमबाह्य कर्ज दिले आहे.17 संस्थांना अपुरे तारण व नियमबाह्य कर्जवाटप तर 15 संस्थांना केलेल्या कर्जवाटपात दोष आढळले आहेत. या सर्व संस्थांना मिळून 265 कोटीचे कर्ज देण्यात आले आहे. दि.27 फेब्रुवारी 2010 रोजी सहकार कायदा कलम 72 अन्वये नोटीस बजावल्यानंतर नोटीशीवर सर्व संचालकांनी मावळच्या वकिलामार्फत म्हणणे सादर केले. सदरचे म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नसल्याने या सर्वांवर कर्जाची जबाबदारी निश्चित करुन हे कर्ज वसूल करण्याची शिफारस डोईफोडे यांनी केली आहे. सदरचे सर्व आजी-माजी संचालक हे राजकीय मंडळी असल्याने सदरच्या प्रकरणामध्ये हेतुपुरस्सर दुर्लक्ष होणे,

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, औचित्याच्या मुद्यावर एवढे लांबलचक भाषण करावयाचे नसते.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, याठिकाणी जी जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे, त्यामध्ये सध्याचे माननीय मंत्री महोदय श्री.हसन मुश्रीफ यांचे नाव आहे आणि माजी माननीय मंत्री डॉ.सतीश पाटील यांचेही नाव आहे आणि सरकारव्दारे नेमण्यात आलेले प्रशासक श्री.डोईफोडे यांनीच ही जबाबदारी निश्चित केलेली आहे. 652 कोटी रुपयांचा कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला तोटा झालेला आहे. जिल्हा बँकेला पुन्हा नावलौलिकास येण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना सदर विषय सार्वजनिक दृष्टीने अतिमहत्वाचा असल्याने मी औचित्याच्या मुद्याव्दारे सदर विषय उपस्थित करु इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) मौजे राजेवाडी येथील शेतकरी श्री.भालचंद्र मारुती खोत, श्री.अशोक मारुती खोत, या स्वातंत्र्य सैनिकांना शासनाने जागा दिली आणि त्याठिकाणी त्यांची 35 एकर बागायती आहे. 35 वर्षापूर्वी त्यांनी तेथे शेतघर बांधले आहे. परंतु आज बिनशेती म्हणून त्यांना तेथील तहसीलदार दंड आकारत आहे. माननीय मंत्री महोदय, मार्च महिना आला की सर्व महसूल खाते टारगेट पूर्ण करण्यासाठी शेतावर बांधलेली जी घरे आहेत, त्यांना बिनशेती नाही म्हणून दंड आकारुन त्याची वसुली करतात. मी स्वत: दि.3 मार्च 2010 रोजी जिल्हाधिकारी यांच्या नजरेस आणून दिले की, श्री.खोत यांना स्वातंत्र्य सैनिक म्हणून शासनाने शेती करण्यासाठी जागा दिली आहे. त्यांना तेथे चांगले शेतकरी, प्रगतीशील शेतकरी म्हणून दोन वेळा पुरस्कार देखील मिळालेले आहेत.त्यांना तेथे दंड आकारण्यात आलेला आहे.सदनामध्ये माननीय मंत्री महोदय स्वत: उपस्थित आहेत.त्यामुळे आपण या दृष्टीकोनातून तेथील जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना आदेश द्यावेत की, ज्याठिकाणी शेतघरे आहेत त्यांना बिनशेती म्हणून दंड आकारु नये यासाठी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, खरे म्हणजे आपण शेतघराला एन.ए.माफ केलेला आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जी बाब उपस्थित केलेली आहे, मी ती तपासून पाहीन आणि त्याबाबतीत येथेच उत्तर देतो की, तो रद्द करुन टाकण्यात येईल.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. ही पुण्यातील घटना आहे. खरे म्हटले तर पुणे हे विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जात होते पण काल रात्रीच पुणे शहरामध्ये नुकतीच एक बलात्काराची घटना घडलेली असताना दि.9 एप्रिल 2010 रोजी मध्यरात्रीच्या सुमारास दुसरी घटना घडलेली आहे. यामुळे हिंजवडी, वाखड,सांगवी या भागामध्ये महिलांच्या सुरक्षिततेला फार मोठे आव्हान उभे राहिलेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेल्या पुण्यातील बलात्काराच्या औचित्याच्या मुद्याच्या वेळी गृहमंत्री आर.आर.पाटील यांनी निवेदन केले होते. पुण्याच्या जवळपासच्या गावामध्ये विशेषत: आयरीच्या परिसराच्या क्षेत्रात पोलीस बंदोबस्त वाढविण्यात येईल असे आश्वासन दिले होते. आश्वासन देऊन देखील आठवडाभराच्या आत ही दुसरी घटना घडलेली आहे. पुणे शहर पोलीस आयुक्तांनी पुणे शहरात महिला सुरक्षित आहेत, असेही वारंवार सांगितलेले आहे. परंतु हे पूर्णपणे फोल ठरलेले आहे. म्हणून परत मी एकदा तातडीच्या व औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो शासनाने त्याच्यावर कठोर पावले उचलावीत अशी मी विनंती करतो.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी याठिक्राणी औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. आमदार निवासमध्ये 24 तास वैद्यकीय सेवा नसल्यामुळे त्याठिकाणी अतोनात हाल होत आहेत. याठिकाणी कालच एक प्रकार घडलेला आहे. काल उपाहारगृहात एका आमदारांच्या नातेवाईकांना हार्ट ॲटॅक आल्यानंतर त्याला उपचार करण्याठी डॉक्टर नसल्यामुळे आणि तेथे रुग्णवाहिका नसल्यामुळे अक्षरश: टॅक्सीमधून त्यांना न्यावे लागले. सभापती महोदय, आम्ही यासंदर्भात पत्र व्यवहार करीत आहोत. 24 तास वैद्यकीय सेवा मिळण्याबाबत आजच विधानमंडळाच्या सह सचिवांनी पत्र व्यवहार केलेला आहे. त्यानुसार ही तातडीने व्यवस्था करावी अशा प्रकारचा हा औचित्याचा मुद्दा मी मांडीत आहे.

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आमदार निवासामध्ये डॉ.परवेज आहेत. सेंट जॉर्जचे सीएमओ तेथे आहेत. जे.जे.चे डॉ. राठोड आहेत आणि आणखीन एक राठोड नावाचे डॉक्टर येथे आहेत. सभापती महोदय,येथे मुख्य अडचण अशी आहे की, येथे रुग्णवाहिका नाही. रुग्णवाहिका विधानसभेच्या आवारात असते. तेथे साधा ऑक्सीजन देण्याची देखील सोय नाही. गेले पाच वर्षे यासंदर्भात आम्ही शासनाचे लक्ष वेधत आहोत पण यासाठी बजेटची तरतूद केली जात नाही, तेव्हा कृपया सभापती महोदय, आपण याबाबतीत निर्देश द्यावेत, अशी विनंती आहे.

उपसभापती : यासंदर्भात शासनाने व्यवस्थित लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करावी.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा पुढीलप्रमाणे आहे.महाराष्ट्राचे आराध्यदैवत व देशाची अस्मिता असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक अरबी समुद्रात बांधण्याच्या माननीय मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण व महाराष्ट्र शासनाच्या क्रांतीकारी निर्णियाबद्दल सर्वत्र स्वागत होत आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवता येईल असा हा क्षण आहे. हे स्मारक लोकांसाठी कधी खुले होणार याबाबत लोकांमध्ये एक उत्सुकता आहे. म्हणून याबाबत शासनाने एका निवदेनाद्वारे या सार्वभौम सभागृहाद्वारे राज्यातील व देशातील जनतेला या स्मारकाबाबतची सद्य:स्थिती व प्रगती या विषयी माहिती द्यावी अशी मी या औचित्याच्या मुद्दाद्वारे सचूना मांडीत आहे.

सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री शासनाच्या वतीने या सभागृहात उपस्थित आहेत. विषय महत्वाचा आहे तेव्हा यासंदर्भातील सद्य:स्थिती त्यांनी सांगावी अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : राज्य शासाने हे स्मारक करण्याचे ठरविलेले आहे. परंतु अजून त्याचा तपशील आखायचा आहे. तो प्राप्तच होताच याठिकाणी सांगितला जाईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, ही माहिती शासनाने या अधिवेशनापूर्वी द्यावी, अशी विनंती आहे.

यानंतर श्री. बरवड..,

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यात मागासवर्गीयांची वसंतराव नाईक महामंडळ, महात्मा फुले महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ, शेळीमेंढी महामंडळ, चर्मोद्योग महामंडळ, ओबीसी महामंडळ, अपंग महामंडळ इत्यादी मंडळे अस्तित्वात असणे, लोकसभेच्या तोंडावर कर्जमाफीचा निर्णय घेणे, अद्याप शासनाने कर्जमाफीचा जी.आर. न काढणे, या महामंडळांना मागील दोन वर्षापासून पैसे दिले नाहीत. जे काही पैसे खात्यावर आहेत ते काढू दिले नाहीत. कर्जमाफीचा निर्णय झाल्यावर पैसे द्यावयाचे का ते ठरवू अशी शासनाची नकारात्मक भूमिका, कर्जमाफीचा निर्णय झाल्यामुळे कर्जदार पैसे भरत नाहीत. बँकांनी वसुलीसाठी तगादा लावला आहे. त्यामुळे महामंडळ एकाही व्यक्तीला कर्ज देऊ शकत नाही. कर्जमाफीच्या घोषणेनंतर शासनाने त्यासाठी वेगळी तरतूद करावयास हवी होती ती न करणे, दोन वर्षाचे पैसे पी.एल.ए. अकाऊंटला जमा करणे, केंद्र शासनाच्या पैशात स्कीम करता येत असत पण तेही पैसे थकल्यामुळे केंद्र सरकार एक रुपयाही देत नसणे, ही महामंडळे फक्त नावापुरती अस्तित्वात असणे, त्यामुळे समाजात पसरलेली असंतोषाची भावना व शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यासंबंधी

उपसभापती : यानंतर नियम 93 अन्वये आलेल्या सूचनांबाबत मी निर्णय देतो.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी औचित्याचा मुद्दा दिलेला आहे.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, मी सुध्दा औचित्याचा मुद्दा दिलेला आहे.

उपसभापती : औचित्याच्या मुद्यांच्या अनुषंगाने माझ्याकडे ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आलेली होती त्यांना मी बोलण्यास परवानगी दिलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांचे नाव दिलेले आहे. आपण त्यांचे नाव पुकारले होते पण सन्माननीय सदस्य कागद शोधत होते.

उपसभापती : माझ्यावर विश्वास नसेल तर सन्माननीय सदस्यांच्या नावाची यादी खाली पाठवतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उपसभापती : नियम 93 अन्वये आज ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "अकोला शहराला पाणीपुरवठा होत असलेल्या महान प्रकल्पात 7.32 दशलक्ष घनमीटर एवढाच पाणीसाठा उपलब्ध असल्याने सध्या शहराला 7 दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "आदिवासी भागातील मुलींना हवाई सुंदरी बनविण्यासाठी शासनाने सुरु केलेल्या प्रशिक्षण केंद्रातून 97 आदिवासी मुलींनी हवाई प्रशिक्षण कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण करुनही त्यांना विमानसेवेत दाखल करुन न घेतल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी " राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत विदर्भ, मराठवाडा व कोकण विभागातील एकात्मिक दूग्धशाळा व प्रक्षेत्र उपवन प्रकल्प राबविण्यासाठी शासनाने राज्यातील 43 दूग्ध उत्पादक संस्थांना प्रशासकीय मान्यता देऊनही त्याबाबतचा निधी संबंधित संस्थांकडे वर्ग केला नसल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "मौजे पिंपळगाव राजा, ता. खामगाव जि. बुलढाणा येथील शेतगट क्र. 170 मध्ये विनापरवाना वीटभट्टी सुरु असल्याने या भट्टीमुळे 25,000 लोकवस्ती असलेल्या गावातील रहिवाशांना धुळीचा त्रास सहन करावा लागत असल्यामुळे त्यांच्या जीवाला निर्माण झालेला धोका " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील, यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तपमानात कमालीची वाढ झाल्यामुळे लाखो रुपयांच्या हापूस आंब्याचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील वीज निर्मितीचा दुसरा संच एरळी धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे दिनांक 8 एप्रिल, 2010 पासून बंद करावा लागल्याने 710 मेगावॅट वीज निर्मिती न झाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "वटफाटा, ता. नेर, जि. यवतमाळ येथील गाळ काढण्याचे काम करणाऱ्या श्री. अनिल महल्ले याला दि. 1 एप्रिल, 2010 रोजी वा त्यासुमारात गुंड प्रवृत्तीच्या इनवाते बंधूंनी 40 फूट खोल असलेल्या कोरड्या विहिरीत टाकून जीवे मारण्याचा घडलेला प्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर यांनी "रस्त्यापासून 15 मीटर व गांगो देवालयापासून 100 मीटर अंतरावर असलेल्या कोकण प्राईट बिअरबार परमिट रुमला मंत्र्यांकडून स्थगिती असल्याचे कारण दाखवून सदर बिअरबार व परमिट रुम अनधिकृत इमारतीत सुरु असताही परमिटरुमची परवानगी रद्द करण्याबाबत उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई होत नसल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपिकिसन बाजोरिया यांनी "संपूर्ण राज्यात पुरविण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराचे कंत्राट फक्त महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन व कंझ्युमर सोसायटीच्या नावाखाली काही विशिष्ट कंत्राटदारांना दिल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नियम 93 अन्वये आलेल्या इतर सूचनांना दालनात अनुमती नाकारलेली आहे.

यानंतर श्री. अजित शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 च्या निवेदनासंबंधी

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण नियम 93 वरील निवेदनास सुरुवात करण्यापूर्वी मी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या गलथानामुळे संपूर्ण राज्यात शिक्षकांचे फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांचे वेतन झालेले नाहीत. या विषयासंबंधी मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. या सूचनेच्या अनुषंगाने माननीय सभापतींनी मागील शुक्रवारी निवेदन करावे असे आदेश दिले होते. परंतु शुक्रवारी निवेदन झाले नाही म्हणून मी ही बाब माननीय सभापतींच्या निदर्शनास आणून दिली. तेव्हा माननीय सभापतींनी सोमवारी निवेदन करण्याचे आदेश दिले. परंतु सोमवारी निवेदन करण्यात आले नाही आणि आज पुढचा शुक्रवार आहे आणि आजही ते निवेदन करण्यात आलेले नाही. याचा अर्थ मागील शुक्रवारी निवेदन करण्यास सांगितले होते त्यास आठवडा होऊन गेलेला आहे. विभागास निवेदन करण्यास वारंवार सांगूनही निवेदन करण्यात आलेले नाही ही गोष्ट योग्य नाही. तेव्हा आपण आदेश द्यावेत अशी विनंती आहे.

उपसभापती : या संदर्भात सोमवार, दिनांक 12 एप्रिल, 2010 रोजी निवेदन करावे असे सुस्पष्ट निर्देश मी शासनास देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील चिपी येथे नियोजित विमानतळासाठी संपादित केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना कमी मोबदला मिळणे

मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील चिपी येथे नियोजित विमानतळासाठी संपादित केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना कमी मोबदला मिळणे याबाबत सर्वश्री किरण पावसकर व परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय,सर्वश्री किरण पावसकर आणि परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील चिपी येथे नियोजित विमानतळासाठी संपादित केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना कमी मोबदला मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील, वेंगुर्ला तालुक्यातील चिपी येथे नियोजित विमानतळासाठी 271 हेक्टर जमीन संपादन करण्यात आली. तसेच सभोतालची 934 हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. आपण निवेदनात गट नंबर, वरकस जिरायत आणि खरीपासाठी प्रतिहेक्टर दर नमूद केलेला आहे त्याची सरासरी काढल्यास शेतकऱ्यांना प्रतिगुंठा 15 रुपये दिलेले आहेत असे दिसून येते. आपण आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट लिमिटेड कंपनीस निविदाप्रमाणे रेट दिलेला आहे तो 8 हजार रुपये प्रति गुठांने जातो. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्यांना 15 रुपये प्रति गुठां दर देण्यात आलेला आहे आणि आपण तीच जमीन डेव्हलपरला बी.ओ.टी.वर दिलेली आहे त्याचा दर 8 हजार रुपये होत आहे. यामध्ये शेतकऱ्यांची फसवणूक झालेली आहे. जी जागा विमानतळाच्या सभोतलासाठी घेतलेली आहे त्याच्या नोंदी सात-बारा उतारावर पेन्सिलने नोंद करण्यात आलेली आहे आणि ही बाब भूमीबचाव समिती, परुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणली आहे. निवेदनात नमूद केलेले आहे की, " .....त्यांना जिल्हाधिकारी,सिंधुदुर्ग यांचेकडून दिनांक 19 मार्च, 2009 चे पत्रान्वये उत्तर पाठवून आवश्यक ती माहिती दिलेली आहे." तेव्हा आवश्यक ती माहिती काय आहे ? आपण शेतकऱ्यांना जो रेट दिला आणि कंपनीला डेव्हलप करण्यासाठी जो रेट दिला, तो योग्य आहे काय ? योग्य नसेल तर कंपनीकडून आपणास जेवढी निविदा मिळालेली आहे त्याचा वरचा रेट शेतकऱ्यांना मिळणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात चिपी गावातील 271 हेक्टर जमीन विमानतळासाठी शासनाने संपादित केली. विमानतळाचे काम देखील सुरु झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी सांगितले की, शेतकऱ्यांकडून 15 रुपये दराने प्रति गुंठा जमीन घेण्यात आली. शासनाने ज्या भावाने खरेदी केली त्याची माहिती सदनाला देतो. एक नंबर गटाच्या वरकस जिराईत पीक असलेल्या जमिनीसाठी रुपये 39,400 प्रतिहेक्टर दर आहे तर खरीप पीक असलेल्या जमिनीसाठी रुपये 61,500 प्रतिहेक्टर दर आहे. दोन नंबर गटाच्या वरकस जिराईत पीक असलेल्या जमिनीसाठी रुपये 48,856 प्रतिहेक्टर दर आहे, तर खरीप पीक असलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.....

जमिनीसाठी रुपये 71,500 दर आहे. तीन नंबर गटाच्या वरकस जिराईत पीक असलेल्या जमिनीसाठी रुपये 59,100 दर आहे तर खरीप पीक असलेल्या जमिनीसाठी रुपये 82,000 इतका दर आहे. चार नंबर गटाच्या वरकस जिराईत पीक असलेल्या जमिनीसाठी रुपये 86,950 इतका आहे तर

यानंतर श्री..खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे...

खरीप पीक असलेल्या जमिनीसाठी 92,500 रुपये, पाच नंबरच्या गटाला 76,830 रुपये, खरीप पिकाखालील जमिनीला 1 लाख 1 हजार रुपये व सहाव्या गटाला 86,650 रुपये व खरीपाच्या जमिनीला 1 लाख 11 हजार रुपये दर दिला आहे. शेतक-यांकडून जमीन घेतल्यानंतर तेथे होणा-या प्रकल्पाचे काम खाजगीरित्या बीओटी तत्वावर दिले जाते. त्यावेळी त्यांना ती जमीन शेतक-यांना दिलेल्या दरानेच दिली जात नाही. कारण त्यांना तेथे पायाभूत सुविधा तयार करावयाच्या असतात. त्यासाठी आवश्यक तो पैसा लागतो. कंपनी तेथे इन्फ्रास्ट्रक्चर तयार करीत असल्यामुळे आणि शासनाला पैशाची आवश्यकता असल्यामुळे शासनाने दर त्यांना दिलेला आहे. 994 हेक्टर जमीन संपादनासाठी ठेवली आहे. त्याच्यावर पेन्सिलने नोंद केली आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा आहे. त्यामुळे तेथे येणा-या पर्यटकांसाठी हे विमानतळ होत आहे. विमानतळाचे काम घेणा-यांचे असे म्हणणे आहे की, हा प्रकल्प व्हायबल होणार नाही, परवडणारा नाही. म्हणून या विमानतळाच्या आजूबाजूला विकास व्हावा तेथे विविध प्रकल्प यावेत म्हणून ती जागा राखून ठेवली आहे. मग एसइझेड असेल, मनोरंजनाचे साधन असेल, थिएटर, स्टेडियम असेल या विविध कामासाठी ती जागा राखून ठेवली आहे. जमिनीला दर कमी मिळाला अशी कोणत्याही शेतक-यांची तक्रार नाही. ज्यांनी जमीन दिली आहे त्यांनी पैसे घेतले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयाच्या विकासाला चालना देण्यासाठी हे विमानतळ होत आहे, शेतक-यांवर कोणत्याही प्रकारे अन्याय केलेला नाही.

श्री.किरण पावसकर : ज्या विकासकाने हे काम घेतले आहे त्यांना ते परवडणार नाही म्हणून आजूबाजूची जागा राखून ठेवलेली आहे. एअरपोर्टसाठी 271 हेक्टर जागा संपादित केली आहे. परंतु आजूबाजूची 934 हेक्टर जागा त्याला पर्यटनाची सुविधा व्हावी म्हणून ती जागा त्याच विकासकाकडे राहणार आहे की अन्य कोणाला दिली जाणार आहे ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये आहे तसे होणार नाही. ज्यांना विमानतळाचे काम दिलेले आहे त्यांना ही जमीन दिलेली नाही. परंतु विमानतळाच्या आजूबाजूचा विकास व्हावा, मनोरंजन, पर्यटनाच्या माध्यमातून तेथे उद्योग यावेत म्हणून शासनाने ही जागा राखून ठेवली आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : खापा, नगरपरिषदने (जि.नागपूर) उद्यानाची जागा सार्वजनिक व खाजगी कार्यक्रमासाठी लिजवर देणे

मु. शी. : खापा, नगरपरिषदने (जि.नागपूर) उद्यानाची जागा सार्वजनिक व खाजगी कार्यक्रमासाठी लिजवर देणे याबाबत सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी " खापा, नगरपरिषदने (जि.नागपूर) उद्यानाची जागा सार्वजनिक व खाजगी कार्यक्रमासाठी लिजवर देणे"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हा महत्वाचा प्रश्न आहे. महाकवी सुधाकर गायधनी उद्यानाची जागा खापा, नगरपरिषदने सार्वजनिक व खाजगी कामासाठी नागरिकांना वापरण्यासाठी, विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी दिली आहे. या उद्यानाचे दिनांक 17.3.2006 रोजी नामकरण झालेले आहे. हे उद्यान विकसित झाले परंतु त्याचा वापर लग्न समारंभ, पार्टी, रिसेप्शन, मिटिंग, बिछायत केंद्र, चेंजिंग रुम या कामांसाठी त्याचा उपयोग सुरु केलेला आहे. निवेदनातील उत्तरामुळे मी अंशत: समाधानी आहे. या नगरपरिषदेने उद्यानाच्या देखभालीचे जे कंत्राट दिले होते त्याला स्थगिती दिलेली आहे. परंतु पैशाच्या देवाणघेवाणीतून हे कंत्राट पुनर्जीवित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या उद्यानामध्ये पुन्हा असे उद्योग होणार नाहीत असे मंत्री महोदय आश्वासन देतील काय ?

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-5.....

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबीशी निगडित असलेला प्रश्न आहे. नगरपालिकेचा आस्थापना खर्च आणि जवळजवळ 61 हजार रुपये गार्डन आणि आजूबाजूच्या हॉलच्या मेंटेनन्सवर खर्च येतो. हे नगरपालिकेला परवडणारे नसल्यामुळे आर्थिक उत्पन्न वाढावे म्हणून नगरपालिकेने हे टेंडर काढले होते. स्थानिक ग्रामस्थांनी विरोध केल्यामुळे सध्या त्याला स्थगिती देण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी हे कायमस्वरुपी रद्द करणार का असा प्रश्न विचारला आहे. या संदर्भात नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांना बोलावून निश्चितपणे या संदर्भात त्यांचे धोरण काय आहे हे समजून घेण्यात येईल. मगच यासंदर्भातील अंतिम निर्णय घेण्यात येईल.

उपसभापती : माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर हे कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला गेले असून त्यांनी लेखी पत्राद्वारे नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक-2 नंतर घेण्यात यावे अशी विनंती केली आहे. सबब निवेदन क्रमांक-2 नंतर घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई उपनगर जिल्हयात वाढीव दराने अकृषिक कर आकारणी केली जाणे

मु. शी. : मुंबई उपनगर जिल्हयात वाढीव दराने अकृषिक कर आकारणी केली जाणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "मुंबई उपनगर जिल्हयात वाढीव दराने अकृषिक कर आकारणी केली जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री याठिकाणी बसले आहेत. मुंबई उपनगर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांना महापालिकेचे नगरसेवक ॲड.आशिष शेलार आणि आम्ही स्वत: भेटून उपनगर जिल्हयातील सोसायट्यांना अकृषिक कर, शेतसारा लावण्याचा शासनाने निर्णय घेतला त्याबाबत निवेदन दिले होते. मुंबईमध्ये स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी घेतली जाते. महापालिकेचा प्रॉपर्टी टॅक्स आकारला जातो. एन.ए.करताना फी भरली जाते. तरी देखील महसूल खात्याला उपनगर जिल्हयातील सोसायट्यांकडून पुन्हा अकृषिक कराच्या माध्यमातून उत्पन्न ओरबाडून घ्यायचे आहे. जेएनएनयुआरएमच्या नियमाप्रमाणे यापुढे प्रॉपर्टी टॅक्सची आकारणी रेडी रेकनरप्रमाणे होणार आहे. काल मंत्रीमहोदयांनी सभागृहात सांगितले की, टेंडर काढताना जमिनीचे भाव रेडी रेकनरप्रमाणे घेण्यात आले आणि फ्लॅटची विक्री मात्र त्या दराने केली नाही. सरकार मुंबई शहरात अकृषिक कर लावते. शासनाकडे निधीची कमतरता आहे, खर्च अधिक होत आहे हे आम्हाला मान्य आहे. नगरसेवक ॲड.आशिष शेलार आणि आम्ही स्वत: जाऊन जिल्हाधिकाऱ्यांपुढे म्हणणे मांडले. हे अन्यायकारक आहे असे सांगितले. सन्माननीय उपमुख्यमंत्री हे स्वत: महापौर होते. आम्ही असेसमेंट भरतो, फ्लॅट विकले तर रजिस्ट्रारकडे पैसे जमा करतो. असे असताना मुंबईकरांवर पुन्हा नवीन कर का लावता? हा कर लावला जाणार नाही असे घोषित करणार आहात का?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो काही प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात एवढेच सांगू इच्छितो की, नागरी भागात गावठाणाच्या बाहेर जे क्षेत्र असते त्या क्षेत्रावर एनए असेसमेंट सध्याच्या प्रचलित नियमानुसार लागू असते. निश्चितपणे ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे की, गावठाणाव्यतिरिक्त नागरी भागासाठी जो काही एनए असेसमेंट लावला जातो तो रद्द करावा असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. याबाबत निश्चितपणे भविष्यकाळात निर्णय घेतला जाईल.

श्री.विनोद तावडे : ही मुंबईकरांवर टांगती तलवार आहे. प्रत्येक सोसायटीला तेथील तहसीलदार, जिल्हाधिकारी छळत आहेत. केव्हापर्यंत हा निर्णय घेण्यात येईल? प्रत्येक ठिकाणाहून शासन कर रुपाने पैसे वसूल करीत आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सध्या या वसुलीला स्थगिती दिली आहे. या प्रकारची वसुली सध्या चालू नाही. मी हेही सांगितले की, ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. प्रक्रिया पार पाडून याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

2जे.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. प्रकाश सोळंके :सभापती महोदय, 15 दिवसाच्या आत सदर प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, ग्रामीण भागात पूर्वी 2 पैसे चौरस फूट असा दर आकारला जात होता परंतु आता हा दर 10 पैसे चौरस फूट करण्यात आलेला आहे. त्यामुळे ही बाब सुध्दा आपण तपासून पाहणार आहात काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, ही बाब तपासून घेतली जाईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्रमांक 2 व 4 संबंधी

उपसभापती : नियम 93 अन्वयेचे चौथे निवेदन सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे आहेत परंतु सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. निवेदन दुसरे व चौथे एवढेच शिल्लक राहिलेले आहेत. ही निवेदने नंतर घेण्यात येतील.

लक्षवेधी सूचना क्रमांक 1 संबंधी

उपसभापती : लक्षवेधी सूचना क्रमांक 1 ही सन्माननीय सदस्य सर्वश्री किसनचंद तनवाणी, दिवाकर रावते, गोपीकिसन बाजोरिया यांची आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला गेले आहेत त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

उपसभापती :नाही, आता ही लक्षवेधी सूचना राखून ठेवली जाणार नाही. पुढची लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री रमेश शेंडगे यांची आहे, त्यांनी ती मांडावी.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी.: मौजे कुचांबे या पुनर्वसित गावाला कोणत्याच सोयीसुविधा पुरविण्यात न येणे

मु. शी.: मौजे कुचांबे या पुनर्वसित गावाला कोणत्याच सोयीसुविधा पुरविण्यात न येणे यासंबंधी सर्वश्री रमेश शेंडगे,राम पंडागळे,सुभाष चव्हाण, वि. प. स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) :सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे कुचांबे या पुनर्वसित गावाचे माहे एप्रिल, २००८ मध्ये नांदगाव (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे खोटी आश्वासने देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणे, तथापि, एक वर्षाचा प्रदीर्घ कालावधी होऊन पुनर्वसित ठिकाणी सोयी सुविधांचा अभाव असणे, त्यामुळे त्यांचे जीवन अस्ताव्यस्त होणे, सदर पुर्नवसित गावकऱ्यांनी गावाला सोयी सुविधा पुरविणेबाबत वारंवार अर्ज-विनंत्या मुख्यमंत्री, नगरविकास विभाग आदींकडे करुन पुनर्वसित गावाला कोणत्याच सोयीसुविधा पुरविण्यात न येणे, त्यामुळे पुनर्वसित गावकऱ्यांमध्ये शासनाविरुध्द निर्माण झालेले असंतोषाचे व निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल.सू. क्रमांक 2.....

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मौजे कुचांबे, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी येथे कुचंबा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये कुटगीर या गावाचे पुनर्वसन झालेले आहे. कुटगीर गावातील काही दलित वस्त्यांचे सुध्दा पुनर्वसन झालेले आहे. पुनर्वसन झाल्यानंतर त्यांना ज्या काही सोयीसवलती मिळावयास पाहिजे त्या मिळालेल्या नाहीत. त्यामुळे त्यांनी राज्य शासनाच्या विविध विभागाकडे अर्ज केलेला आहे परंतु त्यांना अजूनपर्यंत न्याय मिळालेला नाही. सन्माननीय मंत्रीमहोदयांकडे यासंदर्भात मी स्वत: निवेदन दिलेले आहे. त्यामुळे या लोकांना त्वरीत न्याय दिला जाईल काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या ठिकाणच्या नागरिकांना येणा-या सहा महिन्यात सर्व नागरी सुविधा पुरविण्यात येतील.

लक्षवेधी सूचना क्र. 3 संबंधी

उपसभापती : लक्षवेधी सूचना क्रमांक 3 पुढे ढकलण्यात आलेली आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: माऊली मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, देवळाली (ता. करमाळा, जि. सोलापुर) या संस्थेची पोलीस चौकशी सुरु असणे.

मु.शी.: माऊली मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, देवळाली (ता. करमाळा, जि. सोलापुर) या संस्थेची पोलीस चौकशी सुरु असणे यासंबंधी सर्वश्री सय्यद पाशा पटेल, गुरुमुख जगवानी, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मौजे नातेपुते (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथील पंढरपूर-पुणे रस्ता महामार्गावर बांधण्यात आलेल्या दुभाजकाच्या ठिकाणी विद्युत दिव्याची सोय नसल्याने मोठया प्रमाणात होत असलेले अपघात

मु. शी. : मौजे नातेपुते (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथील पंढरपूर-पुणे रस्ता महामार्गावर बांधण्यात आलेल्या दुभाजकाच्या ठिकाणी विद्युत दिव्याची सोय नसल्याने मोठया प्रमाणात होत असलेले अपघात यासंबंधी सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील,संजय दत्त, प्रा. सुरेश नवले, श्री.चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे नातेपुते(ता. माळशिरस,जि.सोलापूर)येथील पंढरपूर-पुणे रस्ता महामार्गावर बांधण्यात आलेल्या दुभाजकाच्या ठिकाणी विद्युत दिव्यांची सोय नसल्याने मोठया प्रमाणात अपघात होऊन जीवित हानी होत असल्याचे आढळून येणे, दुभाजकावर विद्युत दिवे बसविण्यासाठी ग्रामपंचायत, सामाजिक संघटना यांनी निवेदन देऊनही तसेच रस्ता रोको आंदोलन करण्यात येऊनही अद्याप दिवे लावण्यात आले नसल्याने प्रवाशांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, सबब या महामार्गावर अपघात व जीवित हानी टाळण्यासाठी सदर ठिकाणी दिवे लावण्याची अत्यंत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

श्री. नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी. :रत्नागिरी जिल्हयातील मिरकवाडा बंदरातील गाळ उपसून तो त्याच परिसरात ठेवल्यामुळे रोगराई होण्याचा निर्माण झालेला धोका.

मु. शी. : रत्नागिरी जिल्हयातील मिरकवाडा बंदरातील गाळ उपसून तो त्याच परिसरात ठेवल्यामुळे रोगराई होण्याचा निर्माण झालेला धोका याबाबत श्री.संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.संजय केळकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय केळकर_(कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयातील मिरकरवाडा बंदरातील गाळ उपसण्याचे तसेच अर्जूना, कोदवली (राजपूर) शास्त्री, सोनवी (संगमेश्वर)वशिष्ठी (चिपळूण) या नक्षंमधील गाळ काढण्याचे काम गत वर्षी सुरु करण्यात आलेले होते. हा काढण्यात आलेला गाळ परिसरातच साठविल्याने परिसरातील काही भागामध्ये विहिरीचे पाणी दुषित होण्याच्या घटना घडलेल्या आहेत तसेच बंदर/नदी परिसरात साठविलेला गाळ काढल्यानंतर तो अन्यत्र नेऊन टाकला पाहिजे, तो त्याच ठिकाणी ठेवत विहिरीच्या पाण्याचा वापर करीत असल्याने रोगराई पसरण्याचा धोका निर्माण होणे, प्रशासनाला याबाबत वारंवार कल्पना देऊनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, शासनाने या प्रकरणी सखोल चौकशी करुन गाळ उपसण्याची नितांत आवश्यकता व उपसलेला गाळ पुन्हा मुख्य स्त्रोतामध्ये येणार नाही. अशा सुरक्षित ठिकाणी साठविण्याची आवश्यकता आहे. सदर विषय अतिमहत्वाचा व सार्वजनिक हिताचा असल्याने तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे" मांडलेला आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ. शी. : मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ विभागात 150 पेक्षा अधिक विषयांची पुस्तके मराठीत उपलब्ध नसणे

मु.शी. : मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ विभागात 150 पेक्षा अधिक विषयांची पुस्तके मराठीत उपलब्ध नसणे याबाबत श्री.किरण पावसकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.किरण पावसकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्रात सुवर्ण महोत्सव साजरा होत आहे व मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. असे असूनही मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ विभागात मात्र 150 पेक्षा अधिक विषयांची पुस्तके मराठीत उपलब्ध नसणे, ती फक्त इंग्रजी भाषेतच उपलब्ध असून दूरस्थ विभागाला मराठी द्वेषाची कावीळ व मराठीचे वावडे आहे का ? असा प्रश्न पीडित विद्यार्थ्यांकडून सातत्याने होत असणे, विद्यापीठाच्या संचालकांकडून मात्र मराठी लिहिणाऱ्या प्राध्यापकांची, ट्रान्सलेट करणाऱ्या प्राध्यापकांची कमतरता असल्याचे कारण दाखवण्यात येत आहे, यातून विद्यार्थ्यांचेही नुकसान होत आहे आणि मनस्तापही सहन करावा लागत आहे. याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी ही विशेष उल्लेखांची सूचना देत आहे.

.....

. . . .2 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : तंत्र शिक्षण संचालनालयातर्फे मान्यता देण्यात येणाऱ्या अभियांत्रिकी पदविका व इतर अभ्यासक्रमाच्या प्रोग्रेस प्रोफाईल किंवा कन्टीन्यूएशन फार्ममध्ये एआयसीटीईच्या मानकाप्रमाणे लागणारे मापदंड दर्शविण्यात येत नसणे.

मु. शी. : तंत्र शिक्षण संचालनालयातर्फे मान्यता देण्यात आणाऱ्या अभियांत्रिकी पदविका व इतर अभ्यासक्रमाच्या प्रोग्रेस प्रोफाईल किंवा कन्टीन्यूएशन फार्ममध्ये एआयसीटीईच्या मानकाप्रमाणे लागणारे मापदंड दर्शविण्यात येत नसणे याबाबत श्री.केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. केशवराव मानकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संचालनालयातर्फे मान्यता देण्यात येणाऱ्या राज्यातील सर्वच अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, औषधी निर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम व इतर अभ्यासक्रमाच्या प्रोग्रेस प्रोफाईल किंवा कन्टीन्यूएशन फार्ममध्ये एआयसीटीईच्या मानकाप्रमाणे लागणारे मापदंड दर्शविण्यात येत नाही, त्याचप्रमाणे नवीनच प्रथम वर्षाची मान्यता देण्यात आलेल्या संस्थांना सुध्दा मापदंड देण्यात येत नाही, त्यावेळी त्या संस्थांना लागणाऱ्या इमारत व इतर साधन सामग्रीचा उल्लेख हा तीनही वर्षाची क्षमता लक्षात घेऊन केला जातो किंवा त्या संस्थांचे निरीक्षण करण्यासाठी येणारी समिती आपल्या मनमर्जीप्रमाणे निर्णय घेते, त्यात काही समित्या तीन वर्षाची क्षमता लक्षात घेऊन, तर काही समित्यांनी प्रवेश क्षमता लक्षात घेऊन निर्णय घेतात, त्यामुळे सर्व शिक्षण संस्थांचा मापदंड एकसारखा होत नाही, तसेच प्रोग्रेस प्रोफाईलच्या फार्ममध्ये एआयसीटीई च्या नॉर्म्सप्रमाणे इमारत आणि साधनसामुग्रीचा उल्लेख महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संचालनालयातर्फे करण्यात येत नाही. त्याचा उल्लेख करण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे संबंधीत संस्थांना त्रुटींची पुर्तता करण्यासंदर्भात पाठविण्यात येणाऱ्या पत्रासोबत निरीक्षणासाठी आलेल्या ....

. . . .2 के-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

समितीने त्या संस्थेतून काढलेल्या त्रुटींचा अहवाल जोडून पाठविण्याची आवश्यकता तसेच निरीक्षकांनी निरीक्षण केल्यानंतर त्या संस्थेत निघालेल्या संपूर्ण त्रुटी ह्या त्या संस्थेचे संचालक किंवा प्राचार्यांसमोर त्याचवेळी निदर्शनास आणून देण्याची नितांत आवश्यकता लक्षात घेता शासनाने यावर तातडीने करावयाची उपाययोजना, शासनाची कार्यवाही व प्रतिक्रिया "धन्यवाद.

.....

. . . .2 के-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यापासून वंचित ठेवणे.

मु.शी. : पदवीधर ग्रंथपालांना सहाव्या वेतन आयोग लागू करण्यापासून वंचित ठेवणे याबाबत श्री. रामनाथ मोते यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. रामनाथ मोते यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक):सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील अनुदानित संस्थांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 12 जून, 2009 च्या शासन निर्णयानुसार सहावा वेतन आयोगातील संरचना लागू करण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला आहे. या सहाव्या वेतन आयोगाच्या संरचनेतून पदवीधर ग्रंथपालांना वगळण्यात आले आहे. पदवीधर ग्रंथपालांना सहाव्या वेतन आयोगापासून वंचित ठेवण्यात आल्याची बाब माननीय श्री. बक्षी साहेब, अध्यक्ष वेतन त्रुटी निवारण समिती यांच्या बरोबर झालेल्या बैठकीमध्ये त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे.शालेय शिक्षण विभागाच्या सचिव महोदयांनी याबाबत तातडीने आदेश काढण्याचे मान्य करुन अद्यापही आदेश निघालेला नाही. तीन महिन्यापूर्वी हे आश्वासन दिलेले आहे. मा. उच्च न्यायालयाने पदवीधर ग्रंथपालांना 5500 ची पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी देण्याचे आदेश देऊनही अंमलबजावणी होत नाही. पदवीधर ग्रंथपालांना सहाव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणी मान्य करुन सर्व पदवीधर ग्रंथपालांना न्यायालयीन आदेशानुसार वेतनश्रेणी देण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी, अशा प्रकारची विनंती मी आपल्या माध्यमातून या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

. . . .2 के-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यात विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या

मु.शी. : राज्यात विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या या

बाबत डॉ.सुधीर तांबे वि. प. स. यांनी दिलेली

विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य डॉ.सुधीर तांबे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यात विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या हा अत्यंत चिंतेचा विषय झालेला आहे. एकीकडे विद्यार्थी तणावग्रस्त आहेत तर दुसरीकउे शिक्षणाचा दर्जा विशेषत: ग्रामीण भागात खालावलेला आहे. अशा परिस्थितीत राज्यात अनेक शिक्षण तज्ज्ञ व सेवाभावी संस्था प्रयोगशील शाळा चालवित आहेत. आनंददायी आणि कृतीशील शिक्षणाव्दारे गुणवत्तेमध्ये लक्षणीय बदल घडू शकतो असे महत्वाचे निष्कर्ष त्यांनी काढलेले आहेत. अशा प्रयोगशील शाळांना विशेष दर्जा शासनाने द्यावा व त्यांनी केलेल्या प्रयोगांचा वापर शासनाच्या शैक्षणिक धोरण आखताना होऊ शकतो. यासाठी शासनाने त्वरीत अशा संस्थांना व व्यक्तींना पाचारण करुन त्यांच्याशी विचारविनिमय करणे गरजेचे आहे. अशा या अतिमहत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याचा मुद्दा

उपसभापती : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत :सभापती महोदय, मी पुढील विषयाच्या संदर्भात औचित्याच्या मुद्दाद्वारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, लोकप्रतिनिधी कायदा 1950 मधील कलम 32 अन्वये रोजंदारी तत्वावर निवडणूक कर्मचाऱ्यांची नेमणूक होते. निवडणूक कर्मचारी निवडणुकीच्या कामामध्ये आपले योगदान देत असतात. पण तशी त्यांची नियुक्ती ही अस्थायी म्हणूनच असते. गेल्या 16 वर्षापासून हा निवडणूक कर्मचारी अस्थायी आहे. सभापती महोदय, दि.10 जून,2008 व दि.4 ऑगस्ट, 2009 रोजी शासनाने यांना कायम स्वरुपी नोकरीत सामाऊन घेण्यासंबधी निर्णय पारित केला आहे. पण दुर्दैवाने या शासनाच्या निर्णयाची अजूनही अंमलबजावणी झालेली नाही तसेच फक्त निवडणूक कर्मचाऱ्यांना पसंतीक्रमच दिला गेला त्यामुळे यांची स्थिती बेरोजगारासारखीच आहे. त्याचबरोबर त्यांची वयोमर्यादाही शिथिल करण्याची गरज आहे. सध्या जी 40 वर्षाची वयोमर्यादा आहे ती शिथिल करुन 46 वर्षापर्यंत त्यांना शासन सेवेत सामावून घेण्याची मागणी सातत्याने जोर धरीत आहे तरी मी या विशेष उल्लेखाच्याद्वारे अस्थायी कर्मचाऱ्यांना स्थायी करावे आणि वय 40 वरुन 46 वर न्यावे अशी मागणी करीत आहे. धन्यवाद.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वेतन प्रदान व किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. V OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE PAYMENT OF WAGES ACT, 1936 AND THE MINIMUM WAGES ACT, 1948, IN THEIR APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA)

श्री. पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 5. वेतन प्रदान अधिनियम,1936 आणि किमान वेतन अधिनियम,1948,महाराष्ट्र राज्यास लागू असताना,त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 5 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2 वाजून 20 मिनिटांनी पुन: भरेल.

(दुपारी 1.48 ते 2.00 मध्यंतर)

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

अशासकीय कामकाज - विधेयके

पृ. शी. : मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. I OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PRIMARY EDUCATION ACT, 1947 AND THE MAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS (CONDITIONS OF SERVICE) REGULATION ACT, 1977)

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 1- मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, 1947 आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम, 1977 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, दहा वर्षांपूर्वी या राज्यामध्ये शिक्षणसेवक योजना लागू झाली. त्याला मागच्या सरकारच्या काळात कायद्याचे स्वरुप देण्यात आले. महाराष्ट्र हे अतिशय पुरोगामी राज्य होते. या ठिकाणी शिक्षकाला फार मोठा सन्मान होता, मोठी परंपरा होती आणि शिक्षकी पेशातून आलेल्या अनेक व्यक्तींनी स्वातंत्र्यांची लढाई लढली आणि हे राज्यशकट सुध्दा सांभाळले. त्या शिक्षकाला शिक्षणसेवक या शब्दाने अवमानित करणारा उल्लेख आणि त्याची कायदेशीर तरतूद आपण मागच्या विधेयकात केली आणि तसा कायदा केला तसेच त्याला वेतन नाकारुन मानधन देण्याची तरतूद केली. हे दोन्ही उल्लेख अतिशय अवमानकारक आहेत. स्वत: उच्च न्यायालयाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

याचे वर्णन वेठबिगारी अशा शब्दात केले होते. त्या कायद्याने आपण एक प्रकारे शोषणाला कायदेशीर मान्यता दिली. हे शोषण, हा अवमान, ही अवहेलना दूर करण्यासाठी या अशासकीय विधेयकाचा प्रपंच आहे. प्रामुख्याने दोन तरतुदी या विधेयकामध्ये मी मागितलेल्या आहेत. पहिली बाब म्हणजे शिक्षणसेवक नावाचा जो अवमानकारक उल्लेख आहे ते पदच रद्द करावयाचे आणि त्यांना मानधन देण्याची जी व्यवस्था आहे ती रद्द करुन त्यांना समान काम समान वेतन या न्यायाने पुन्हा त्यांना प्रतिष्ठा द्यावयाची आणि त्यांना पुन्हा वेतनावर आणावयाचे. एवढेच नव्हे तर जो परिविक्षा काळ आहे म्हणजे टीचर ऑन प्रोबेशन असतो तो प्रोबेशन कालावधी तीन वर्षाऐवजी एक वर्षावर आणावयाचा. हे यासाठी करण्याची आवश्यकता आहे की, शिक्षणसेवक योजना आल्यापासून राज्यातील शैक्षणिक दर्जा घसरला. शिक्षकांचे प्रचंड शोषण सुरु झाले. शिक्षणसेवक हा अवमानकारक उल्लेख गाळण्यासाठी आणि मानधनाऐवजी त्याला वेतन देण्यासाठी त्याचबरोबर त्याचा परिविक्षा काळ म्हणजे प्रोबेशन कालावधी तीन वर्षाऐवजी एक वर्षावर आणण्यासंबंधी हे विधेयक आहे. शोषणाला, अवहेलनेला कायद्याने मान्यता दिली होती. कायद्याने ते आपल्याला करता येत नाही. कारण भारतीय राज्य घटनेमध्ये समान काम समान वेतन आणि सर्वांना समान दर्जाची संधी देण्याची तरतूद आहे त्या घटनात्मक तरतुदींना छेद देणारा हा कायदा आहे. हा कायदा जेव्हा सभागृहामध्ये पास झाला त्यावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सभागृहामध्ये गोंधळ झाला होता आणि त्या गोंधळाच्या काळामध्ये तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांनी ते विधेयक मांडले आणि तो कायदा पास केला. त्यावेळी आम्हाला कोणालाही बोलण्याची संधी मिळाली नाही. दुसऱ्या दिवशी त्यासंदर्भात मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता हे आपल्याला आठवत असेल पण 289 च्या प्रस्तावाच्या माध्यमातून फक्त निषेध नोंदविला गेला परंतु त्यासंदर्भात जी दुरुस्ती करण्याची आवश्यकता होती ती दुरुस्ती करावयास मिळाली नाही. ती संधी मी या विधेयकाच्या निमित्ताने घेत आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

तेव्हा शासनाने स्वत: पुढाकार घेऊन हे विधेयक स्वीकारावे अशी विनंती करुन सभागृहाने हे विधेयक मांडण्याची मला परवानगी द्यावी अशी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010चे वि.प.वि. क्रमांक-1 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

"कामकाज सल्लागार समितीच्या शुक्रवार, दिनांक 9 एप्रिल, 2010 रोजी झालेल्या बैठकीत सोमवार,दिनांक 12 एप्रिल ते शुक्रवार,दिनांक 23 एप्रिल 2010 पर्यंतचा विधानपरिषदेच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

एप्रिल 2010

सोमवार, दिनांक 12	1. जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीवरील प्रस्तावावर चर्चा 2. शासकीय विधेयके.
मंगळवार,दिनांक 13	1. शासकीय विधेयके 2. सत्ताधारी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा
बुधवार, दिनांक 14	सुट्टी (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती)
गुरुवार,दिनांक 15	1. शासकीय विधेयके 2. विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा
शुक्रवार,दिनांक 16	1. शासकीय विधेयके 2. अशासकीय कामकाज (ठराव)
शनिवार, दिनांक 17	बैठक होणार नाही
रविवार, दिनांक 18	सुट्टी
सोमवार, दिनांक 19	1. शासकीय विधेयके
मंगळवार,दिनांक 20	1. शासकीय विधेयके 2. सन 2010-2011 चे विनियोजन विधेयक 3. सत्ताधारी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बुधवार,दिनांक 21	1. शासकीय विधेयके 2. विदर्भातील सिंचन अनुशेष व वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याबाबतच्या प्रस्तावावर चर्चा
गुरुवार, दिनांक 22	1. शासकीय विधेयके 2. निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप 3. अंतिम आठवडा प्रस्ताव
शुक्रवार, दिनांक 23	1. शासकीय विधेयके 2. अशासकीय कामकाज (विधेयके)

उपसभापती : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशासकीय ठरावांबाबत

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा अशासकीय ठराव क्रमांक -3 पुढील आठवड्यात घेण्यात यावा. माननीय मंत्रिमहोदयांचीसुध्दा काही हरकत नाही. तेव्हा माझा अशासकीय ठराव पुढील आठवड्यात घेण्यात यावा अशी विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे. यानंतरचा अशासकीय ठराव सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचा आहे. परंतु ते याठिकाणी उपस्थित नाहीत...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम सभागृहात उपस्थित नाहीत तेव्हा आपण त्यांचा ठराव पुढील आठवड्यात घ्यावा अशी विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी त्यांचा ठराव पुढील आठवड्यात घेण्याबाबत पत्र दिलेले आहे.

सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्था□त होऊ□ सोमवार दिनांक 12 एप्रिल, 2010 रोजी दुपारी 12.00 वाजता पु□ भरेल.

(सभा□हाची बैठ□ दुपारी 2 वाजू□ 29 मि□टां□, सोमवार, दि□ 12 एप्रिल, 2010 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्य□त स्था□त झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही